नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ७० * * नागपूर * रविवार, दिनांक ८ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## सत्यपाल मलिक रुग्णालयात दाखल

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :

जम्मू-काश्मीरमधील किरू जलविद्युत प्रकल्पाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात आरोपपत्र दाखल झाल्यानंतर १५ दिवसांनी जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी आपले मौन सोडले. वर पोस्ट करताना ते म्हणाले- मी जवळजवळ एक महिना हॉस्पिटलमध्ये आहे. मला किडनीचा त्रास आहे. जर आज माझ्याकडे पैसे असते, तर मला खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार मिळाले असते. जम्मू-काश्मीरमधील किरू जलविद्युत प्रकल्पाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात सीबीआयने २२ मे रोजी सत्यपाल मलिकसह ५ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले.

# ठाकरे बंधू एकत्र येण्यासाठी मातोश्रीवर बैठक

## उद्धव ठाकरे युतीसाठी तयार, अनिल परब यांच्यावर जबाबदारी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्रित येण्याबाबत सध्या राजकीय वतुर्ळात जोरदार चर्चा सुरू झाल्या असून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे यांच्यातील संभाव्य युतीबाबत पडद्यामागे हालचाली सुरू असल्याचे म्हटले जात आहे. आता ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी देखील उद्धव ठाकरे आणि मनसेसोबतच्या युतीवर मोठे भाष्य केले. ठाकरे बंधू एकत्र येण्यासाठी मातोश्रीवर बैठक झाली होती, असा खुलासा खैरे यांनी केला आहे. लवकरच दोन्ही बंधू एकत्र येतील, असा दावाही चंद्रकांत खैरे यांनी केला आहे.



मागील काही दिवसांपासून राजकीय वतुर्ळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू आहेत. दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून सूचक विधाने केली जात आहेत. त्यातच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांना लवकरच बातमी देतो म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यातच चंद्रकांत खैरे यांच्या खुलाशयामुळे राज उद्धव यांची जवळीक वाढल्याचा अंदाज आहे.

ठाकरे बंधू एकत्र येण्यावरून चंद्रकांत खैरे यांनी मोठा खुलासा केला आहे. राज-उद्धव एकत्र येण्यासाठी मातोश्रीवर बैठक झाली होती. बैठकीत उद्धव ठाकरे युतीसाठी तयार आहेत, असे चंद्रकांत खैरे यांनी म्हटले आहे. आपण हात पुढे करायला तयार आहोत, ते टाळी देतात का पाहू. या युतीसाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी अनिल परब यांच्यावर दिली होती. लवकरच दोन्ही बंधू एकत्र येतील, असा दावाही खैरे यांनी केला आहे.

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे नेते गजानन कीर्तिकर यांनी हे दोघे बंधू एकत्र यावेत ही तमाम शिवसैनिकांची इच्छा असल्याची भावना व्यक्त केली आहे. राज व उद्धव यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. आम्ही केवळ इच्छा व्यक्त करतो. प्रत्यक्ष त्यांनी एकत्र आले पाहिजे. या दोघांसह शिंदे यांनीही एकत्र येऊन एक अखंड शिवसेना तयार करावी, असे ते म्हणालेत. शिवसेनेच्या विभाजनामुळे शिवसेनेचे खूप मोठे नुकसान झाले. आज दोन्ही बंधू एकत्र येण्याची गरज आहे. एकनाथ शिंदेही बाळासाहेबांच्या विचारांची शिवसेना पुढे नेत आहेत. ते ही या युतीत आले पाहिजेत.

# महाराष्ट्राची निवडणूक

## लोकशाहीला धक्का देणारी : राहुल गांधी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची हेराफेरी झाल्याचा आरोप केला आहे. ही छोटी मोठी गडबडी नसून, आपल्या राष्ट्रीय संस्थांवर कब्जा करून मोठ्या प्रमाणात घोटाळा केला जात आहे, असे ते म्हणालेत. राहुल गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी उपरोक्त आरोप केला आहे. ते आपल्या लेखात म्हणतात, मी ३ फेब्रुवारी रोजी संसदेत आणि त्यानंतर पत्रकार परिषदेत गेल्या वर्षी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेबद्दल चिंता व्यक्त केली होती.

देशात यापूर्वी झालेल्या निवडणुकांबद्दलही मी शंका व्यक्त केल्या आहेत. मी असे म्हणत नाही की, प्रत्येक निवडणुकीत आणि सर्वत्र हेराफेरी होते, परंतु जे घडले आहे ते दुर्लक्षित करता येणार नाही. मी किरकोळ अनियमिततेबद्दल बोलत नाही, तर आपल्या राष्ट्रीय संस्थांवर कब्जा करून मोठ्या प्रमाणात हेराफेरीबद्दल बोलत आहे.

## आघाडीसाठी जितके अधिक सहकारी तितके चांगले : सुप्रिया सुळे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ताज्या वक्तव्यानंतर ठाकरे बंधू म्हणजेच उद्धव आणि राज ठाकरे पुन्हा एकत्र येणार का? याबाबतच्या चर्चांना जोर मिळाला आहे. आता थेट बातमीच देणार, असे सांगत उद्धव ठाकरेंनी सूचक आणि लक्षवेधी विधान करत राजकीय वतुर्ळात खळबळ उडवून दिली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही आपली भूमिका मांडली आहे. लोकशाहीत कोणाला कोणासोबत जायचे याचा पूर्ण अधिकार आहे. जर दोन्ही बंधू एकत्र येत असतील, तर ती एक चांगली बाब आहे, असे सुळे यांनी म्हटले आहे.

या संबंधी बोलताना सुळे म्हणाल्या की, महा विकास आघाडीच्या दृष्टीने जितके सहकारी अधिक असतील, तितके चांगले. आम्ही एकत्र येऊन महाराष्ट्रासाठी काम करायला तयार आहोत. राज ठाकरे जर सोबत येत असतील तर आम्हाला कोणतीही अडचण नाही. या वक्तव्यांमुळे महाराष्ट्रातील राजकारणात नवे समीकरण तयार होण्याच्या शक्यता वाढल्या आहेत. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधुंचा एकत्रित प्रवास हे राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या सर्वाधिक चर्चेत असलेली गोष्ट म्हणजे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील संभाव्य एकजूट. अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या राजकीय वाटा चाललेल्या या दोघा बंधूंच्या एकत्र येण्याची शक्यता आता अधिकच बळावली आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकत्याच केलेल्या एका वक्तव्यानंतर या चर्चांना नवे परिमाण प्राप्त झाले आहे.

## ठाकरे बंधू एकत्र आल्याने भाजपला कुठेही अडचण येणार नाही : पंकजा मुंडे

■ महासागर प्रतिनिधी, तुळजापूर, दि. ७ :

मागील काही दिवसांपासून राजकीय वतुर्ळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू आहेत. दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून सूचक विधाने केली जात आहेत. त्यातच शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकारांना लवकरच बातमी देतो म्हटल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आता भाजपच्या आमदार आणि मंत्री पंकजा मुंडे यांनीही प्रतिक्रिया दिली. ठाकरे बंधू एकत्र आल्याने भाजपला कुठेच अडचण येणार नाही, असे पंकजा



मुंडे यांनी म्हटले आहे. त्या आज तुळजापुरात माध्यमांशी बोलत होत्या. पंकजा मुंडेंकडून राज्यभरातील तीर्थक्षेत्रावर प्लास्टिक मुक्तीचा संकल्प केला जात आहे. त्यानुसार त्यांनी आज तुळजापुरात स्वच्छता मोहीम हाती घेतल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला असता, ठाकरे बंधूंच्या युतीवर भाष्य केले. पंकजा मुंडे यांना माध्यम प्रतिनिधींनी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याने मुंबई महानगरपालिकेत भाजपला अडचण येईल का? याबाबत विचारणा केली असता त्यांनी आपली भूमिका मांडली. भाजप हा जगातला सर्वात मोठा पक्ष आहे, त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र आल्याने भाजपला कुठेच अडचण येणार नाही, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे.

# जनतेचा विश्वास मिळवा, खोटे आरोप थांबवा

## राहुल गांधींच्या टीकेवर मुख्यमंत्री फडणवीस यांचा पलटवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात लिहिलेल्या लेखात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपने 'चोरी' केली असल्याचा गंभीर आरोप केला आहे. या आरोपांवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली असून, राहुल गांधींना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निवडणूक प्रक्रियेवरील आरोपांवर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. या आधी देखील राहुल गांधी यांनी अमेरिकेतील बोस्टन येथे झालेल्या कार्यक्रमात भारताच्या निवडणूक



आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. भारताच्या लोकशाहीची बदनामी करण्याचा राहुल गांधी यांचा प्रयत्न असून ते महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचा अपमान करत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

फडणवीस म्हणाले की, राहुल गांधींचे हे वर्तन त्यांच्या पक्षाच्या सततच्या पराभवामुळे आलेल्या नैराश्याचे प्रतीक आहे. त्यांनी खोटे आरोप करण्याऐवजी जनतेसमोर जाऊन विश्वास मिळवण्याचा प्रयत्न करावा. या वादामुळे राजकीय वातावरण तापले असून, भाजपने राहुल गांधींवर जोरदार टीका केली आहे. काँग्रेसने मात्र राहुल गांधींच्या आरोपांचे समर्थन केले आहे. राहुल गांधी यांनी आपल्या लेखात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपने निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी निवडणूक 'चोरी' करण्याचे पाच टप्पे स्पष्ट केले.

# मनसेचे एकमेव माजी नगरसेवक संजय तुर्डे यांचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) मुंबई महापालिकेच्या राजकारणात मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे मुंबईतील एकमेव माजी नगरसेवक संजय तुर्डे यांनी आज पक्षाला रामराम ठोकला आहे. विशेष म्हणजे, ते लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. एकिकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरु आहे. हे दोन्ही पक्ष



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याच वेळी मनसेला मुंबईत धक्का देत शिंदे यांच्या शिवसेनेने मुंबई महानगर पालिका निवडणुकीची तयारी सुरु झाली असल्याचे संकेत दिले आहेत. या पक्ष प्रवेशामुळे शिवसेनेला मुंबईत फायदा होण्याची शक्यता आहे.

संजय तुर्डे हे मुंबईतील कालिना विभागातून मनसेचे माजी नगरसेवक राहिले आहेत. २०१२ च्या महापालिका निवडणुकीत त्यांनी मनसेकडून निवडून येत आपली ताकद सिद्ध केली होती. त्यानंतर पक्षात सातत्याने सक्रिय राहून त्यांनी मनसेच्या विविध उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यानंतरच्या निवडणुकांमध्ये मनसेला अपेक्षित यश मिळाले नाही, मात्र संजय तुर्डे यांनी पक्षाशी आपली निष्ठा कायम ठेवली होती. त्यामुळे त्यांच्या पक्ष त्यागामुळे मनसेच्या मुंबईतील संघटनात्मक आधाराला मोठा धक्का बसला आहे.

संजय तुर्डे यांनी अद्याप अधिकृत कारण जाहीर केलेले नसले तरी पक्षातील प्रशासनातील अकार्यक्षमता, स्थानिक नेतृत्वाशी मतभेद, आणि भविष्यातील राजकीय अनिश्चिततेमुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मुंबईला पुढील ३ तासांसाठी रेड अलर्ट

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :

शहरात हवामान विभागाने पुढील ३ तासांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. विशेषतः दक्षिण मुंबई, नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात पावसाने जोर धरला असून अनेक ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेले आहेत. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, पुढील काही तासांत मुसळधार पावसाची शक्यता असून नागरिकांनी अत्यंत सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईसह कोकणातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. भारतीय हवामान विभागाने मुंबई, रायगड आणि ठाणे जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. या पावसामुळे रस्ते, रेल्वे आणि हवाई वाहतुकीवर परिणाम झाला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शनिवारी सकाळपासून मुंबईत मुसळधार पावसाला सुरुवात झाली. कोलाबा, सांताक्रूझ, बोरीवली, चेंबूर, वांद्रे, माटुंगा, मुलुंड, पवई, वर्ली, आणि अंधेरी या भागांमध्ये जोरदार पावसामुळे रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

# भारत मधूमेहाची राजधानी होऊ बघत आहे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :




कोरोना आजाराबाबत आजही चीन या देशाकडे संपूर्ण जग संशयाच्या नजरेने बघत आहे. त्यातच नागपुरातील हॉटेल सेंटर पॉईंट येथे शनिवारी झालेल्या हॅलो डायबेटिज अॅकेडमिया या मधूमेहावरील परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भारत व चीन या दोन्ही देशातील एका आजाराबाबत महत्वाचे भाष्य केले. त्याबाबत आपण जाणून घेऊ या.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, भारत मधूमेहाची राजधानी होऊ बघत आहे. येथे लठ्ठपणा व मधूमेहाचे रुग्ण वाढत आहे. सध्या भारत आणि चीन या दोन देशात मधूमेह रुग्ण संख्या बघता या आजाराच्या रुग्ण वाढीची स्पर्धा दिसत आहे. हे चुकीची असून ही स्पर्धा इतर गोष्टीत हवी. पूर्वीच्या तुलनेत आता खानपान व जिवनशैलीतील बदल, व्यायामाचा अभावासह इतर कारणांनी वाढते आजार बघत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट इंडियासह इतरही चांगले उपक्रम हाती घेतले. परंतु आताही या उपक्रमात मोठ्या प्रमाणात काम करण्याची गरज आहे.

मधूमेह हा व्यक्तीला पोखरणारा आजार आहे. योग्य काळजी न घेतल्यास मधूमेहग्रस्तांना बऱ्याच गंभीर सहआजाराचा धोका वाढतो. नागपुरातील मधूमेह तज्ज्ञांच्या जागतिक परिषदेत नवनवीन संशोधन, उपचाराची पद्धतीसह नावीन्यपूर्ण उपक्रमावर चर्चा होणार आहे. येथे गर्भधारणा झालेल्या महिलेची तेव्हापासून योग्य काळजी घेतल्यास भविष्यात तिच्या होणाऱ्या मुलाला मधूमेहाचा धोका टाळण्याबाबतही चांगले काम होत आहे. या पद्धतीने आपण प्रत्येकाने काळजी घेतल्यास नवीन पिढी मधूमेहापासून वाचवणे शक्य असल्याचेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. परिषदेला प्रामुख्याने मंचावर डॉ. बंसी साबू, डॉ. कमलाकर त्रिपाठी, डॉ. शशांक जोशी, डॉ. सुनील गुप्ता, डॉ. कविता गुप्ता, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रशासक डॉ. विंकी रुघवानी, डॉ. ए. के. दास, डॉ. राती मक्कर हे देश- विदेशातील तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

भारतात आजही मधूमेहाचे ६० टक्के रुग्ण आम्हाला हा आजार होऊ शकत नाही, होणार नाही अशा नकारात्मक भूमिकेत दिसतात. हे चुकीचे आहे. मधूमेहावर योग्य उपचार व आवश्यक काळजी घेतल्यास हा आजार नियंत्रणात राहू शकतो, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पोटातील चरबी, शरीर, लठ्ठपणामुळे २०० हून जास्त आजार होतात. पश्चिमात्य देशाच्या तुलनेत भारतात मधुमेहाचे रुग्ण जास्त वेगाने वाढत आहेत. त्यामुळेच भारतात रक्तदाब, हृदयविकारासह इतरही अनेक गंभीर आजार वाढत आहेत. मधूमेह, रक्तदाबाचा धोका जिवनशैलीतील बदल, योग्य औषधोपचारासह तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्यानुसार वागल्यास मधुमेह, लठ्ठपणावर नियंत्रण शक्य आहे, असे मत मधुमेह तज्ज्ञ डॉ. सुनील गुप्ता यांनी व्यक्त केले.



## पोलीस कर्मचाऱ्याने उकळली २८ हजारांची खंडणी



**पुणे :** पुण्यातील बापदेव घाटात एक तरुण मित्रा सोबत फिरण्यास गेला होता.त्यावेळी त्या तरुणाच्या बॅगेत हुक्का पॉट आढळल्यानंतर त्याच्यावर कारवाई करण्याच्या धमकीने पोलीस कर्मचाऱ्याने २८ हजार रुपयांची खंडणी उकळल्याची घटना घडली.या प्रकरणी कोंढवा पोलीस स्टेशनमध्ये विक्रम लक्ष्मण वडतीले असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिसाचे नाव आहे.पोलीस कर्मचा?यावर गुन्हा दाखल होताच पोलिस खात्यातून निलंबित करण्यात आले आहे. या घटनेमुळे पोलीस विभागात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,तक्रारदार तरुण हा चेन्नईतील राहणारा असून तो त्याच्या मित्रासह बोपदेव घाट परिसरात फिरण्यासाठी गेला होता.त्यावेळी त्याच्या बॅगेत हुक्का पॉट सापडला. त्यावेळी पोलीस कर्मचारी विक्रम वडतीलेने तरुणाला कारवाई करण्याच्या धमकीने सुरुवातीला ३० हजार रूपयांची मागणी केली.

## पोलीस कर्मचाऱ्याची राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या

**पुणे :** पुणे शहरातील शिवाजीनगर पोलीस वसाहतीमध्ये पोलीस कर्मचाऱ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे पोलिस विभागात एकच खळबळ उडाली असुन या आत्महत्ये मागील कारण अद्याप समजू शकले नाही.सचिन हरिश्चंद्र सुर्वे (वय ४६) असे आत्महत्या केलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

## बाल लैंगिक अत्याचारातील आरोपीचे कल्याण रेल्वे स्थानकातून पलायन



**कल्याण -टिटवाळा** पोलिसांच्या ताब्यात बाल लैंगिक अत्याचार गुन्ह्यातील (पॉक्सो) एक सराईत आरोपी होता. या आरोपीला पोलिसांनी शुक्रवारी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात कोठडीची मुदत संपल्याने हजर केले होते. या आरोपीला पुन्हा पोलीस वाहनातून आधारवाडी तुरूंगात नेले जात असताना, पोलीस त्याला बेड्या लावत होते. यावेळी आरोपीने दोन्ही पोलिसांच्या हाताला जोराचा झटका देऊन पळ काढला. कल्याण रेल्वे स्थानक भागातील गर्दीचा फायदा घेऊन आरोपी पळून गेला.चैतन्य राजू शिंदे (२१) असे पळून गेलेल्या आरोपीचे नाव आहे. तो रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील रोहिदासनगरचा रहिवासी आहे. तो रोहा रेल्वे स्थानक परिसरात राहतो. चैतन्य शिंदे याच्यावर टिटवाळा पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचाराचा गेल्या वर्षी गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याची चौकशी करून टिटवाळा पोलिसांनी चैतन्यला अटक केली आहे. तो टिटवाळा पोलिसांच्या ताब्यात आहे. आरोपी चैतन्य शिंदे याची कोठडीची मुदत संपल्याने टिटवाळा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जाधव, हवालदार रामदास राठोड यांनी चैतन्याला शुक्रवारी संध्याकाळी कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले होते. न्यायालयासमोर हजर केल्यानंतर न्यायालयाने चैतन्य शिंदेला २० जूनपर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. त्यामुळे चैतन्यची रवानगी आधारवाडी येथील तुरूंगात करण्यात येणार होती. कल्याण मधील आधारवाडी तुरूंगात नेण्यासाठी उपनिरीक्षक जाधव, हवालदार राठोड यांनी त्याला दंडाला पकडून न्यायालयातून बाहेर आणले.

## अकरावी प्रवेशाची तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर

### २४१ विद्यार्थ्यांनी मिळवले ५०० पैकी ५०० गुण

**मुंबई :** अकरावी प्रवेशाच्या अर्जाचा भाग दोन भरण्यासाठी ७ जून रोजी १२.३० वाजेपर्यंत मुदत दिली असताना शिक्षण संचालनालयाने शुक्रवारी सायंकाळी तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली. या यादीमध्ये ५०० पैकी ५०० गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांची संख्या २४१ आहे. तात्पुरत्या गुणवत्ता यादीमध्ये काही तक्रार असल्यास विद्यार्थ्यांना ७ जूनपासून लॉगिनवरून शिक्षण संचालनालयाकडे तक्रार करता येणार आहे.

## जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना मालमत्ता कर माफ



**मालेगाव :** नवीन शैक्षणिक वर्षापासून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा संपूर्ण मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय तालुक्यातील विराणे ग्रामपंचायतीने घेतला आहे. आपल्या पाल्याला प्राथमिक स्तरावरच शाळेत दाखल करण्यासाठी पालकांना प्रोत्साहन मिळावे आणि पर्यायाने ग्रामीण भागातील शिक्षणाचा टक्का वाढावा, या उद्देशाने ग्रामपंचायतीतर्फे हा उपक्रम सुरू करण्यात आल्याचे सरपंच नंदकुमार सोनवणे यांनी सांगितले.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्याही निवडणुका जिंकायच्या आहेत

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कार्यकर्त्यांना आवाहन



■ महासागर प्रतिनिधी,
**ठाणे, दि. ७ :** राज्यात आता महायुतीची दुसरी इनिंग सुरु झाली आहे. नेत्यांच्या निवडणूका झाल्या, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका आल्या आहेत. या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका विधानसभेप्रमाणेच जिंकायचा आहेत, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केले. तसेच महायुती कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या काही महिन्यात होणार असून या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष प्रवेशाची मालिका सुरू झाली आहे. अशाचप्रकारे शनिवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत श्रीरामपुरचे माजी आमदार भानुदास मुरकुटे, ठाकरे गटाचे शहरप्रमुख संजय छल्लारे यांच्यासह सरपंच, नगरसेवक, शहर प्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. राज्याचा विकास झाला पाहिजे या दृष्टीने आम्ही काम करत आहोत. पूर्वीचे सरकार स्थगिती सरकार होते, पण आपले प्रगती, समृध्दी आणि विकासाचे सरकार आहे. यामुळेच राज्यात महायुतीची दुसरी इनिंग सुरु झाली आहे, असे शिंदे म्हणाले. अनेकजण शिवसेनेत प्रवेश करत असून यामुळे शिवसेना आणखी बळकट होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. विधानसभा नुकत्याच निवडणुका झाल्या आहेत. यात महायुतीला मोठे यश मिळाले आहे. यामुळे नेत्यांच्या निवडणुका झाल्या, आता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या निवडणूका विधानसभे प्रमाणेच जिंकायच्या आहेत, असे आवाहन करत कार्यकर्त्यांच्या पाठीशी महायुती खंबीरपणे उभी असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.अनेक सुशिक्षीत तरुण आज पक्षात प्रवेश करीत असून त्यांची आज समाजाची आणि काळाची गरज आहे. त्यामुळे अशा तरुणांचे मी पक्षात स्वागत करतो, असेही ते म्हणाले. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे देखील तरुण असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना चार देशांचा दौरा दिला होता. ऑपरेशन सिंदूर, भारताची बाजू मांडण्यासाठी आणि पाकिस्तानचा खरा दहशतवादी चेहरा उघडा करण्यासाठी एकूण सहा शिष्टमंडळ परदेशात गेले होते.

# मुंबईत मुसळधार पाऊस

## काही तासांत पावसाचा जोर वाढणार

### हवामान विभागाचा अतिवृष्टीचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. ७ :** मुंबई शहर आणि उपनगरात मुसळधार पावसाला सुरुवात झाली आहे. काही भागात गडगडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. दरम्यान, पुढील काही तासांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यामुळे हवामान विभागाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.मुंबईत मोसमी पाऊस दाखल झाल्यानंतर काही दिवसांतच पावसाने विश्रांती घेतली. त्यानंतर अधूनमधून हलक्या सरी बरसल्या. मुंबई शहर तसेच उपनगरात मुसळधार पाऊस कोसळत आहे. काही भागात गडगडाटासह पावसाने हजेरी लावली आहे. नरिमन पॉइंट, दादर, वरळी, परळ, शीव, कुर्ला याचबरोबर घाटकोपर, पवई, भांडूप या परिसरात जोरदार पाऊस पडत आहे.दरम्यान, काही तासांत पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच या कालावधीत ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहतील. मुसळधार पावसामुळे काही भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. पावसाचा सर्वाधिक जोर चर्चगेट, परळ, महालक्ष्मी, मुंबई सेंट्रल, फोर्ट या परिसरात राहील. यामुळे पावसाचा अंदाज घेऊन गरज असेल तरच घराबाहेर पडा, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. नवी मुंबईसह, रायगड जिल्ह्याला इशारामुंबईबरोबरच नवी मुंबई आणि रायगड जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुढील काही तासांत या भागातही पावसाचा जोर वाढणार आहे. या भागात वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल. नवी मुंबईतील नेरुळ, वाशी, बेलापूर या परिसरात शनिवारी सकाळपासून जोरदार पाऊस कोसळत आहे.

## सीवूड्समधील आलिशान इमारतीतील विनापरवाना हॉटेल सीलबंद



■ महासागर प्रतिनिधी,
**नवी मुंबई, दि. ७ :** मुंबईतील बहुचर्चित पाम बीच मार्गावर सीवूड्स उपनगराच्या प्रवेशद्वारावर एका आलिशान इमारतींमध्ये विनापरवाना सुरू असलेल्या हॉटेल आणि लॉजिंग वर महापालिकेने कारवाई केली आहे. तुकाराम मुंढे महापालिका आयुक्त असताना वाढीव बांधकाम केल्याप्रकरणी या इमारतीचे बांधकाम महापालिकेने पाडले होते. असे असतानाही या इमारतीत ४२ आलिशान खोल्या असलेले हॉटेल गेल्या काही दिवसांपासून सुरू होते. महापालिकेच्या परवाना विभागाने हे हॉटेल सीलबंद केले आहे.नवी मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे आणि बेलापूरचे विभाग अधिकारी अमोल पालवे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली आहे. मे. आउट स्टे हॉटेल अँड अपार्टमेंट या नावाने लॉजिंग अँड बोर्डिंगचा व्यवसाय येथे सुरू होता. या हॉटेलला पालिकेच्या परवाना विभागाने ३ जून रोजीच याबाबत नोटीस पाठवली होती. भोगवटा प्रमाणपत्र नसताना त्या जागेचा वापर करत असल्यामुळे व त्या व्यवसायाच्या स्वरुपामुळे नागरीकांस उपद्रव तसेच जावीतास तसेच आरोग्यास किंवा मालमत्तेस धोका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही दुर्घटना घडल्यास आपणास जबाबदार धरले जाईल असे नोटिसीद्वारे कळवण्यात आले होते.परंतु या प्रकरणी आपल्याकडून २४ तासांत वापर थांबवणे आवश्यक असतानाही त्याचा वापर सुरू असल्याने पालिकेने या हॉटेल तसेच लॉजिंग व बोर्डिंग सुरु असलेल्या इमारतीमधील ४२ खोल्या मोहोरबंद केल्या आहेत.

## 'घाटकोपर -वर्सोवा मेट्रो १'ला ११ वर्षे पूर्ण



**मुंबई :** 'घाटकोपर -अंधेरी - वर्सोवा मेट्रो १'ला रविवारी ११ वर्षे पूर्ण होत आहेत. या ११ वर्षांच्या कालावधीत तब्बल १११ कोटी प्रवाशांनी 'मेट्रो १'मधून प्रवास केला. या ११ वर्षांत घाटकोपर - वर्सोवादरम्यान १२.६ लाख मेट्रो फेऱ्या धावल्या. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) ३३७ किमी लांबीच्या मेट्रो प्रकल्पातील पहिल्या मेट्रोची अर्थात 'मेट्रो १'ची उभारणी सार्वजनिक -खासगी सहभागातून करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होऊ दे, एवढेच माझ्या मनात:एकनाथ शिंदे

### उद्धव ठाकरे यांना टोला



■ महासागर प्रतिनिधी,
**जळगाव , दि. ७ :** महाराष्ट्र सुजलाम सुफलाम आणि समृद्ध होऊ दे. बळीराजाला चांगले दिवस येऊ दे. चांगला पाऊस होऊ दे आणि चांगले पीक येऊ दे, हे साकडे पांडुरंगाला घातले आहे. आणि तेवढेच माझ्या मनात आहे, असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना जळगाव दौऱ्यावर हाणला.काही दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार असल्याची चर्चा सुरू असताना, आता खुद्द उद्धव ठाकरे यांनी मनसेशी युती करण्याच्या संदर्भात भाष्य केले आहे. महाराष्ट्राच्या मनात आहे तेच होईल, असे त्यांनी म्हटल्याने राजकीय वतुर्ळात पुन्हा चर्चांना उधाण आले आहे. त्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगरात संत मुक्ताई पालखी प्रस्थान सोहळ्यासाठी शुक्रवारी सायंकाळी उपस्थित उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तुमच्या मनात काय आहे, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला.

त्यावेळी थेट उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता माझ्या मनात महाराष्ट्र आणि शेतकऱ्यांच्या भल्याशिवाय दुसरा कोणताच विचार नसल्याचे त्यांनी सांगितले. संतांची लाडकी बहीण मुक्ताईच्या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने मी येथे आलो आहे. आषाढी एकादशीला पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी मुक्ताईनगरातून रवाना होणाऱ्या संत मुक्ताईच्या पालखीत सहभागी वारकऱ्यांना शुभेच्छा देतो, असेही ते म्हणाले.

## बंदी असताना ड्रोनद्वारे अंधेरीत चित्रिकरण, एमआयडीसी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा



**मुंबई, दि. ७ :** बंदी असतानाही ड्रोन कॅमेऱ्याद्वारे अंधेरीत चित्रिकरण करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी ड्रोन चालकासह तिघाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.'ऑपरेशन सिंदूर'नंतर खबरदारी म्हणून सर्वच शहरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार ड्रोन, एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर आदी साधनांचा वापर करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने मुंबई पोलिसांनीही भारतीय नागरिक सुरक्षा अधिनियमाअंतर्गत शहरात ५ जून २०२५ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत ड्रोन, एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर आदींच्या वापरास बंदी घातली आहे. पोलिसांनी प्रसिध्द केलेल्या आदेशानुसार ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो लाईट, एअरक्राफ्ट, पॅरामोटर, हँगग्लायडर, हॉट एअर बलून कुणालाही उडवता येत नाही. शुक्रवारी संध्याकाळी ४ च्या सुमारास अंधेरी पूर्व येथील सेंट्रल रोडवरील सिप्झ कंपनीच्या प्रवेशद्वार क्रमांक १ जवळ ड्रोन उडविण्यात येत असल्याची माहिती एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या दहशतवाद विरोधीत पथकाला (एटीसी) मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तिघांना ताब्यात घेतले. सिनोव्हेटीव्ह कंपनीत मोहम्मद सनी (२७) ड्रोन ऑपरेटर म्हणून काम करतो. त्याच्या कंपनीला एलीगंट बिल्डर्स ऑण्ड डेव्हलपर्स कंपनीने चित्रिकरणाचे काम दिले होते. कंपनीचे अन्य कर्मचारी स्वप्नील देसाई (३२) सोनुकुमार रॉय (२६) घटनास्थळ दाखवण्यासाठी आणि मार्गदर्शन करण्यासाठी तेथे हजर होते. पोलिसांनी ड्रोन साहित्य जप्त केले असून या तिघांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३ (५) आणि कलम २२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अजित पवारांकडून सरकारी संस्थांचा गैरवापर चंद्रराव तावरे यांचा आरोप

**बारामती :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितल्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आम्ही मदत केली आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे राजकारणात आले. मात्र, आता ते निवडणुकीच्या काळात सरकारी संस्थांचा गैरवापर करत आहेत. त्यांच्या घरात अनेक कारखान्यांचे आणि विविध प्रशासकीय कर्मचारी असून, त्यांचा वापर ते करत आहेत.' असा आरोप माळेगाव कारखान्याचे माजी अध्यक्ष, भाजप नेते चंद्रराव तावरे यांनी केला.माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 'निळकंठेश्वर पॅनल'समोर चंद्रराव तावरे यांचे 'सहकार बचाव पॅनल' उभे करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी पत्रकारांशी संवाद साधताना तावरे यांनी ही टीका केली. तावरे म्हणाले, 'अजित पवार यांना राजकारणात आम्ही आणले. शरद पवार म्हणाले म्हणून आम्ही त्यांना जिल्हा बँकेच्या निवडणुकीत मदत केली आणि ते राजकारणात आले. पूर्वी ते कुठे बसत होते आणि आता कुठे बसतात हे पहा. चौकशी होऊ नये म्हणून ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे जात असतात.' अजित पवारांचा कारभार शेतकरी हिताचा नाही. त्यांचे कारखाने एक कोटी टन ऊस दरवर्षी घालतात. आम्ही २०० रुपये प्रति टन ऊस दर जास्त दिला, तर अजित पवारांना १०० कोटी रुपये जास्त द्यावे लागणार आहेत.

## जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला कचऱ्याची टोपली

### समुद्रकिनारी प्लास्टिक पिशव्यांचे प्रदूषण कायम



■ महासागर प्रतिनिधी,
**पालघर, दि. ७ :** प्लास्टिक मुक्तीच्या अनुषंगाने पहिले पाऊल म्हणून पालघर जिल्ह्यातील सर्व समुद्रकिनारी प्लास्टिक पिशव्या वापर व विक्रीवर जिल्हाधिकारी यांनी पूर्णतः बंदी करण्याचे आदेश दिले होते. मात्र असे असताना देखील जागतिक पर्यावरण दिन समुद्रकिनाऱ्यांवर स्वच्छता मोहिमेदरम्यान सर्वाधिक कचरा हा प्लास्टिक पिशव्यांचा असल्याचे आढळले. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या आदेशाला पर्यटन व स्थानिक व्यापारी जुमानत नसल्याचे दिसून येत आहे.जागतिक वसुंधरा दिनानिमित्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शिरगाव समुद्रकिनारी स्वच्छता मोहिमे दरम्यान एप्रिल महिन्यात जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या प्रमुख उपस्थितीत समुद्रकिनाऱ्यावरील प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व जनजागृती करण्यात आली होती.

या उपक्रमा दरम्यान जिल्हाधिकारी यांनी शिरगाव येथील स्थानिक दुकानदारांशी संवाद साधून समुद्रकिनारी प्लास्टिकमधील वस्तू विक्री न करण्याचे आवाहन केले. तसेच पर्यटकांनी प्लास्टिक कचरा समुद्रकिनारी न आणावा यासाठी सतत जनजागृती आणि कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश संबंधित प्रशासनाला दिले होते. तसेच संपूर्ण जिल्ह्यात प्लास्टिकबंदी प्रभावीपणे राबवली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## फोनवर बोलणाऱ्या रिक्षा चालकावर छायाचित्रावरुन कारवाई!



■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. ७ :** रिक्षाचालकांनी मोबाईल फोनवर वा व्हिडिओ कॉलवर बोलत गाडी चालवणे हे उपनगरात नित्याचेच झाले आहे. अशाच एका रिक्षा चालकाविरुद्ध मिळालेल्या तक्रारीवरुन अंधेरी प्रादेशिक परिवहन विभागाने तातडीने दंडात्मक कारवाई केली आहे. या रिक्षा चालकाला अडीच हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.मोबाईल फोनवर बोलणाऱ्या रिक्षा चालकांविरुद्धअंधेरी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वेळोवेळी मोहिम राबविली.

तरीही या रिक्षा चालकांमध्ये काहीही फरक पडला नसल्याचे दिसून येत आहे. एका प्रवाशाने असाच एक रिक्षा चालक गाडी (एमएच ०२ जीएल ०५६५) चालवत असताना मोबाईलवरील व्हिडिओ कॉलवर बोलत असल्याचे छायाचित्र या कार्यालयाला पाठवले. या कार्यालयाने या छायाचित्रांत दखल घेत संबंधित रिक्षा चालक मोहम्मद अनारकली हक यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. वाहतूक निरीक्षक जितेंद्र लोंढे यांनी या रिक्षा चालकाला अडीच हजार रुपयांचा दंड ठोठावला. ही तक्रार पुराव्यासह केल्याबद्दल परिवहन विभागाने प्रवाशाचे आभार मानले आहेत. प्रवाशांनी अशा रीतीने पुढाकार घेतला तर निश्चितच रिक्षाचालकांना वचक बसेल, असे अंधेरी प्रादेशिक परिवहन विभागाचे सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी गुणवंत निकम यांनी सांगितले.

तक्रारीसाठी क्रमांकपरिवहन कार्यालयाच्या ९९२०२४०२०२ या व्हॉटसब अप क्रमांकावर प्रवासी थेट तक्रार देऊ शकतात. तक्रार दाखल करताना तारीख, वेळ, ठिकाण व गाडी क्रमांकाच्या छायाचित्रासह तपशील द्यावा, असे आवाहन निकम यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शनासाठी सीबीएसई देणार मुख्याध्यापकांना प्रशिक्षण

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई, दि. ७ :** जागतिकीकरणाच्या युगात विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी, शिष्यवृत्ती आणि उदयोन्मुख करिअरबद्दल माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना करिअर ठरविण्यास मदत होऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) करियरचे पर्याय, तसेच त्यासाठीच्या विविध प्रवेश परीक्षांच्या माहितीबाबतचे प्रशिक्षण शाळांचे मुख्याध्यापक व समुपदेशकांना देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी करिअर जागरूकता कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमातून मुख्याध्यापक आणि समुपदेशक विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, व्यावसायिक प्रशिक्षण आणि शिष्यवृत्तीची माहिती देऊ शकतात.दहावीनंतर अनेक विद्यार्थ्यांच्या मनात कोणत्या शाखेला प्रवेश घ्यायचा याबाबत संभ्रम असतो. त्यामुळे मित्र किंवा कुटंबातील एखाद्या व्यक्तीचे मार्गदर्शन घेतात. मात्र अनेक वेळा निर्णय चुकल्याचे त्यांना कळते. परंतु हेच मार्गदर्शन जर त्यांना शाळेतच मिळाले तर त्यांचा निर्णय चुकणार नाही. ही बाब लक्षात घेऊन सीबीएसई मंडळाने विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शन करण्यासाठी 'करियर जागरूकता कार्यक्रम' हाती घेतला आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळेचे मुख्याध्यापक व समुपदेशक असलेल्या शिक्षकांना करियरबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या आवडी आणि क्षमता ओळखून त्यांना योग्य करियर पर्यायांचा शोध घेण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये मुख्याध्यापक व समुपदेशकांना देण्यात येणार आहे. यामुळे मुख्याध्यापक व समुपदेशकांकडून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी, शिष्यवृत्ती आणि उदयोन्मुख करिअर मार्गांबद्दल सहज माहिती उपलब्ध होण्यास मदत होऊन त्यांना आपले करियर सजगपणे निवडणे शक्य होणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी शाळांमध्ये मजबूत समुपदेशन प्रणालींवर भर देण्यात आला आहे. समुपदेशकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करियरबाबत मार्गदर्शन करणे सोपे होणार आहे. मुख्याध्यापक व समुपदेशकांना मार्गदर्शन करण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी सीबीएसईने वेळापत्रक तयार केले आहे. त्यानुसार भारतातील विविध प्रदेशांमध्ये करिअर जागरूकता कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला १२ जूनपासून आसाममधील रॉयल ग्लोबल स्कूल येथून सुरुवात होणार आहे.

## एकनाथ शिंदे यांच्या उशिरा निघालेल्या विमानामुळे जळगावातील महिला रुग्णाला मदत



■ महासागर प्रतिनिधी,
**जळगाव , दि. ७ :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील मुक्ताईनगरात शुक्रवारी सायंकाळनंतर संत मुक्ताई पालखी प्रस्थान सो-हळा पार पडला. दौरा आटोपून त्याच दिवशी रात्री उशिरा मुंबईच्या दिशेने रवाना होत असताना, नियोजित वेळेपेक्षा विमानाचे उड्डाण होण्यास उशीर झाला. नेमका हा उशीर जामनेर तालुक्यातील एका महिला रुग्णाच्या पथ्यावर पडला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संबंधित महिलेला आपल्या विमानातून मुंबईला नेण्याची तत्परता दाखवली.

जामनेर तालुक्यातील शहापूर येथील रहिवासी असलेल्या शीतल बोर्डे (३५) या मूत्रपिंडाने त्रस्त असून, त्यांच्यावर काही वर्षापासून डायलिसीसचे उपचार सुरू आहेत. शीतल यांच्या कुटुंबियांनी मुंबईतील एका रूग्णालयात मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी अर्ज केला होता. संबंधित रुग्णालयाने मूत्रपिंड दाता उपलब्ध झाल्याची माहिती दिली. रुग्णाने वेळेत मुंबईत पोहोचावे, असा संदेश शुक्रवारी पाठवला. त्यानुसार शीतल आणि त्यांचे पती आनंद बोर्डे हे लगेचच जळगाव विमानतळावर दाखल झाले. मात्र, नियोजित विमान निघून गेल्यामुळे त्यांची मोठी निराशा झाली.

शीतल बोर्डे यांचे बंधू आणि जामनेर तालुक्यातील शहापूरचे सरपंच जितेंद्र पाटील यांनी मंत्री गिरीश महाजन यांना त्याबाबत माहिती दिली. मंत्री महाजन यांनीही त्यांच्या समवेत मुक्ताईनगर दौऱ्यावर असलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी त्यासंदर्भात चर्चा केली.

शिंदे यांचे वैयक्तिक विमान मुंबईकडे निघणार होतेच. त्या विमानास वैमानिकाने शारीरिक थकव्याचे कारण दिल्याने नियोजित वेळेपेक्षा थोडा उशीर झाला.

## वेणा जलाशयातून दररोज लाखो लिटर पाण्याचा अपव्यय

# एच.आर. लिकेजमुळे शेतकऱ्यांचे हाल



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ७ : नागपूर-अमरावती राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या नागपूर तालुक्यातील चौदामैल, पेठ, धामना, शिरपूर परिसरात वसलेल्या वेणा जलाशयातून दररोज लाखो लिटर पाण्याचा अपव्यय होत असल्याचे समोर आले आहे. गेल्या पाच महिन्यांपासून जलाशयातील हेड रेग्युलेटर व्हा?ल (एच.आर.) हॅन्डलमधील गळतीमुळे हे पाणी शेतांमधून वाहत जाऊन नाल्यांत मिसळत आहे. त्यामुळे जलाशयाची पातळी लक्षणीयरीत्या कमी होत असून, शेतकऱ्यांना उभ्या पिकांचे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.

**पाण्याचा अपव्यय थांबवण्याची शेतकऱ्यांची मागणी**

वेणा जलाशयाची स्थापना १९६८ साली ५६९ हेक्टर बुडीत क्षेत्रात करण्यात आली होती. येथून आयुध निर्माणी, वाडी नगर परिषद, वानाडोंगरी, निलडोह, इसासनी अशा अनेक नागरी भागांना २४ तास पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु सद्यस्थितीत एच.आर. व्हा?लमधून होणाऱ्या गळतीमुळे जलसाठ्यावर ताण निर्माण झाला आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम शहर आणि परिसरातील पाणीपुरवठ्यावर होण्याची शक्यता आहे. सध्या पावसाळा सुरू असून शेतकऱ्यांकडून पेरणीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. मात्र, कॅनलमधून अनियंत्रितपणे येणाऱ्या पाण्यामुळे पेरणीस अडथळे येत आहेत व काही ठिकाणी उभ्या पिकांचे नुकसानही झाले आहे. यामुळे शेतकरी प्रचंड चिंतेत आहेत.

**प्रशासनाकडे तातडीने दुरुस्तीची मागणी**

'पाच महिन्यांपासून ही समस्या सुरू असून कोट्यवधी लिटर पाण्याचा अपव्यय थेट शेतकऱ्यांच्या बांधावर होत आहे. प्रशासनाने कॅनलमार्गावरील व्हा?ल दुरुस्त करुन पाणी गळती थांबवावी, जेणेकरून शेतकऱ्यांना पेरणीसाठी मार्ग मोकळा होईल.

**धनराज येलेकर,**
**पेठ (काळडोंगरी)**

**दुरुस्ती सुरू असून लवकरच काम पूर्ण होणार**

'एच.आर. हॅन्डलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने लिकेज झाले होते. त्याची दुरुस्ती याआधी केली होती, मात्र पुन्हा गळती झाली. सध्या काम सुरू आहे. दोन ते तीन दिवसांत हे काम पूर्ण करून लिकेज थांबवले जाईल.

**रितेश वैद्य, शाखा अभियंता,**
**वेणा जलाशय कार्यालय, पेठ (नागपूर)**

वेणा जलाशयातील गळतीमुळे निर्माण झालेली ही परिस्थिती तातडीने हाताळण्याची गरज आहे. जर वेळेत उपाययोजना न केल्यास, पाण्याचा हा अपव्यय संपूर्ण शहर आणि ग्रामीण भागातील जलपुरवठ्यावर गंभीर परिणाम करू शकतो.

शेतकऱ्यांच्या नुकसानाची भरपाई तर लांबच, परंतु यामुळे पेरणी हंगामही धोक्यात येऊ शकतो.

## संत कोलबास्वामींचा जन्मोत्सव उत्साहात



■ महासागर प्रतिनिधी,
बेला, दि. ७ : माणसाने सदा शुद्ध वर्तन ठेवावे. उपकार, दया अंतकरणात ठेवावी. रंजल्या गांजल्याची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. त्याप्रमाणे वागावे. असा मौलिक संदेश गुरुस्वामी विश्व मिशनचे आचार्य समर्थ राधेश्याम स्वामी यांनी भक्तांना दिला. ते बेला येथील भगवान कोलबास्वामी यांच्या जन्मोत्सवाचे कीर्तनात बोलत होते. बेला ही संत कोलबास्वामी महाराजांची जन्मभूमी आहे. येथील पिठात दरवर्षी प्रमाणे यंदाही महाराजांचा जन्मोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

भजन, पूजन, कीर्तन ऐकून किंवा करून भगवंत मिळत नाही. त्यासाठी मनातील शडरूपी विकार, जसे काम, क्रोध, लोभ, अहंकार मनातून काढून टाकावे लागते. अलीकडे समाजात अंधश्रद्धा, बुवाबाजी खूप वाढलेली आहे. अशी शोकांतिका त्यांनी व्यक्त केली.

व त्यापासून दूर राहण्याची आवाहन केले. जन्मोत्सव प्रित्यर्थ कोलवास्वामींच्या मूर्तीचा पंचामृताने अभिषेक करून विधिवत पूजा, अर्चना करण्यात आली. बेला पिठाचे अध्यक्ष रमेश मेंढुले व माजी सभापती शालु मेंडूले दांपत्यांनी राधेश्यामस्वामींचे पुष्पमालेने श्रीफळ वस्त्र देऊन सन्मानजनक स्वागत केले. रात्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर भजने झाली.

जन्मोत्सवाचा गुलाल व फुले उधळण्यात आली. फटाके फोडून मिठाई वाटण्यात आली. उपस्थित भक्तांना पुरणपोळीच्या भोजनाचा महाप्रसाद देण्यात आला. जन्मोत्सवाचे यशस्वीतेसाठी मेंढूले कुटुंबीय, गुरुमाऊली रमादेवी, सुशील धार्मिक, लता देशमुख वेणू कुंभारे, सम्रावणी धार्मिक, कल्पना खोडके शोभा हिंगणेकर, उषा डोबरकर, कृष्णा मेंडुले, गणेश बारा पात्रे, सौरभ गाठीबांधे व सूत्रसंचालनकर्ते शिक्षक लक्ष्मण खोडके आदींनी अथक परिश्रम घेतले.

## 'योग दिन २०२५' साठी डॉ. सुशांत पिसे यांची पश्चिम विभाग संयोजक म्हणून नियुक्ती



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : आयुष मंत्रालय भारत सरकार व इंटरनॅशनल नेचुरोपथी ऑर्गनायझेशन (खछज) आणि सूर्य फाउंडेशन यांच्या वतीने दरवर्षी २१ जून रोजी जागतिक योग दिनाचे आयोजन देशभरात विविध राज्यांमध्ये करण्यात येते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या तीन राज्यांचा समावेश असलेल्या पश्चिम विभागासाठी नागपूरचे डॉ. सुशांत पिसे संचालक इनार्च फाउंडेशन यांची 'योग दिन २०२५' साठी पश्चिम विभाग समन्वयक (थशीीं नेपश उेर्पीशपशी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आयुष मंत्रालय भारत सरकारद्वारा आयोजित आंतरराष्ट्रीय योगा दिवस 'योग संगम' म्हणून २१ जून २०२५ ला सम्पूर्ण भारतात साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी ही नियुक्ती खछज चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनंत बिरादर सदस्य आयुष मंत्रालय भारत सरकार यांच्या स्वाक्षरीने ६ जून २०२५ रोजी जारी केलेल्या पत्राद्वारे जाहीर करण्यात आली. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम 'धेसर षी जपश एरींह रपव जपश कशरश्रींह' अशी निश्चित करण्यात आली असून, २१ जून २०२५ रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत सामूहिक योगप्रोटोकॉल आयोजन करण्यात येणार आहे.

डॉ. सुशांत पिसे हे आता या तीन राज्यांतील जिल्ह्यांमध्ये योग दिनाचे आयोजन सुसूत्रपणे पार पाडण्यासाठी २ ते ५ जिल्हा समन्वयक नेमणार असून, प्रत्येक जिल्ह्यात किमान १० योग आयोजकांची नोंदणी करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार काम केले जाईल. डॉ. अनंत बिरादर, डॉ. कीर्तिदा अजमेरा यांनी डॉ. सुशांत पिसे यांना या नियुक्तीबद्दल शुभेच्छा दिल्या.

## मराठीहिंदी गीतांच्या स्वरसंध्येने रसिक मंत्रमुग्ध



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : स्वरांकित संगीत संस्थेतर्फे झालेल्या 'स्वरसंध्या' या कार्यक्रमात गायक कलाकारांनी सादर केलेल्या हिंदी आणि मराठी गीतांनी उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. टाळ्या आणि वन्समोअरने त्यांनी कलाकारांचा उत्साह वाढविला. लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात शुक्रवारी झालेल्या या कार्यक्रमात संगीता भगत यांनी 'रूक जा रात', दीपक राईरकर यांनी 'तुला पाहिले मी', शशीकांत वाघमारे यांनी 'ही चाल तुरूतुरू', अविनाश चन्ने यांनी 'तू सप्तसूर', स्वाती मोहनी यांनी 'तू जहां जहां', डॉ. अमृता परोळकर यांनी 'माझे तुझे', मधुलिका देशमुख यांनी 'जिवलगा कधी रे', अनुजा सावजी 'रूके रूके से कदम', विजय पुराणीक यांनी 'कुणाच्या खांद्यावर', विश्वास ताम्रपवार यांनी 'कभी बेकसी ने मारा', आरती बुटी यांनी 'कळीदार कपुरी पान', मनीषा चन्ने यांनी 'पाण्यातले पहाता' या सह कही ना जा, काहे तरसाए, वादा तो निभाया, संधीकाली या अशा, जीव रंगला, अगं नाच नाच राधे, कुहू कुहू, धुंदी कळ्यांना, बहुत शुक्रिया, तुम तो प्यार हो, धुंद एकांत हा, चांदणे शिंपीत, दिल की गिरह, चंद्र आहे साक्षीला, पुछो ना यार, दिवाने है दिवानों को, पत्ता पत्ता बुटा बुटा, हसता हुआ अशी एकाहून एक सरस हिंदी-मराठी गाणी सादर करून कलाकारांनी रसिकांची वाहवा मिळिवली. या बहारदार कार्यक्रमाच्या उत्कृष्ट निवेदनाने धनश्री सेवलकर यांनी श्रोत्यांना खिळवून ठेवले. कार्यक्रमाची संकल्पना अनुजा सावजी यांची होती. संगीत संयोजन परिमल जोशी यांचे, तसेच पंकज यादव, अक्षय हरले आणि ऋग्वेद पांडे या वादकांची उत्तम साथ लाभली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टीत घेतला ८५ पुरुष महिलांनी पक्षप्रवेश



■ महासागर प्रतिनिधी,
नरखेड, दि. ७ : भारतीय जनता पार्टी मोवाड शहराच्या वतीने कार्यकर्ता मेळावा व पक्षप्रवेश कार्यक्रम दिनांक ६ जून शुक्रवार रोजी महात्मा फुले सभागृह बाजार चौक मोवाड येथे सायंकाळी ६ वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी काटोल नरखेड विधानसभा क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर, कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोहर कुंभारे अध्यक्ष भाजपा नागपूर जिल्हा, किशोर रेवतकर भाजपा अध्यक्ष संपर्क प्रमुख ग्रामीण, उकेश चव्हाण, समीर उमप, संजय कामडी, इस्माईल बारूदवाले, मनोज कोरडे, अक्षय विरखडे, सुरेश खसारे, सतीश रेवतकर, रवी माळोदे, चेतन ठोंबरे, आदि पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाची रूपरेषा पक्षप्रवेश ही होती.

मोवाड येथील भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणारे रवी वैद्य, माजी उपाध्यक्ष नगरपरिषद मोवाड यांच्या नेतृत्वात दीपक बेले माजी सभापती, पुरुषोत्तम बागडे माजी अध्यक्ष, प्रभाताई नारायण चरपे माजी सभापती, सीमा बागडे माजी अध्यक्ष, पांडुरंग वाघे माजी नगरसेवक, मोतीराम कुंभारे माजी नगरसेवक, प्रियंका प्रशांत ढोरे महिला अध्यक्ष रा.कॉं, उत्तम दारोकर, रहूफ दिवाण, दिलीप बडघरे, किरण दुहीजोड, रामेश्वर रंभाड, निलेश चरपे, रत्नाकर वानखडे, मनोहर धांदल, राजेश घरत, यांच्यासह एकूण ८५ पुरुष व महिला सहकार्यासह भारतीय जनता पार्टीत प्रवेश घेतला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी चरणसिंग ठाकूर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी जुने कार्यकर्ते आणि पक्ष प्रवेश घेतलेले नवीन कार्यकर्ते सर्वांचा सन्मान या पक्षात केला जाणार असून जुन्या कार्यकर्त्यांनी अपमानित होणार नसल्याने सगळ्यांना सामावून काम करू विकास करू असे वचनबद्ध विचार मांडले. यावेळी मोठ्या प्रमाणात भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी भाजपात प्रवेश करणारे पुरुष व महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचा समारोप स्नेह भोजनाने करण्यात आला.

# एस क्यू जामा अमृत महोत्सव आनंदात साजरा




■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : एस .क्यू . जामा अमृत महोत्सव समिती कामठीच्या वतीने, २ जून २०२५ रोजी, एस .क्यू . जामा अमृत महोत्सव समारोह समारंभ आणि उन्हाळी फुटबॉल शिबिरातील गुणवंत विद्यार्थी आणि फुटबॉल खेळाडूंचा सत्कार कार्यक्रम स्थानिक ग्रीन लीफ गार्डन लॉन, कळमना रोड, रनाळा कामठी येथे सायंकाळी ७:३० वाजता आयोजित करण्यात आला होता. उद्घाटन आणि स्मरणिकेचे प्रकाशन हुकमचंद आमधरे यांच्या हस्ते कर्मठवीर अब्दुल रउफ शेख प्रमुख पाहुणे म्हणून, अनीस अहमद, मौलाना अन्सार अली हिंदी, सुलेखा ताई कुंभारे (माजी राज्यमंत्री) परवेझ इक्बाल सिद्दीकी, सरफराज शेख कुरेशी अब्दुल वदुद अजनाबी इत्यादी उपस्थित होते. माजी आमदार आणि कामगार संघर्ष योद्धा हृदय सम्राट एस .क्यू .जामा यांचा भव्य नागरी सत्कार करून एस .क्यू .जामा अमृत महोत्सव आनंदात साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. मोहम्मद रफिक ए.एस. यांनी उर्दू साहित्यात एस.क्यू. जामा साहेब यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, आकाशवाणीवर उर्दू कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी त्यांनी आपले राजकीय जीवन पणाला लावून उर्दू कार्यक्रम सुरू केले. दुसरे वक्ते म्हणून डॉ. युगल जे. रैलू साहेब हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जास्तीत जास्त कार्यशाळांमध्ये सहभागी होणारे देशातील पहिले व्यक्ती म्हणून न्यायाचे योद्धे म्हणून वर्णन केले गेले. प्रमुख पाहुण्या म्हणून अ?ड. सुलेखाताई कुंभारे यांनी जामा साहेबांचे मोठे बंधू म्हणून वर्णन करताना सांगितले की, जामा साहेब यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर निष्पक्षपणे आणि प्रामाणिकपणे संघर्ष केला आहे आणि विशेषतः कामठी नागपूर विभागातील शेकडो तरुणांना कोळसा खाणींमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांनी ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना निरोगी आयुष्य आणि दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आपले विचार व्यक्त करताना सत्कार मूर्ती एस क्यू जामा म्हणाले की, कामठी ही माझी कर्मभूमी आहे आणि मी गेल्या ५५ ??वर्षांपासून कामठीच्या रस्त्यांवर फिरत आहे आणि आजही ७५ वर्षे पूर्ण करत आहे, मी कामगार आणि जनतेची सेवा करत आहे. आज माझ्या अमृत महोत्सवात कामठी नागपूरच्या लोकांनी, विविध सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय, क्रीडा संघटनांनी, विशेषतः कामठी कोळसा क्षेत्राच्या कर्मचाऱ्यांनी, इत्यादींनी दाखवलेल्या स्नेह आणि प्रेमामुळे मला अधिक वेगाने काम करण्याची शक्ती मिळाली आहे आणि मी अल्लाहकडे प्रार्थना करतो की मी माझ्या शेवटच्या आयुष्यापर्यंत हे काम करत राहावे आणि मी तुम्हा सर्वांचा मनापासून आभारी आहे. अध्यक्षीय भाषण देताना डॉ. शरफुद्दीन साहिल म्हणाले की, जामा साहेबांच्या इंग्रजी, हिंदी आणि उर्दू भाषेतील पत्रव्यवहाराच्या लेखनशैलीतील गोडव्याद्वारे त्यांनी शेकडो लोकांना लाभ दिला आहे, मोठे नेते, मंत्री आणि प्रशासकीय अधिकारी यांना आकर्षित केले आहे आणि सर्व धर्मांनी मानवतेची सेवा हीच सर्वोत्तम सेवा असल्याचे म्हटले आहे. जामा साहेब आयुष्यभर तेच अंमलात आणून संघर्ष करत राहिले आहेत.

व्यासपीठाचे व्यवस्थापन श्रीमती शाहजहां हैदरी यांनी केले, ज्यांनी इंग्रजी, हिंदी, उर्दू आणि मराठी भाषा वापरुन सर्व लोकांना आकर्षित केले. हकीम तलत अन्सारी यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अहफाज अहमद, कमाल अख्तर सलाम, अनवारुल हक पटेल, अतिकुर रहमान आरिफ पटेल, रियाज अहमद, परवेज अहमद याकूबी, मोहम्मद शहजाद पटेल, मकसूद अहमद इत्यादींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अथक प्रयत्न केले.

## सीएसी ऑलराउंडरने साजरा केला जागतिक पर्यावरण दिन



**रामटेक/नागपूर, ७ जून :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त, सीएसी ऑलराउंडरने लोकांना विशेषतः मुलांना निसर्गाशी पुन्हा जोडण्यासाठी बालोद्यान, कॅम्प चेरी फार्म आणि कपीर बावडी येथे तीन दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन केले. या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'अवर लँड, अवर फ्यूचर, अवर ञ्जनरेशनरिस्टोरेशन' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित वृक्षारोहण, बियाणे लागवड आणि नेचर वॉक-इकोटॉक उपक्रमांमध?ये सहभागींना प्रत्यक्ष व आनंददायी अनुभव घेण्याची संधी मिळाली.

वृक्षारोहण उपक्रमामध्ये मुले व तरुणांनी केवळ शारीरिक आत्मविश्वासच नाहीत तर झाडांची ताकद आणि सौंदर्याची ओळख झाली. बीजरोपण मोहिमेत वनीकरण आणि स्थानिक जैवविविधता पुनर्संचयित करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले तर नेचर वॉक उपक्रमातून त्यांनी वनस्पती, प्राणी आणि स्थानिक परिसंस्थेचे नाजूक संतुलन समजून घेतले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सीएसी ऑलराउंडरचे संचालक अमोल खंते, गजानन रिंधे व इतरांचे सहकार्य लाभले.

# 'समाजकार्य महाविद्यालयांचे प्रश्न १५ ऑगस्ट पर्यंत मार्गी लागणार'

### उच्चशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचा पुढाकार



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : राज्यातील समाजकार्य महाविद्यालये सामाजिक न्याय विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित झाल्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत समाजकार्य महाविद्यालयांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) संघटनेसोबत दिनांक ३ सप्टेंबर २०२४ रोजी सह्याद्री अतिथी गृह, मुंबई येथे बैठक संपन्न झाली होती आणि त्यात ठरल्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रश्नांबाबतचा अहवाल शासनास सादर केला होता. त्यानुसार शिक्षकांना कॅस योजना लागू करण्यात आली पण नंतर लगेच विधानसभा निवडणूक आचारसंहितेमुळे उर्वरित प्रश्न निकाली निघू शकले नव्हते. यासंदर्भात 'मास्वे' संघटनेकडून शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार सुरू होता. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांनी नुकतीच मंत्रालयात समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांविषयी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली व त्यात प्रलंबित सर्व प्रश्न १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत निकाली काढण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने दिनांक ४ जून २०२५ रोजी उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर यांच्या अध्यक्षतेखाली व सह संचालक डॉ प्रकाश बच्छाव, प्रशासन अधिकारी हेमंत देवरे, सहायक प्रशासन अधिकारी(लेखा) महेंद्र कुदळे यांचे उपस्थित पुणे येथे उच्च शिक्षण संचालनायात समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रतिनिधींसोबत बैठक संपन्न झाली. या बैठकीत दिनांक १९ व २० सप्टेंबर २०२४ च्या बैठकीच्या अनुषंगाने केलेल्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी 'मास्वे' संघटनेचे अध्यक्ष प्रा अंबादास मोहिते यांनी समाजकार्य शिक्षणाचे वेगळेपण, गरजा, शासन निर्णय आणि न्यायालयांच्या आदेशांचा संदर्भ देत पुढील प्रलंबित प्रश्नांबाबत मुद्देसूद मांडणी केली. १) सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अर्जित रजांचे रोखीकरण, २) सेवा अंतर्गत प्रगती योजना (कॅस)च्या दिनांक १४ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयात सुधारणा, ३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे, ४) तीन महाविद्यालयांची मान्यता रद्द चे आदेश परत घेणे, ५) समाजकार्य महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंधास मान्यता देणे, ६) समाजकार्य महाविद्यालयांचे मार्च २०२४ पर्यंत थकीत असलेले इमारत भाडे व वेतनेतर अनुदान अदा करणे, ७) नेट-सेटग्रस्त शिक्षकांना सध्या मिळत असलेल्या वेतनश्रेणीत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत कोणताही बदल न करणे व त्यांचे वेतन सुरु ठेवणे, ८) व्यावसायिक सहाय्यक, सहाय्यक ग्रंथपाल यांच्या सहाव्या व सातव्यावेतन आयोगानुसार असलेल्या वेतनश्रेणीत सुधारणा करणे, ९) एनपीएस ची खाती उघडणे, व या योजने अंतर्गत असलेली रुणता निवृत्ती वेतन व उपदान योजना लागू करणे, १०) जीपीएफ ची खाते उघडणे, ११) एनपीएस तसेच जीपीएफ ची खाती उघडण्याची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सीपीएफ ची खाती सुरू ठेवणे, १२) अनुकंपा तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता देणे व त्यांचे वेतन सुरू करणे, १३) एसटी सेवार्थ प्रणाली मध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची माहिती अपलोड करणे, १४) प्राचार्य पदाचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ व ६५ करणे, १५) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०-२०-३० आश्वासित प्रगती योजना लागू करणे, १६) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची, सामाजिक न्याय विभागाने दिलेली कालबद्ध पदोन्नती कायम ठेवणे, १७) अनुदानासाठी प्रलंबित असलेल्या महाविद्यालयांची प्रकरणे निकाली काढणे, १८) सातव्या वेतनाची थकबाकी अदा करणे, १९) परिविक्षा कालावधी संपुष्टात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत महाविद्यालयांना निर्देश देणे, २०) वैद्यकीय खर्चाची प्रलंबित देयके मंजूर करणे, २१) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयासंदर्भात शुद्धिपत्रक काढणे, २२) सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतन व उपदानाबाबत सह संचालक कार्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करणे, २३) उच्च शिक्षण विभागाच्या एच टी सेवार्थ प्रणालीत समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची माहिती अपलोड करणे, २४) राज्यस्तरीय गुणवत्ता हमी कक्षाचे गठण करणे, २५) प्राचार्यांची मंजूर पदे भरणेबाबत तसेच नव नियुक्त प्राचार्यांचे वेतन सुरु करण्याविषयी कार्यवाही करणे.

सहसंचालक डॉ बच्छाव यांनी उपरोक्त मुद्द्यांबाबत चर्चा करीत असताना सहभागी प्रतिनिधींचे म्हणणे समजून घेतले.

संचालक डॉ शैलेंद्र देवळाणकर यांनी बैठकीला मार्गदर्शन करतांना सांगितले की कॅस चा व लेखाशीर्षाचा प्रश्न मार्गी लागला असून उच्च शिक्षण विभागातर्फे समाजकार्य महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांचे वेतन देखील सुरू झाले आहे त्यामुळे समाजकार्य महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाकडे हस्तांतरणची प्रक्रिया खऱ्या अर्थाने पूर्ण झाली असून त्यांचे उच्च शिक्षण विभागात योग्य तऱ्हेने समायोजन होण्याकरिता उर्वरित प्रलंबित प्रश्न येत्या १५ ऑगस्ट पर्यंत निकाली काढण्याचा शासनाचा निर्धार आहे.

त्याअनुषंगाने सर्व महाविद्यालयांनी विभागातर्फे मागविण्यात येणारी माहिती तातडीने उपलब्ध करून द्यावी जेणेकरून शासनास तातडीने आवश्यक ते प्रस्ताव सादर करता येतील.

बैठकी प्रसंगी डॉ शैलेंद्र देवळाणकर, डॉ प्रकाश बच्छाव, हेमंत देवरे, ज्योती भंवर यांचा 'मास्वे' च्या वतीने सत्कार करण्यात आला. समाजकार्य महाविद्यालयांचे प्रश्न सोडविण्याकरिता महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण मंत्री, उच्च शिक्षण विभाग करीत असलेल्या सहकार्याबद्दल प्रा अंबादास मोहिते यांनी आभार व्यक्त केले.

संचालकांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक वातावरणात संपन्न झालेल्या बैठकीत प्रा मोहिते यांचे सह डॉ विजय शिंगणापूरे, डॉ पुरुषोत्तम थोटे, डॉ राजेंद्रसिंग दीक्षित, डॉ संजय फुलकर, डॉ महेश ठाकूर, डॉ रघुनाथ महाजन, डॉ महेंद्र मेश्राम, डॉ रूपेंद्र गौर, डॉ सुनील कोडापे, डॉ किशोर वाहणे, शुभांगी टुले, डॉ प्रशांत वानजे, डॉ राजकुमार मस्के, प्रा युवराज खोडस्कर सहभागी झाले होते.

# शिवरायांप्रतीचा आदर आचरणातही दिसावा!

शिवजयंती आणि शिवराज्याभिषेक दिन हे समस्त शिवभक्तांच्या जीवनातील प्रमुख उत्सव. यंदा पावसाळा असतानाही किल्ले रायगडावर शिवभक्तांच्या अफाट सागर लोटलेला पाहायला मिळाला. आपल्या प्रगल्भ बुद्धीचातुर्याने आणि अतुल पराक्रमाने पाच पातशाह्यांना शहा देणाऱ्या. कडे- कपाऱ्यांतील मावळ्यांचे संघटन उभारून हिंदवी स्वराज्य स्थापन करणाऱ्या महापराक्रमी, महाबली शिवरायांचा वारसा महाराष्ट्राला लाभला हे महाराष्ट्राचे परमभाग्यच म्हणावे लागेल. शिवरायांची कीर्ती आज सातासमुद्रापलिकडे पोहोचली आहे. जगातील अनेक विद्यापीठांमधून आज शिवरायांच्या पराक्रमाचा आणि त्यांच्या आदर्श राज्यकारभाराचा इतिहास शिकवला जात आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा राज्यातील प्रत्येकालाच सार्थ अभिमान आहे. हा अभिमान शिवजयंती, शिवराज्याभिषेक दिन यांसारख्या शिवोत्सवांना अधिक उफाळून येतो. प्रतिदिन घरात शिवरायांची मूर्ती अथवा प्रतिमा पुजण्याचा आणि घराबाहेर पडताना तिला मुजरा करण्याचा नित्यक्रम आजही अनेक घरांतून पाळला जातो. आपण शिवरायांचे पाईक आहोत याची जाण ठेवण्यासाठी कपाळावर चंद्रकोर लावणारे अनेक तरुण मुंबईसारख्या धावपळीच्या शहरातही ठिकठिकाणी पाहायला मिळतात. चारचाकी, तीनचाकी गाडीवर मागच्या बाजूला तर दुचाकीच्या दर्शनी भागावर छत्रपती





शिवाजी महाराजांचे चित्र असलेले स्टिकर आणि भगवे ध्वज लावलेल्या गाड्या राज्यातील रस्त्यांवर सर्वत्रच पाहायला मिळतात. पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरात गेल्यावर तेथील नागरिकांनी आपल्या बंगल्यांची, घरांची नावे ही शिवाजी महाराजांच्या इतिहासाला अनुसरून किंवा गडदुर्गांच्या नावाने ठेवलेली पाहायला मिळतात. गळ्यात शिवरायांच्या चित्रांचे, शिवमुद्रांचे लॉकेट्स घालणारे, खिशाला महाराजांच्या चित्राचा बॅच लावणारे आणि महाराजांच्या चित्रांचे किचैन बाळगणारे राज्यात सर्वत्रच पाहायला मिळतात. हल्ली तर छत्रपती शिवाजी महाराजांसारखी दाढी आणि मिशी बाळगण्याची फॅशन तरुणवर्गात रूढ होत चालली आहे. शिवरायांप्रतीच्या श्रद्धेपोटी हे सर्व करणाऱ्या तरुणवर्गाच्या मनामध्ये शिवरायांप्रती प्रचंड आदर आणि आस्था असते यात दुमत नाही; मात्र मनातील आदर कृतीत आणण्यामध्ये आजचा तरुण कुठेतरी कमी पडत असतानाचे चित्र आज दिसत आहे. ट्रेन-बसच्या प्रवासात, रहदारीच्या ठिकाणी छत्रपती शिवरायांसारखी दाढी मिशी कोरणारे आणि कपाळावर चंद्रकोर रेखाटणारे अनेक तरुण आपापसांत बोलताना शिव्यांचा आणि अपशब्दांचा वापर सर्रासपणे करताना आढळतात. गाड्यांवर लावण्यात आलेले महाराजांच्या प्रतिमेचे अथवा नावाचे स्टिकर म्हणजे खुद्द महाराजच आहेत या भावाने त्याची नियमितपणे स्वच्छता करणारे शिवभक्तही तुलनेने कमीच आहेत. स्वतःला शिवभक्त म्हणवून घेणारे अनेक जण रस्त्यावर वाहतूक पोलिसांशी किंवा अन्य वाहनचालकाशी अरेरावी करताना किंवा वाद घालताना दिसून येतात. गाडीवर लावलेल्या स्टिकरच्या रूपाने आपल्यासोबत महाराजही आहेत आणि त्यांचे आपल्या प्रत्येक कृतीकडे बारीक लक्ष आहे हा भाव आपल्यात का निर्माण होत नाही? जेव्हा आपण आपल्या गाडीवर महाराजांच्या प्रतिमेचे स्टिकर लावतो, गळ्यात शिवप्रतिमा परिधान करतो, कपाळावर चंद्रकोर लावतो आणि महाराजांसारखी दाढी मिशी ठेवतो तेव्हा या सर्वांसोबत आपली जबाबदारीही वाढते हे लक्षात घेतले पाहिजे. या सर्व गोष्टीविषयी आपल्यामध्ये तितकेसे गांभीर्य नसले, तरी समाज आपल्याकडे शिवभक्त म्हणून आदराने पाहतो हे ध्यानात ठेवायला हवे. त्यामुळे आपल्या प्रत्येक कृतीमधून शिवरायांच्या शिकवणुकीचा आदर्श दिसून यायला हवा. उपरोक्त गोष्टी परिधान करून आपण कार्यालयांत भ्रष्टाचार करत असू, गाडीवर महाराजांचे स्टिकर लावून वाहतुकीचे नियम पळत नसू, इतरांशी विनाकारण वाद घालत असू, घरी आई वडिलांचा आदर करत नसू, मुखातून अपशब्द उच्चारात असू तर समाज आपल्याकडे हीन दृष्टीने पाहिलच शिवाय प्रत्यक्ष छत्रपती शिवरायांचाही आपल्याकडून अवमान घडेल हे लक्षात घेण्याची आज नितांत आवश्यकता आहे. शिवरायांसारखे दिसणे, शिवप्रेमाचा देखावा करणे जेव्हढे सोपे आहे तेव्हढेच कठीण शिवरायांचा आदर्श कृतीत आणणे म्हणजेच शिवरायांना अपेक्षित अशी कृती करणे आहे. त्यामुळे आपल्यामुळे शिवरायांच्या प्रतिमेला धक्का लागणार नाही याची काळजी आपणच घ्यायला हवी. आपल्या प्रत्येकाच्या मनात आणि हृदयात छत्रपती शिवरायांविषयी नितांत आदर आणि श्रद्धा आहे त्यामुळे छत्रपतींचा आदर्श आपल्या नियमित आचरणातूनही वेळोवेळी दिसायला हवा!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# पाकिस्तानला प्रथम वर्ल्ड बँकेचे कर्ज

## आता आशियाई बँकेचे कर्ज कुठे गेले आतंकवाद विरोधी देश?





पहलगाम हल्ल्यानंतर जगातील अनेक देशांनी आतंकवादी हल्ल्याची निंदा केली होती.सोबतच यात पाकिस्ताचा हात असल्याचे जगजाहीर असल्याने अनेक देशांनी पाकिस्तानची सुध्दा निंदा केली.फक्त चीन,बांगलादेश आणि तुर्की यांनी पाकिस्तानला खुले समर्थ केले होते आणि पाकिस्तानच्या घृणास्पद कारवाईच्या विरोधात संपूर्ण देश भारताच्या समर्थनार्थ उभे असल्याचे सांगण्यात आले होते आणि तसे दिसत सुध्दा होते.परंतु ऑपरेशन सिन्दुरच्या कारवाईमध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले.यात आतंकवाद्याचे अड्डे व पाकिस्तानचे एअर बेस उध्वस्त करण्यात आले.यात पाकिस्तानला अरबो रूपयांचे नुकसान सहन करावे लागले. पाकिस्तान आतंकवाद्यांचे माहेरघर आहे ही बाब अमेरिकेसह जगाला माहीत असतांना सुध्दा अमेरिकेने पाकिस्तानला वर्ल्ड बँकेकडुन कर्ज मिळावे यासाठी पुढाकार घेतला व पाकिस्तानला ताबडतोब आय.एम.एफ. या वर्ल्ड बँकेने १ अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज दिले आणि हे कर्ज मंजूर करण्यात अमेरिकेसह जगातील अनेक देशांचा हात असल्याचे स्पष्ट दिसून आले.म्हणजे अमेरिका भारतासह जगाला सांगतो की आम्ही आतंकवाद्यांच्या विरोधात खंबीरपणे उभे आहोत. परंतु अमेरिका पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम करतो त्यामुळे आज अमेरिका विश्वासपात्र देश रहाला नाही. आतंकवाद्यांची फॅक्टरी समजल्या जाणाऱ्या पाकिस्तानला अमेरिका नेहमीच खतपाणी घालून खुला सपोर्ट करतो व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन सुध्दा देत असतो ही जगाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.अमेरिका नेहमी प्रमाणे आताही दोगली नितीचा वापर करीत आहे.भारत-पाक संघर्ष सुरू असतांनाच आय.एम. एफ.ने पाकिस्तानला ताबडतोब १ अरब अमेरिकन डॉलरची मदत केली आणि हे कर्ज देण्याचे काम अमेरिकेच्याच मदतीने झाले आहे.आय.एम.एफ.चे पुर्वीचे कर्ज अजुनपर्यंत पाकिस्तानने चुकविलेले नाही तरीही त्याला कर्ज देण्यात आले यावर भारत सरकारने नाराजी सुध्दा व्यक्त केली आहे ही बाब जगाला का दिसत नाही!आयएमएफ या वर्ल्ड बँकेने १ अरब अमेरिकन डॉलरचे कर्ज देऊन एक महिना सुध्दा व्हायचा आहे;तर आशियाई विकास बँक (एडीबी) ने पाकिस्तानला ८० कोटी डॉलरचे कर्ज ४ जून २०२५ ला मंजूर केले ही अत्यंत दुर्भाग्यपुर्ण बाब आहे. पाकिस्तानकडुन आर्थिक मदतीचा दुरूपयोग होण्याची शक्यता भारताने व्यक्त केलेली चिंता नजरे आड करून आशियाई विकास बँकेने (एडीबी) पाकिस्तानला तब्बल ८० कोटी डॉलरचे कर्ज मंजूर केले ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.हेही तीतकेच सत्य आहे की पाकिस्तानला आतापर्यंत मिळालेल्या कर्जाची ९० टक्के रक्कम ही आतंकवाद्यांसाठी खर्च होणार आहे आणि १० टक्के रक्कम पाकिस्तानी जनतेसाठी.एडीबी चे अध्यक्ष मसाटो कांडा यांनी १ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली होती आणि ४ जूनला एडीबी ने कर्ज मंजूर केले यावरून स्पष्ट होते की जगातील देशांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहे हे स्पष्ट दिसुन आले.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जगातील अनेक देशांना भेटी दिल्या आणि जागतिक पातळीवर आपली बाजू मजबूत करण्याचा प्रयत्न सुध्दा केला.परंतु जेव्हा पाकिस्तानला अलगथलग पाडण्याची वेळ आली तेव्हा जगातील अनेक देश प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रित्या पाकिस्तानच्या बाजूने उभे आहे ही बाब आयएमएफ व एडीबी बँकेने मंजूर केलेल्या कर्जावरून स्पष्ट लक्षात येते.कारण जगातील अनेक देश या बँकांचे सदस्य आहेत परंतु पाकिस्तानला कर्ज देण्याचा विरोधी कोणीच का केला नाही? असे अनेक प्रश्न स्वतःला आतंकवाद विरोधी म्हणणाऱ्या देशासमोर उपस्थित होतात.यावरून स्पष्ट होते की भारताचे शत्रू पाकिस्तान,चीन, बांगलादेश, तुर्की हेच एकटे नसुन अनेक शत्रू आहेत ही बाब पाकिस्तानला दिलेल्या कर्जावरून स्पष्ट होते.महत्वाचे म्हणजे पाकिस्तानने आतापर्यंत घेतलेल्या कोणत्याही बँकेचे कर्ज अजूनपर्यंत परत केलेले नाही तरीही त्याला जगातील अनेक देश कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य करतात ही बाब जागतिक बँकेने दिलेल्या कर्जावरून स्पष्ट होते.यावरून स्पष्ट होते की जगातील अनेक देश दिखावा म्हणून भारतासोबत असल्याचे दिसून येते.कारण पाकिस्तानला दिल्या जाणाऱ्या कर्जाचा विरोध फक्त एकट्या भारतानेच केला व बाकीच्यांनी फक्त बघ्याची भूमिका घेतली. माझ्या माहितीनुसार भारताचा होत असलेला विकास इतर देशांना पहावल्या जात नाही.त्यामुळे कर्जाच्या माध्यमातून जगातील भारत विरोधी देश अप्रत्यक्षरीत्या कर्जाच्या माध्यमातून पाकिस्तानला मदत करीत असावेत.



लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# जल्लोषाचे रूपांतर शोकसागरात!

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू अर्थात आरसीबी संघाने अठरा वर्षात पहिल्यांदाच आयपीएलचा करंडक उंचावल्यानंतर देशभर सुरू झालेल्या जल्लोषाचे २४ तासाच्या आत शोकसागरात रूपांतर झाले. आरसीबीचा संघ पहिल्यांदाच आयपीएल विजेता ठरल्यानंतर त्या संघाचे स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर मोठा समारंभ आयोजित करण्यात आला अर्थात आपला संघ विजेता ठरल्यानंतर अशा प्रकारचा स्वागत समारंभ आयोजित करण्याची ही पहिली वेळ नाही याआधीही असे अनेक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले होते मात्र या स्वागत समारंभादरम्यान जी चेंगराचेंगरी होऊन दुर्घटना घडली तशी दुर्घटना याआधी कधीही घडली नाही. या दुर्घटनेत ११ निष्पाप क्रिकेट चाहत्यांना आपला जीव गमवावा लागला तर ३० हून अधिक क्रिकेट चाहते गंभीर जखमी झाले. या दुर्घटनेनंतर बंगळुरू मध्येच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वात शोककळा पसरली. मन हेलावून टाकणाऱ्या या दुर्घटनेनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. मंगळवारी मध्यरात्री आयपीएलचा अंतिम सामना पार पडल्यानंतर २४ तासाच्या आत असा समारंभ घेण्याची गरज होती का? हा समारंभ आयोजित करताना आयोजकांनी पुरेशी तयारी केली होती का? अवघ्या २४ तासाच्या आत इतक्या मोठ्या समारंभ आयोजित करताना आयोजकांनी प्रशासनाही पोलिसांशी चर्चा केली होती का? हा समारंभ चिन्नास्वामी स्टेडियमवर आयोजित करण्यात आला या स्टेडियमची क्षमता ३५ ते ४० हजार इतकी आहे प्रत्यक्षात या समारंभासाठी त्याच्या दहा पट म्हणजे अडीच ते तीन लाख क्रिकेट चाहते जमा झाले. या समारंभाला अपेक्षेपेक्षा अधिक चाहते जमा होतील असा अंदाज आयोजकांना आला नाही का? आला असेल तर मग त्यांनी त्यांना नियंत्रित करण्यासाठी काय उपाययोजना केल्या? गर्दी नियंत्रित करण्यासाठी पुरेशे पोलिस बळ होते का? हा समारंभ म्हणजे केवळ इव्हेंट होता का? या समारंभाच्या आडून राजकीय स्वार्थ साधला जाणार होता का? आणि सगळ्यात शेवटचा आणि महत्वाचा प्रश्न या दुर्घटनेत ज्या निष्पाप ११ क्रिकेट चाहत्यांचा बळी गेला त्याला जबाबदार कोण? आयोजक, कर्नाटक सरकार की स्वतःचा जीव धोक्यात घालणारे अतिउत्साही क्रिकेट चाहते? आता या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा आयोग नेमला जाईल. या आयोगाला या दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी काही महिन्यांचा अवधी दिला जाईल. तोवर मृतांच्या आणि जखमींच्या कुटुंबियांना काही लाखांची भरपाई दिली जाईल. राजकारणी नेहमीप्रमाणे एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून राजकीय पोळी भाजून घेतील मात्र मूळ प्रश्न तसाच बाजूला राहील त्यावर कोणीही बोलणार नाही. मुळात दुर्घटना घडून गेल्यावर त्याची चौकशी करण्यापेक्षा दुर्घटना घडूच नये यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. आपण आजही गर्दीचे व्यवस्थापन करण्यात कमी पडतो हे मान्यच करावे लागेल. क्षमतेपेक्षा अधिक गर्दी उसळली की त्यांचे नियंत्रण करण्यात प्रशासन अपयशी ठरते हे याआधीही अनेकदा सिद्ध झाले आहे. गर्दीचे व्यवस्थापन करण्यात आपण कमी का पडतो? याचा प्रशासनाने अभ्यास करावा. परदेशात गर्दीचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते याचा अभ्यास करण्यासाठी शासनाने अधिकाऱ्यांना परदेशात पाठवावे. भारतीय लोक उत्सव प्रिय आहेत. विशेषतः तरुणांना उत्सवात सहभागी होण्याची फार हौस असते याच हौसेतून गर्दी वाढत जाते आणि अशी दुर्घटना घडते. नागरिकांनी आपल्या उत्साहाला आवर घालण्याची नितांत गरज आहे. आपल्या जिवापेक्षा मोठे काहीही नाही हे सर्वांनी लक्षात घ्यावे. अतिउत्साह जीवावर बेतू शकतो याचे भान नागरिकांनी ठेवावे. असे भान जर नागरिकांनी ठेवले आणि प्रशासनाने गर्दीचे व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केले तर अशा दुर्घटना घडणार नाहीत आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जाणार नाही. आता झाले ते झाले पण किमान यापुढे तरी अशा दुर्घटना घडणार नाहीत याची खबरदारी प्रत्येकाने घ्यावी. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या ११ क्रिकेट चाहत्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# आठवणीत तीं...आयुष्यात तू

मनाला हवाहवासा वाटणारा तो पहाटेचा गार वारा, ती सूर्याची किरणं, तो पक्षांचा किलबिलाट आणि फुलांचा सुगंध...खरंच एखाद्या कवीला कविता सुचावी असच प्रफुल्लित वातावरण...घड्याळात सहाचा ठोका पडला आणि मला जाग आली. नको असतानाही अंथरूनावरून उठावच लागलं... स्वप्निल माझा नवरा, त्यालाही उठवलं. (दोघांनाही कामावर जायचं असल्यामुळे कामाची गडबड व्हायला नको) तेवढ्यात स्वप्निलच्या मोबाईलवर फोन आला. तो अंघोळीला गेला असल्यामुळे मी त्याला आवाज दिला, तुझा मोबाईल वाजतोय. तो म्हणाला, बघ! कुणाचा आहे? मी कॉल उचलला, पण कुणीच बोललं नाही. मला वाटल नेटवर्क नसेल कदाचित.

परत तोच नंबर...मी परत हॅलो म्हणताच कॉल कट...मी स्वप्निलला आवाज दिला, नंबर सेव्ह नाही आणि फोन उचलला की कुणीच बोलत नाही. तो म्हणाला काय नंबर आहे? मी त्याला ८७६६****६८ नंबर सांगितला. तो काहीच बोलला नाही. बाथरूम मधून बाहेर येताच मी म्हटल, कुणाचा नंबर आहे? कुणीच बोललं नाही. काही काम असेल, बोलून घे! तो थोडा हसला आणि म्हणाला, तुला खरचं नंबर माहीत नाही. मी म्हटले नाही, कुणाचा आहे? कुणी आपल्या जवळच आहे का? तो म्हणाला, जवळचा नाही पण आठवणीतला मात्र नक्कीच आहे... मी म्हटल, तुझी ती का फुग्गा... तो हसला आणि म्हणाला, हो! तीच फुग्गा... मग दोघेही मनसोक्त हसलो. मध्येच मोबाईल वाजला. मी म्हटल, बोलून घे! काही महत्वाचं असेल. तो म्हणाला, नाही...नको...राहू दे... पण माझ्या म्हणण्यावरून त्याने फोन उचलला. मी उठून कामाला लागणार तोच त्याने हात पकडून मला थांबवलं आणि फोन स्पीकरवर ठेवला. मी म्हटल, अरे तू बोल ना! मला कामं आहेत. तो इशा-याने मला बस इथेच म्हणाला... त्याने हॅलो म्हणताच तिकडून तिचा आवाज आला. कसा आहेस? ओळखलास का? तो म्हणाला मजेत आहे. ती म्हणाली कॉल कुणी उचलला, माझा नंबर सेव्ह नाही का? तो म्हणाला, नंबरची आता गरज वाटत नाही ग! आणि कॉल माझ्या बायकोने उचलला होता...तू सांग कसा काय एवढ्या वर्षाने कॉल केला? काही काम होत का? ती म्हणाली, नाही रे आठवण म्हणून केला सहज...

तो म्हणाला ठीक आहे. मला कामावर जायला उशीर होतोय, ठेवतो फोन...ती म्हणाली मला बोलावं वाटतं तुझ्याशी, तुला नाही का वाटत?...तो म्हणाला, नाही मला वेळच नसतो बोलायला. ती म्हणाली तू बदललास. तो म्हणाला, हो! वेळेनुसार प्रत्येकाला बदलावंच लागतं. ती चिडून म्हणाली, तू माझं आयुष्य बर्बाद केलंस. तो हसून म्हणाला, हे तू तुझ्या मनाला विचार...ती म्हणाली खरंच खुश आहे का तू लग्न करून?...तो म्हणाला, हो! माझ्या सारख्या फाटकं नशीब असणा-याला जीव ओवाळून प्रेम करणारी प्रेमळ आणि समजूतदार बायको मिळाली, गोंडस मुलगी आमच्या आयुष्यात आली. न मागताच एवढं सगळ पदरी पडल्यावर मी खुश का नाही असणार..?

तू देखिल तुझ्या आयुष्यात खूप पुढे जा, तुला हव ते मिळव आणि झालं गेलं विसरून जा...तिच्या बोलण्यावरून, आवाजावरून वाटलं ती खूपच चिडलेली असावी... ती रडक्या स्वरात म्हणाली किती सहज बोललास तू..? तुझ्या बायकोला जर आपलं माहीत झालं तर तुझं देखिल आयुष्य बर्बाद होईल. तुझा विचार करूनच मी बोलली नाही तुझ्या बायकोला आणि तू म्हणतोस सगळ विसरून जा... त्याने माझ्याकडे बघितलं आणि परत एकदा स्मितहास्य करत तिला बोलला, तू चिडलेली असली की तुला मी फूग्गा म्हणायचो, तू खरचं फुग्गा आहेस...अगं! तू हे जे काही बोललीस ना, ते सगळ माझ्या बायकोला आधीच माहीत आहे आणि आता देखिल ती इथे माझ्या जवळच बसलेली आहे. तुला जर तिला बोलायचं असेल तर देतो तिला फोन...

तिने घाबरलेल्या आवाजात नाही, नको म्हणत फोन कट केला...मी म्हटलं बोलत जा रे कधी फोन आला तर... तो हसत म्हणाला, आता फोन करेल असं वाटत नाही. मी मस्करी करत विचारले काय फरक आहे तिच्यात आणि माझ्यात?... तो माझा हात हातात घेत म्हणाला, ती होती आणि तू आहेस... ती फक्त आठवणीत आणि तू आयुष्यात...मी बस पुरे माझं कौतुक म्हणत त्याच्या हातातील माझा हात बाजूला करून चहाचा कप त्याच्या हातात दिला आणि दोघेही चाय पे चर्चा करत मनसोक्त हसलो...

अॅड. रक्षा नगराळे
राळेगाव
भ्रमणध्वनी ९५४५१४६९०९

# 'लव्ह जिहाद'विरोधी कायदा महाराष्ट्रात केव्हा?

'अल्पसंख्य समाजातील कट्टरतावाद हे वास्तव आहे. आपण त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. लव्ह जिहाद या संकल्पनेवर अनेकदा चर्चा केली जाते. काहींना ती अतिशयोक्ती वाटते; पण अनेक जिल्ह्यांमध्ये प्रेमाच्या नावाखाली महिला आणि मुली यांच्या शोषणाच्या घटना उघडकीस आल्या आहेत, असे विधान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच इंडियन एक्सप्रेस ग्रुपच्या एक्सप्रेस अड्डा या कार्यक्रमात बोलताना केले. 'लव्ह जिहाद' ही केवळ एका राज्याची समस्या नसून संपूर्ण भारतभरात त्याचे जाळे पसरले आहे. दरवर्षी लाखो मुली लव्ह जिहादला बळी पडत आहेत. 'दी केरळा स्टोरीज' नावाच्या चित्रपटातून लव्ह जिहादचे भीषण वास्तव्य मांडण्यात आले होते; मात्र जाणकारांच्या मते ते सुद्धा हिमनगाचे केवळ एक टोक होते. अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही लव्ह जिहादविरोधी कायदा करण्यात यावा ही मागणी गेल्या अनेक वर्षांपासून हिंदुत्ववादी संघटना, संप्रदाय आणि मंडळांकडून करण्यात येत आहे. राज्यात लवकरच लव्ह जिहाद आणि फसवणूक, बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण रोखण्यासाठी कायदा करण्यात येणार असल्याचे विधान मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीही केले आहे. त्यासाठी राज्य सरकारने पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत केली आहे. ही समिती राज्यातील सध्याच्या परिस्थितीचा अभ्यास करून लव्ह जिहाद फसवणूक आणि बळाचा वापर करून केलेले धर्मांतरण यावर उपाययोजना सुचवून कायद्याचा मसूदा तयार करणार असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र आज पाच महिने उलटून गेले तरी त्याबाबत काहीच अपडेट्स आलेल्या नाहीत. उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्यप्रदेश, उत्तराखंड, ओडिसा आणि छत्तीसगड या नऊ राज्यांनी लव्ह जिहादविरोधी कायदा अमलात आणला आहे, महाराष्ट्रात हा कायदा केव्हा लागू होणार?

वाचक लिहितात

सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी,
मुंबई



## सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

### विवाहित महिला, अविवाहित महिला आणि पुरुषांना इन्कमटॅक्स कायद्याप्रमाणे किती सोनं स्वतः जवळ बाळगता येते?

आज आपण सोनं, चांदी, ज्वेलरी बद्दल नवीन माहिती सोप्या प्रश्नात्तर रुपात बघणार आहोत, जी व्यवहारात अत्यंत उपयोगी ठरावी.

**प्रश्न : घरात महिला किंवा पुरुष किती सोन्याचे दागिने ठेवू शकतात ?**

बोर्ड सुचना नंबर १९१६ (F.NO. 286/63/93) दि. ११-०५-१९९४ अनुसार विवाहीत महिला ५०० ग्रॅम, अविवाहीत महिला २५० ग्रॅम तथा पुरुष १०० ग्रॅम सोन्याचे दागिने ठेवु शकतात.

**प्रश्न : अविवाहित पुरुष आणि विवाहित पुरुष त्यांच्या स्वत: कडे किती सोनं ठेवु शकतो ?**

इन्कमटॅक्स कायद्यात महिलांच्या बाबतीत विवाहित महिला आणि अविवाहित महिला यांना वेगवेगळे सोन्याचे दागिने ठेवण्याचे अधिकार दिले आहे. परंतु पुरुषांच्या बाबतीत इन्कमटॅक्स मध्ये विवाहित पुरुष आणि अविवाहित पुरुष यांना सोनं ठेवण्याच्या बाबतीत एकच मापदंड ठेवला आहे. म्हणून अविवाहित पुरुष यांना सुद्धा १०० ग्रॅम पर्यंत सोनं ताब्यात ठेवता येते.

**प्रश्न : अविवाहित मुलगी जर आई-वडिलासोबत राहत असेल तर तिचे सोने सी.बी.डी.टी. लिमिट मध्ये धरले जाते का नाही धरले जात ?**

वरील परिस्थिती मध्ये मुलीचं सोनं हे इन्कमटॅक्स च्या फॅमीली लिमिट मध्ये धरले जाईल.

**प्रश्न : वरील प्रश्नात जर अविवाहित बहिण ही भाऊ तथा वहिनी बरोबर राहत असेल तर तिचे सोने इन्कमटॅक्स लिमिट मध्ये धरले जाईल का ?**

वरील उत्तरा प्रमाणेच येथे सुद्धा अविवाहित बहिणीचे सोने हे फॅमीली लिमिट मध्ये धरले जाईल.

**प्रश्न : जर करदात्या बरोबर त्याचे भाऊ तथा वहिनी सोबत राहत असेल तर त्यांना इन्कमटॅक्स लिमिट चा फायदा मिळतो का ?**

वरील प्रश्नाचा सोप्या भाषेत अर्थ असा आहे की, करदात्या बरोबरच त्याच्या भावाचा परिवार सुद्धा सोबत राहत आहे. अशा वेळी या फॅमिलीला जॉईंटफॅमिली असे ही म्हणतात. अशा वेळी त्यांना इन्कमटॅक्स लिमिट चा फायदा मिळायला हरकत नाही.

**प्रश्न : नाबालिक (मायनॉर) मुलगा किंवा मुलगी असल्यास यांना इन्कमटॅक्सच्या लिमिटचा फायदा घेता येतो का ?**

होय, जर करदात्या बरोबर त्यांच्या भावाचा परिवार ही असेल तर अशा भावाच्या नाबालिक मुला-मुलीस सी.बी.डी.टी. म्हणजे इन्कमटॅक्स लिमिट चा फायदा घेता येतो.

**प्रश्न : इन्कमटॅक्स सर्क्युलर प्रमाणे फॅमीली च्या ज्वेलरी आणि आरनॅमेंट मध्ये सोन्याचे कॉईन आणि सोन्याची वीट धरली जाते का ?**

इथे इन्कमटॅक्स सर्क्युलर ला समजण्यासाठी संक्षिप्त मध्ये इन्कमटॅक्स कायदा असे समजुया. इन्कमटॅक्स कायद्या प्रमाणे सोन्याचे कॉईन तथा सोन्याची वीट हे इन्कमटॅक्सच्या एक्झेम्पशन च्या लिमिट मध्ये धरली जात नाही. सोप्या भाषेत यालाच असे म्हणता येईल की सोन्याचे दागिने आणि ज्वेलरी हेच फक्त सोन्याच्या माफी च्या लिमिट मध्ये धरले जाईल.

**प्रश्न : इन्कमटॅक्स ऑफिसर सोन्याचे नाण (कॉईन) आणि सोन्याची वीट याची जप्ती करू शकतात का? जर सोन्याची वीट आणि नाण इन्कमटॅक्सच्या दिलेल्या लिमिट मध्ये असेल तर इन्कमटॅक्स अधिकारी या सोन्याच्या नाण्याला किंवा सोन्याच्या विटेला माफी लिमिट मध्ये सोडू शकतात का ?**

इन्कमटॅक्स अधिकारी सोन्याचे नाणे किंवा सोन्याच्या विटेला जप्त करू शकतात. जरी हे नाण किंवा वीट इन्कमटॅक्स मर्यादित असेल तरी ते जप्त करू शकतात, यात शंका नाही. वरील प्रश्नात सोन्याची वीट किंवा नाण मर्यादित असेल तरी जप्त करू शकतात. परंतु त्याचे स्रोत बरोबर दाखवता आले तर मात्र अशावेळी वीट किंवा नाण जप्त करता येणार नाही. सोप्या भाषेत याचाच अर्थ असा की जर स्रोत नसेल तर जरी सोन्याचे नाणे किंवा सोन्याची वीट इन्कमटॅक्स च्या मर्यादित असेल तरी इन्कमटॅक्स ऑफिसर त्याची जप्ती करु शकतात.

पुढील आठवड्यात आपण सोन्या बद्दलची नवीन माहिती बघणार आहोत. जे व्यवहारात अत्यंत उपयोगी ठरेल. ज्या वाचकांना काही सुचना करायच्या असतील किंवा तुमचे इन्कमटॅक्स संबंधी काही प्रश्न असतील तर त्यांनी या whatsapp (९४२२२१८४२८) नंबरद्वारे फक्त message करावे, ही विनंती.

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना

# वेदांताच्या नंदघरातर्फे सार्वजनिक – खासगी क्षेत्राच्या भागिदारीतून गडचिरोलीतील १०० अंगणवाड्यांचा कायापलट केला जाणार

**गडचिरोली, ७ जून :** सर्वसमावेशक ग्रामीण विकासाच्या दिशेने लक्षणीय पाऊल पुढे टाकत अनिल अगरवाल फाउंडेशनचा प्रमुख उपक्रम नंदघरने गडचिरोलीच्या जिल्हा परिषदेसह सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या कराराअंतर्गत महाराष्ट्रातील १०० अंगणवाड्यांचे आधुनिक नंदघरात रुपांतर केले जाणार आहे. या भागिदारीला महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मूर्त स्वरूप देत सर्वात वंचित भागात विकास करण्याची राज्याची बांधिलकी दर्शवण्यात आली.



महिला आणि बालविकास विभाग, महाराष्ट्र सरकारच्या सहकार्याने हा उपक्रम सहा वर्षाखालील ३९०० मुले व १७०० स्त्रिया आणि मुलींच्या आयुष्यावर थेट परिणाम घडवून आणेल. आधुनिक केंद्रांद्वारे प्राथमिक शिक्षण, पोषक आहार, प्राथमिक आरोग्यसेवा आणि कौशल्य विकास तसेच समग्र विकासाच्या संधी पुरवल्या जातील. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या आदिवासी भागातील विकासाची दरी नाविन्य आणि सर्वसमावेशक भागिदारीद्वारे सांधण्याची बांधिलकी दर्शवणारा आहे.

आधुनिक अंगणवाडी केंद्रांमध्ये आकर्षक बीएएलए (बिल्डिंग अज अ लर्निंग एड), डिझाइन्स, एलईडी टीव्ही ई लर्निंग, मुलांसाठी सोयीस्कर फर्निचर आणि पिण्याचे सुरक्षित पाणी, वीज व स्वच्छता अशा वैशिष्ट्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या व्हिजनशी सुसंगत राहात महाराष्ट्र सरकार प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य व पोषण मिळेल यासाठी प्रयत्नशील असून स्त्रियांना कौशल्यविकास, अर्थार्जनाच्या संधी आणि संपूर्ण विकासाद्वारे सक्षम केले जात आहे. गडचिरोलीतील १०० अंगणवाड्यांचे नंदघरात रुपांतर करण्यातून सार्वजनिक– खासगी क्षेत्रात किती मजबूत भागिदारी होऊ शकते हे दर्शवणारे आहे. अशाप्रकारचे उपक्रम महाराष्ट्रभरात राबवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.

हे नंदघर दिवसभरात दोन टप्प्यात काम करतील. सकाळी मुलांचे प्राथमिक शिक्षण आणि पोषणावर भर दिला जाईल, तर दुपारी समाजकेंद्रित उपक्रमांवर भर असेल. त्यामध्ये ०० गरोदर स्त्रिया आणि स्तनदा माता व १०० मुलींसाठी आरोग्य जागरूकता सत्रे, लघु उद्योग वर्कशॉप्स आणि कौशल्य विकास यांच्यावर भर असेल. यातून त्यांना स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी मदत केली जाईल.

हिंदुस्थान झिंक लि. च्या अध्यक्ष आणि वेदांता लि.च्या नॉन– एक्झक्युटिव्ह संचालक प्रिया अगरवाल हेब्बर नंदघरच्या विस्ताराच्या अग्रणी असून या प्रकल्पाच्या दीर्घकालीन परिणामाविषयी त्या म्हणाल्या, प्रत्येक मुलाला शिकण्यासाठी आणि प्रत्येक स्त्रीला विकास करण्यासाठी योग्य संधीची गरज असते. गडचिरोली येथे नंदघर लाँच करण्यातून आम्ही कित्येक पिढ्यांपासून अस्तित्वात असलेली दरी सांधण्यासाठी अर्थपूर्ण पाऊल उचलत आहोत. समाज कल्याणासाठी आम्ही बांधील आहोत तसेच राज्य सरकारच्या मदतीने ग्रामीण महाराष्ट्रातील स्त्रिया व मुलांचे आरोग्य, पोषण व शिक्षणात सुधारणा घडण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

# अदानी ग्रुपने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये ७४,९४५ कोटी कर भरला

**अहमदाबाद, ७ जून :** आर्थिक वर्ष २०२५ साठी अदानी ग्रुपने त्यांच्या सूचीबद्ध कंपन्यांद्वारे सरकारकडे एकूण ७४,९४५ कोटींचं योगदान दिलं आहे, जी मागील वर्षीच्या ५८,१०४ कोटींपेक्षा २९ टक्क्यांनी जास्त आहे.

या एकूण ७४,९४५ कोटी योगदानामध्ये, थेट योगदान २८,७२० कोटी, अप्रत्यक्ष योगदान ४५,४०७ कोटी आणि इतर योगदान ८१८ कोटी इतकं होतं.

हे उदाहरण देताना सांगितलं जातं की, ७४,९४५ कोटी ही रक्कम मुंबई मेट्रो संपूर्ण तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाएवढी आहेही मेट्रो लाखो लोकांसाठी एक जीवनवाहिनी आहे. ही रक्कम आधुनिक ऑलिंपिक स्पर्धा आयोजित करण्यासाठीही पुरेशी आहे.




अदानी ग्रुपच्या सूचीबद्ध कंपन्यांपैकी प्रमुख योगदान देणाऱ्या कंपन्यांमध्ये अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड, अदानी सिमेंट लिमिटेड, अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन आणि अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड यांचा समावेश आहे.

या एकूण योगदानाची सविस्तर माहिती ग्रुपच्या सात सूचीबद्ध कंपन्यांनी प्रकाशित केलेल्या स्वतंत्र वार्षिक अहवालांमध्ये समाविष्ट आहे. या कंपन्या म्हणजे अदानी एंटरप्रायझेस लिमिटेड, अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड, अदानी ग्रीन एनर्जी लिमिटेड, अदानी एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड, अदानी पॉवर लिमिटेड, अदानी टोटल गॅस लिमिटेड आणि अँबुजा सिमेंट्स लिमिटेड. या आकड्यामध्ये एनडीटीव्ही, एसीसी आणि संगी इंडस्ट्रीज या तीन कंपन्यांनी भरलेला करही समाविष्ट आहे, या कंपन्या वरील सात कंपन्यांच्या मालकीच्या आहेत.

ग्रुपने बेसिस ऑफ प्रिपरेशन अँड अप्रोच टू टॅक्स नावाचा एक दस्तऐवजही त्यांच्या सात कंपन्यांच्या वेबसाइटवर प्रसिद्ध केला आहे, ज्यात अदानी ग्रुपच्या जागतिक कर आणि इतर योगदानाचं संपूर्ण तपशीलवार विश्लेषण दिलं आहे. यामध्ये समावेश आहे:

* थेट योगदान ज्यामध्ये अदानी पोर्टफोलिओमधील कंपन्यांनी दिलेले जागतिक कर, शुल्कं आणि इतर देयकं समाविष्ट आहेत
* अप्रत्यक्ष योगदान ज्यामध्ये इतर संबंधित पक्षांसाठी संकलित करून भरलेले जागतिक कर आणि शुल्कं
* इतर योगदान जसे की कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी भरलेले सोशल सिक्युरिटी यांसारखे योगदान

अदानी ग्रुप कर पारदर्शकतेला त्यांच्या व्यापक ईएसजी (पर्यावरण, सामाजिक आणि प्रशासन) फ्रेमवर्कचा महत्त्वाचा भाग मानतो. या स्वेच्छेच्या उपक्रमाद्वारे ग्रुप पारदर्शकतेबाबतची आपली बांधिलकी दाखवू इच्छितो, हितधारकांचा विश्वास वाढवू इच्छितो आणि जागतिक कर व्यवस्थेत अधिक जबाबदारी निर्माण करायला मदत करतो. ग्रुप समाजिक जबाबदारीसोबत विकास यांचं संतुलन राखण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यामुळे भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्राचा कायापालट करता येईल आणि नवोन्मेषाला चालना देत दीर्घकालीन मूल्यनिर्मिती करता येईल.

# बायरकडून बिकोटा ही भातपिकातील खोडकिडीच्या प्रतिबंधासाठी नावीन्यपूर्ण उपाययोजना बाजारात




**नागपूर, ७ जून :** बायर या शेती आणि आरोग्यसेवा या जीवविज्ञान शाखांमधील एका आघाडीच्या कंपनीने भातपीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना खोडकिडीचा सामना करण्यासाठी सक्षम करण्यासाठी बिकेटा या नवीन उत्पादनाची घोषणा केली आहे. या धोकादायक कीटकापासून उत्तम संरक्षण देण्यासाठी बिकोटामध्ये बायरच्या विशेष संशोधनाचा समावेश करण्यात आला आहे. बिकोटा जून २०२५ पासून पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, पश्चिम उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा यासह प्रमुख भात उत्पादक राज्यांमध्ये उपलब्ध होईल.

या अनावरणप्रसंगी बोलताना बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारताचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले, बायर आपल्या नवनवीन शोधांद्वारे शेतकऱ्यांचे जीवन सोपे करण्याचा प्रयत्न करत राहते. बिकोटाच्या माध्यमातून आम्ही केवळ भात उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाचे संरक्षण करणारी उपाययोजना देत नाही तर त्यांचा वेळ आणि मजुरीचा खर्चदेखील वाचवणे आणि त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न सुधारण्यास मदत करतो.

बिकोटा वापरण्यास आणि मित्र कीटकांसाठी सुरक्षित आहे. त्यामुळे ते शेतकऱ्यांसाठी एक आदर्श पर्याय ठरते आणि एकात्मिक कीटक व्यवस्थापन (आयपीएम) पद्धतींमध्ये देखील उत्तमरित्या समाविष्ट होते. त्याचे सूक्ष्म सूत्रीकरण वापर सुलभ बनवते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात या औषधाचा एकसमान फवारा करणे शक्य होते.

# फोनपेतर्फे नव्या फीचर फोन वापरकर्त्यांसाठी युपीआय पेमेंट सेवा सुरू होणार

**मुंबई, ७ जून :** फोनपे लिमिटेडने (फोनपे), गपशप या संवादाधारित डिजिटल प्लॅटफॉर्मकडून त्यांच्या 'जीएसपे' या खास तंत्रज्ञान स्टॅकचे हक्क विकत घेतल्याची घोषणा केली. फीचर फोनसाठी युपीआय पेमेंट सुलभ करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येईल.




जीएसपे हे नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या (एनपीसीआय) युपीआय १२३पे प्रणालीवर आधारित एक मोबाईल ॲप्लिकेशन आहे. फीचर फोनवरून युपीआय पेमेंट करता येण्यासाठी हे प्लिकेशन डिझाइन करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून फोनपे पुढील काही तिमाहींमध्ये नव्या फीचर फोनसाठी स्वतःचे फीचर फोन–आधारित युपीआय ॲप सादर करण्याची योजना आखत आहे.

फीचर फोन युजरनादेखील सर्व मूलभूत युपीआय सेवा म्हणजे दुसऱ्या व्यक्तीला पैसे पाठवणे(पी२पी), क्यूआर कोड स्कॅन करून इंटरनेटशिवाय पेमेंट करणे, आणि इतर कोणत्याही युपीआय युजरकडून स्वतःच्या मोबाइल नंबर किंवा सेल्फ–क्यूआरवर पैसे स्वीकारणे इत्यादी सेवा सहजपणे वापरता याव्यात, हे फोनपेचे उद्दिष्ट आहे. फीचर फोन आणि स्मार्टफोन वापरणाऱ्यांमध्ये सहज आणि विनाअडथळा व्यवहार होऊ शकतील, अशी सुविधा तयार करणे आणि अजूनही फीचर फोन वापरत असलेल्या कोट्यवधी लोकांना भारतीय डिजिटल पेमेंटच्या इकोसिस्टीममध्ये सामावून घेणे, ही फोनपेची महत्त्वाकांक्षा आहे.

या संपादनाबद्दल फोनपेचे सहसंस्थापक व सीईओ समीर निगम म्हणाले, जीएसपे टेक्नॉलॉजी स्टॅक संपादन करण्याबद्दल आणि फीचर फोन वापरणाऱ्या भारतीयांसाठी युपीआय पेमेंट सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्याचा वापर करण्याबद्दल आम्ही अत्यंत उत्साहात आहोत. या युजर सेगमेंटकडे डिजिटल फायनान्शियल उद्योगाचे आणि व्यापक स्टार्टअप इकोसिस्टिमचे दुर्लक्ष झाले होते. या नव्या सुविधेच्या माध्यमातून भारतातील वेगाने वाढणाऱ्या डिजिटल पेमेंट मार्केटमध्ये सहभागी होण्यासाठी कोट्यवधी फीचर फोन युजरना सक्षम करू शकू, अशी आम्हाला आशा आहे.

औद्योगिक आकडेवारीनुसार २०२४ मध्ये भारतात सुमारे २४ कोटी फीचर फोन युजर होते आणि पुढील पाच वर्षांत अजून सुमारे १५ कोटी फीचर फोनची शिपमेंट अपेक्षित आहे. आतापर्यंत जे युजर डिजिटल पेमेंट इकोसिस्टिममध्ये समाविष्ट नव्हते त्यांना या प्रवाहात घेऊन येण्याची आणि या माध्यमातून आर्थिक सर्वसमावेशकतेला चालना देण्याची ही एक उत्तम संधी आहे.




# शिक्षण आणि आरोग्यसेवा उपक्रमांद्वारे आरबीएल बँक नागपुरातील समुदायांना सक्षम बनवते

**नागपूर, ७ जून :** भारतातील खासगी क्षेत्रातील आघाडीच्या बँकांपैकी एक असलेल्या आरबीएल बँकेने आज नागपुरात त्यांचे प्रमुख सीएसआर उपक्रम – उमीद आणि धन्वंतरी यांचे आयोजन केले. एकाच दिवशी या दोन प्रभावी कार्यक्रमांचे आयोजन करून, बँकेने शहरातील वंचित समुदायांसाठी शिक्षण तसेच आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याची आपली वचनबद्धता आणखी दृढ केली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (मुख्य पाहुणे) उपस्थित होते. या कार्यक्रमाला बालकृष्णन नटराजन (प्रमुख सीएसआर), अन्शुल चांडक (प्रमुख – ट्रेझरी) आणि रोहित अग्रवाल (प्रमुख – फिगू) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच आरबीएल बँकेचे वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते.

त्याचसोबत, आरबीएल बँकेने त्यांच्या धन्वंतरी उपक्रमाद्वारे नागपुरात घरगुती आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना सेवा देण्यासाठी मोबाइल हेल्थकेअर व्हॅन सुरू केल्या. ही आरोग्यसेवा मोहीम ६ ते ८ जून २०२५ पर्यंत चालेल. यात मोलकरीण, ड्रायव्हर्स, सुरक्षा कर्मचारी, हाऊसकीपिंग कर्मचारी आणि इतर ब्लू–कॉलर कामगारांसह १२०० हून अधिक लाभार्थ्यांचा समावेश असेल. मोबाइल व्हॅनमधून मोफत आरोग्य तपासणी, दृष्टी मूल्यांकन, डॉक्टरांचा सल्ला आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेबद्दल शिक्षण प्रदान करतील. दृष्टी, पोषण आणि दीर्घकालीन जीवनशैलीच्या परिस्थितीशी संबंधित सामान्य परंतु अनेकदा दुर्लक्षित आरोग्य समस्या सोडवण्यासाठी हा कार्यक्रम तयार केला आहे. लवकर निदान करून तसेच योग्य ती काळजी घेऊन, राष्ट्राचा कणा असलेल्या लोकांचे कल्याण आणि जीवनमान सुधारण्याचा प्रयत्न आरबीएल बँक करते.

आरबीएल बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ आर. सुब्रमण्यकुमार म्हणाले, आम्ही आमच्या विचारशील आणि शाश्वत सीएसआर उपक्रमांद्वारे समाजात प्रभावी बदल घडवून आणण्यासाठी वचनबद्ध आहोत. आम्हाला खात्री आहे की, खरी प्रगती मागास किंवा दुर्लक्षित असलेल्यांना सक्षम बनवून होते. आमच्या सीएसआर उपक्रमांद्वारे, तरुण मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणारी प्रवासातील आव्हाने दूर करण्यासाठी तसेच ज्यांना आरोग्यसेवेची सर्वाधिक गरज आहे त्यांना ती उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शिक्षण आणि आरोग्यसेवेच्या संधी खरोखरच प्रत्येकाच्या आवाक्यात असतील अशा समावेशक समाजाची निर्मिती करण्याच्या आमच्या दृष्टिकोनाचे नागपूरमधील कार्यक्रम प्रतिनिधित्व करतो.

# शेतकऱ्यांचा गरजा लक्षात आधुनिक द्रव्य खते सादर

**यवतमाळ, ७ जून :** भारतीय शेतकऱ्यांचा गरजा लक्षात घेता आणि टिकाऊ शेतीय दृष्टीकोनाचा उद्देश्याने डीसीएम श्रीराम लि.च्या विभाग असलेल्या श्रीराम फ़ार्म सोल्युशन्स ने त्यांची नव्या युगातील विशेष वनस्पती पोषण उत्पादने श्रीराम पिकासोल आणि श्रीराम मैगनिका दाखल केली आहेत.

पेटंट केलेल्या तंत्रज्ञानाचा माध्यमाने दोन्ही उत्पादने बायोक्टिव टायटॅनियम असलेली भारतातील पहिलीच उत्पादने आहेत. टायटॅनियममुळे वनस्पतीचा पर्यावरणाप्रती असलेला प्रतिकार वाढतो, ज्यामुळे वनस्पतीची आवश्यक पोषण घेण्याची क्षमता सुधारते आणि शेतकऱ्याला चांगले पीक मिळते. श्रीराम पिकासोल चा प्रमुख हेतू हा फ़ळाचा रंग आणि आकाराचा समानतेवर भर देण्याचा आहे तर श्रीराम मैगनिकाचा हेतू हा फ़ळातील त्रुटी कमी करून त्याचे आयुष्य वाढविण्याचा आहे– ज्या दोन्ही निर्यात आणि प्रिमियम बाजारपेठांमधील कठीण अशा समस्या आहेत.

समूहाचे कार्यकारी संचालक आणि व्यवसायिक प्रमुख असलेले संजय छाब्रा यावेळी म्हणाले, श्रीराम फ़ार्म सोल्युशन्स हा शेतीय कल्पकतेमध्ये स्वत:ला अधिकाधिक सक्षम बनवत असताना, या नव्या युगाची उत्पादने कंपनीची विज्ञानावर उपाय योजना देऊन शेतकऱ्यांना सबळबनविण्याची बांधिलकी दर्शवून देतात, ही उत्पादने त्यांचा वाढत्या गरजा आणि टिकाऊ शेतीय सवयींसंदर्भातील गरजा देखील भागवतात.

# ब्रेन ट्युमरच्या रुग्णांची वाढती संख्या बघता जनजागृती आवश्यक : डॉ. कार्तिक मुलतानी

**नागपूर, ७ जून :** ब्रेन ट्युमरबाबत लोकांमध्ये अद्यापही पुरेशी जागरूकता नाही, त्यामुळे निदान उशिरा होऊन उपचारात अडथळा येतो. ब्रेन ट्युमरच्या रुग्णांची वाढती संख्या बघता मोठ्या प्रमाणात जनजागृती आवश्यक असल्याचे मत वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील ब्रेन ट्युमर सर्जरी स्पेशालिस्ट आणि टाटा मेमोरिअल हॉस्पिटलचे न्यूरो–ऑन्कोलॉजी फेलोशिपधारक डॉ. कार्तिक मुलतानी यांनी व्यक्त केले आहे.

डॉ. मुलतानी म्हणाले की, सतत डोकेदुखी, उलटी होणे, झटके येणे, दृष्टी कमजोर होणे, बोलताना तोंड अडखळणे, हातापायात कमजोरी जाणवणे यांसारखी लक्षणे अनेकदा सामान्य समजून दुर्लक्षित केली जातात. परंतु ट्युमर सौम्य असो की गंभीर, वेळीच निदान झाले तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली शस्त्रक्रिया यशस्वी ठरू शकते. ब्रेन ट्युमरची लक्षणे इतर सामान्य आजारांसारखी वाटत असल्याने रुग्ण वेळेवर डॉक्टरांकडे जात नाहीत. वारंवार होणारी डोकेदुखी, अकारण येणाऱ्या उलट्या, झटके, स्वभावात बदल, बोलण्यात बदल, अडखळणं किंवा शरीराचा तोल जाणं ही लक्षणे दिसल्यास एमआरआय करून न्यूरोसर्जनचा सल्ला घेणे आवश्यक असल्याची माहिती वोक्हार्ट हॉस्पिटल्स नागपूरतर्फे देण्यात आली.


वोक्हार्ट हॉस्पिटल्समध्ये डॉ. कार्तिक मुलतानी यांच्या नेतृत्वाखाली ब्रेन ट्युमर सर्जरीसाठी प्रगत उपकरणांचा वापर केला जातो. त्यामध्ये इन्ट्राऑपरेटिव्ह अल्ट्रासाऊंड (शस्त्रक्रियेदरम्यान मार्गदर्शनासाठी), फ्लुओरेसिन–गाईडेड सर्जरी (ट्युमर सेल व सामान्य सेल यामधील फरक समजण्यासाठी), इन्ट्राऑपरेटिव्ह न्यूरोमॉनिटरिंग (आयओएनएम) (मेंदूच्या संवेदनशील भागांचे संरक्षण) आणि एंडोस्कोपिक ट्युमर रीसक्शन यांचा समावेश आहे.

विदर्भातील एकमेव न्यूरो–ऑन्कोलॉजी फेलोशिपधारक डॉक्टर डॉ. कार्तिक मुलतानी हे विदर्भ आणि मध्य भारतातील एकमेव न्यूरोसर्जन आहेत ज्यांनी टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमधून न्यूरो–ऑन्कोलॉजीचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. त्यामुळे ते अत्यंत गुंतागुंतीच्या ब्रेन ट्युमर सर्जरी अचूकतेने आणि सुरक्षितपणे करतात.



ब्रेन ट्युमरवर उपचार घेण्यास अनेकांना भीती वाटते, तसेच समाजात याबाबत गैरसमजही आहेत. जनजागृती आणि वेळीच निदान झाल्यास रुग्णांचे आयुष्य वाचू शकते आणि उपचार अधिक प्रभावी होतात, असे डॉ. मुलतानी यांचे म्हणणे आहे. ब्रेन ट्युमरचे गांभीर्य लक्षात घेता वोक्हार्ट हॉस्पिटल्सतर्फे आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशी तज्ञांची टीम रुग्णांना सहानुभूतीपूर्ण उपचार देण्यात अग्रणी आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथे सर्व सुविधा २४७ उपलब्ध असतात.

# शब्दकोडे क्रमांक २१३१



**आडवे शब्द :–**
१) दुसऱ्याकरता खर्च करणे
५) कायदेशीर
९) अंगरखा
११) पंच, मध्यस्थ
१२) चरबी
१४) मगज
१५) अत्यंत मऊ कापडप्रकार
१७) दृष्टीभेट,
२०) काव्य
२१) धाप, धमकी
२३) मनाचा ओढा
२४) वेदनेची उसळी
२५) मोहित होणे, फिदा होणे
२६) प्रामाणिक, साधा
२८) कीव
३०) उपयोगात आणणे,
३२) मला
३३) पटुत्व, कौशल्य
३४) चलाख, हुशार
३६) सापाने टाकलेली त्वचा
३७) घाव, दिवस
३८) धान्य (हिं)
३९) राजवाडा
४०) तफवत, भेद
४१) नवा कोरा
४४) अरण्य
४६) स्तुती करणारा
४७) झाकण असलेले पात्र
४९) ताजा, नव्या दमाचा
५१) रस्ता
५२) शीतल
५३) माळी
५५) निर्बंध नसलेला, स्वच्छंदी
५७) मला
५८) हमाल
६०) चौक
६१) रक्षण करणारा
६३) सवड, फुरसत, अवकाश
६५) माळ, हार
६६) समुद्र
६७) संगीतातील एक राग
६९) पृथ्वी
७१) रम्य
७३) रोग पसरविणारा किटक
७४) मीठ
७६) च्यासह
७८) सत्वांश
८०) स्त्री , बाई
८१) टरफल
८२) पालव
८३) व्यापारी फायदा

**उभे शब्द :–**
१) सैनिकांची तुकडी
२) औषध
३) सुळे
४) डमरू, डौर,
६) गाव, शहर
७) किंमत
८) रंजन करणे, रंजविणे
९) सारखा
१०) चिखलाची जमीन
१३) सरबत इ पेय
१६) वल्लरी
१८) ढग, लवकर
१९) पायाला भेगा पडण्याचा आजार
२०) समजणे
२२) चर्चा
२५) हिंदुस्थान
२६) एक कोल्हापुरी दागिना
२७) किरकोळ सामान
२९) वेदना
३१) तपासनीस
३२) मनाने, मनातल्या मनात
३३) बासरी
३५) धोबी
३६) गोजी, पाडी, जनावराचे पिल्लू
३८) ऐटबाज, गर्विष्ठ
३९) रात्रीचा पाऊस
४२) दात
४३) पद्धतीप्रमाणे
४५) नकल करणारा
४६) गुणाकाराच्या विरुद्धची क्रिया
४८) उपवन
५०) नष्ट, पराभूत
५१) मोठी पसरट वाटी
५४) हवेचे आवरण
५६) कावळा
५७) दहावी रास
५८) वजन, बोजा
५९) गंध
६०) शहाणा, सुसंस्कृत
६२) क्षमा करण्याचा स्वभाव
६४) खरगोश
६६) धैर्य, हिंमत
६८) एक द्विदल धान्य
७०) छिद्र
७२) चाकर
७३) सामान, वस्तू
७५) बारा महिन्याचा काळ
७६) मनाला टोचणारे दुःख
७७) गाडीचे छत
७९) चंपक,

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल: प्रेरणादायक कथाकथनाची आणि देशभरातल्या कुटुंबांना आपल्याशा वाटणाऱ्या पात्रांची ३ वर्षे!

**मुंबई, ७जून :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही केवळ एक टेलिव्हिजन मालिका राहलेली नाही. हा एक असा प्रवास आहे, जो देशातल्या लक्षावधी लोकांनी पुष्पा आणि तिच्या घरच्यांच्या सोबतीने केला आहे. हृदयस्पर्शी कथानक आणि चार–चौघांसारखी पात्रे असलेल्या या मालिकेने सामान्य लोकांची स्वप्ने, त्यांचे संघर्ष आणि यश सुंदर पद्धतीने टिपले आहे. या मालिकेने तीन वर्षांचा प्रवास पूर्ण केला आहे. अजूनही ही मालिका प्रेक्षकांना आपलीशी वाटते आणि त्यांना प्रेरित करते.




या लोकप्रिय कथानकाच्या केंद्रस्थानी पुष्पा (करुणा पांडे) ही व्यक्तिरेखा आहे. करुणा पांडेच्या प्रामाणिक अभिनयाने पुष्पाच्या भूमिकेत जीव ओतला आहे. पुष्पा एक सिंगल मदर आहे पण तिच्यात चिकाटी, हुशारी आणि हिंमत आहे. अंशुल त्रिवेदी (जुगल), जयेश मोरे (दिलीप), गरिमा परिहार (दीप्ती) दर्शन गुर्जर (चिराग), देशना दुगड (राशी) आणि नवीन पंडिता (अश्विन) या गुणी कलाकार संचामुळे मालिकेची मोहिनी आणखी वाढते. हे सगळे कलाकार मिळून माणसांचे एक असे जग उभे करतात, जिथले लोक प्रेमळ आहेत, ते एकमेकांना मदत करतात, त्यांच्यात मानवी दोषही आहेत, आणि त्यांच्यातील नाती हळूहळू प्रगल्भ होत जातात. त्यांच्या परफॉर्मन्समुळे प्रेक्षकांशी त्यांचे नाते जुळले आहे. अनेक कुटुंबांसाठी पुष्पा इम्पॉसिबल हा त्यांच्या दिवासतला अविभाज्य भाग बनला आहे.

कथाकथनाचा निडर दृष्टिकोन पुष्पा इम्पॉसिबल मालिकेला इतर मालिकांपेक्षा उठावदार बनवते. महिला शिक्षणापासून ते दुसरी संधी आणि मानसिक आरोग्य यांसारख्या संबद्ध विषयांना ही मालिका स्पर्श करते, पण तरीही पात्रांची वैयक्तिक कथा वेधकपणे सांगते. हा मोठा टप्पा पार केल्याचा आनंद साजरा करत असताना ही मालिका प्रेक्षकांना या प्रेरणादायक कथानकाचे सोबती होण्यासाठी आमंत्रित करत आहे. ही अशी कथा आहे, जेथे हिंमत आहे, तर करुणा देखील आहे आणि सामान्य जीवनाचे येथे असामान्य कथेत रूपांतर होते!

# कलाकार सांगत आहेत संस्मरणीय ईद साजरीकरणाबाबत!

**मुंबई, ७ जून :** ईद अल–अधा हा त्याग, कृतज्ञता आणि करुणेच्या भावनेसह लोकांना एकत्र आणणारा सण आहे. अनेकांसाठी हा सण धार्मिक विधी आणि मेजवानीचा आनंद देण्यासोबत वर्षानुवर्षे संस्मरणीय आठवणींना देखील निर्माण करतो, यामध्ये विशेषतः बालपणीच्या गोड आठवणी असतात. एण्ड टीव्हीवरील कलाकार आठवणींना उजाळा देत आहेत आणि या सणाशी संबंधित त्यांच्या काही गोड क्षणांबाबत सांगत आहेत. कलाकार रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है') आणि सोनल पनवार (मलायका सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') मित्र व शेजाऱ्यांसोबत बकरी ईद साजरी करण्याचे क्षण, उत्साहाने भरलेल्या आठवणी, स्वादिष्ट फूड आणि हृदयस्पर्शी संबंधांबाबत सांगत आहेत, जे त्यांना आजही उत्साहात सण साजरा करण्यास प्रेरित करतात.

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील सोनल पनवार ऊर्फ मलायका सिंग म्हणाल्या, ''मी लहानाची मोठी होत असताना माझ्या शेजारी उत्साहात ईद सण साजरा करायचे. मी बकरी ईदची (ईद अल–अधा) उत्सुकतेने वाट पाहायची, कारण मला माझ्या शेजाऱ्याच्या काकीच्या घरी जायला मिळायचे, जेथे सर्वत्र उत्साहाचे व उत्सवाचे वातावरण असायचे. त्या विविध पकवान बनवायच्या आणि मी किचनमध्ये त्यांच्या बाजूला उभी राहून शेकडो प्रश्न विचारायची. हळूहळू, मी त्यांच्याकडून शीर कुर्मा व बिर्याणी बनवायला शिकले आणि आजही, मी हे खाद्यपदार्थ बनवण्याचा प्रयत्न करते. या पाककला करताना मला त्या सुंदर क्षणांची आठवण येते. आजही, मी वेळ मिळाल्यास ईदच्या दरम्यान त्यांना भेटते आणि त्या मुलीप्रमाणे माझे स्वागत करतात. माझ्यासाठी ईद म्हणजे नात्यांचे साजरीकरण, ज्यासोबत आपण जन्मलो आहोत आणि काळासह दृढ होते. हा सण दयाळूपणा, फूड, प्रेम आणि शेअर केल्या जाणाऱ्या आनंदाबाबत आहे. सर्वांना ईद मुबारक!'' मालिका 'भाबीजी घर पर है'मधील रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले,



''शिमलामधील माझ्या शालेय व कॉलेजच्या दिवसांदरम्यान माझे जिवलग मित्र होते, जे प्रेम, उत्साहात आणि सर्वांसोबत ईद सण साजरा करायचे. ते नेहमी मी त्यांच्या साजरीकरणामध्ये सामील होण्याची खात्री घ्यायचे. मला आजही आठवते, ते मोठ्या आनंदाने त्यांच्या घरी माझे स्वागत करायचे, गळाभेट घ्यायचे आणि सर्वत्र शीर कुर्माचा सुगंध पसरलेला असायचा. आम्ही एकत्र बसायचो, गप्पागोष्टी करायचो आणि उत्सवी मिष्टान्नांचा आस्वाद घ्यायचो. ते आनंद व एकतेचे क्षण होते. मी मालिका 'भाबीजी घर पर है'च्या सेटवर देखील ईद साजरीकरणाचा आनंद घेतो. माझे सह–कलाकार व जिवलग मित्र आसिफ शेख आणि सलिम झैदी उत्साहात सण साजरा करतात, नेहमी उत्सव साजरीकरणामध्ये संपूर्ण टीमला सामील करतात. आम्ही लंच ब्रेकदरम्यान एकत्र आल्यानंतर एकता व आनंदाची भावना दिसून येते, तसेच आम्ही त्यांनी घरामधून आणलेल्या खास मेजवानीचा आस्वाद घेतो. मी या वर्षी देखील मिष्टान्नांचा आस्वाद घेण्यासाठी उत्सुक आहे. सर्वांना ईद मुबारक!''

# मिहान येथे पहिल्यांदाच आयोजित केलेल्या टाउनशिप ज्वेलरी प्रदर्शनाचा यशस्वी समारोप



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : रोकडे ज्वेलर्स, जे विश्वास, परंपरा आणि शाश्वत सौंदर्य यांचे प्रतीक मानले जातात, त्यांनी फर्स्ट सिटी, मिहान, नागपूर या निवासी टाउनशिपमध्ये आपले पहिले ज्वेलरी प्रदर्शन यशस्वीरित्या पार पाडले आहे. ७ आणि ८ जून रोजी आयोजित या दोन दिवसीय प्रदर्शनाला फर्स्ट सिटीमधील रहिवासी आणि पाहुण्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन ७ जून रोजी क्लब हाऊसमध्ये झाले आणि यामध्ये ज्वेलसूत्र -एक शिल्पकलेचा उत्सव या संकल्पनेखाली रोकडे ज्वेलर्सचे उत्कृष्ट सोनं, हिरे आणि पारंपरिक दागिन्यांचे सादरीकरण करण्यात आले. या ऐतिहासिक पावलाने रोकडे ज्वेलर्सने आपल्या परंपरेला समुदायांपर्यंत अधिक वैयक्तिक आणि जिव्हाळ्याच्या पद्धतीने नेण्याची सुरुवात केली आहे. हे प्रदर्शन केवळ आकर्षक दागिन्यांचे दर्शन नव्हते, तर एका विश्वसनीय ब्रँड आणि ग्राहक यांच्यातील नात्याचा एक सुंदर उत्सव होता. रोकडे ज्वेलर्सच्या व्यवस्थापनाने फर्स्ट सिटी व्यवस्थापन समिती तसेच सर्व पाहुण्यांचे मन:पूर्वक आभार मानले ज्यांच्या सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. इतक्या आत्मीय आणि उबदार वातावरणात आमची शिल्पकला सादर करणे हा आमच्यासाठी गौरवाचा क्षण होता. मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे आम्ही आनंदित आहोत आणि अशाच सामुदायिक उपक्रमांची पुढेही वाट पाहत आहोत. या विशेष प्रसंगी ग्राहकांना अधिक आनंद देण्यासाठी रोकडे ज्वेलर्स एक खास ऑफर घेऊन आले आहेत: सोनं व चांदीच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर २५% सूट हिंर्यांच्या दागिन्यांवर मेकिंग

## रोकडे ज्वेलर्सने फर्स्ट सिटी

चार्जेस पूर्णपणे मोफत (१००% सूट) रोकडे ज्वेलर्स फर्स्ट सिटी, मिहान येथील सर्व रहिवासी आणि कार्यक्रमाला साथ देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानतात आणि नवोपक्रम, विश्वास आणि दर्जा याबाबतची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित करतात. इतक्या आत्मीय आणि उबदार वातावरणात आमची शिल्पकला सादर करणे हा आमच्यासाठी गौरवाचा क्षण होता. मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे आम्ही आनंदित आहोत आणि अशाच सामुदायिक उपक्रमांची पुढेही वाट पाहत आहोत. या विशेष प्रसंगी ग्राहकांना अधिक आनंद देण्यासाठी रोकडे ज्वेलर्स एक खास ऑफर घेऊन आले आहेत:

# नगर पंचायत बहादुरा येथे 'प्रशासन आपल्या दारी'



हिंगणा (ता ७): पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार बहादुरा नगर पंचायत कार्यक्षेत्र अंतर्गत बहादुरा, खरबी व गोन्हीसिम येथील विकास कामे, पावसाळ्या मध्ये होणाऱ्या समस्या जाणून घेणे, स्वच्छता विषयक बाबी, विद्युत समस्या, भूमिगत नाली, बांधकाम, अतिक्रमण व इतर कामांविषयी नागरिकांकडून आलेल्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता' प्रशासन आपल्या दारी ' अभियान राबविण्यात आले.

आज मौजा गोन्हीसिम वार्ड क्र. १ येथील क्षेत्रातील विविध समस्या समजून घेण्याकरिता नगर पंचायत बहादुरा येथील प्रशासक तथा मुख्याधिकारी राजेन्द्र चिखलखुंदे, प्रशाकीय अधिकारी सागर ठाकरे, पाणी पुरवठा अभियंता श्रीकांत समर्थ, शहर अभियंता अक्षय झिरपे, सहाय्यक नगर रचनाकार योगेश डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते रमेश कुरळकर, राजू ढोमणे, राधीकाताई ढोमणे, विजय नाखरे, सतीश यादव, व विविध विभागातील कर्मचारी यांनी वार्ड क्र. १ मधील गजानन सभागृह येथे उपस्थित राहून नागरिकांचे समस्या जाणून घेतल्या असून सदर ठिकाणी मोहीम दरम्यान नागरिकांनी विविध विषयाबाबत एकूण ४५ अर्ज सादर केले असून अनेक नागरिकांनी त्यांच्या अडचणीबाबत मौखिकरित्या अवगत केले.

तसेच ३६ ठिकाणी मुख्याधीकारी व सर्व विभाग प्रमुख यांच्यासह प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली व संपूर्ण प्राप्त झालेल्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्याकरिता मुख्याधिकारी यांनी संबंधित विभाग प्रमुख यांना सूचित केले.

# आदर्श चौरसिया लेडीज क्लब नागपूर तर्फे जागतिक पर्यावरण दिन साजरा



नागपुर: आदर्श चौरसिया लेडीज क्लब नागपूरने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धंतोली पार्कमध्ये अध्यक्षा मीरा राकेश चौरसिया यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थापक अध्यक्षा सरिता विजय यांच्या उपस्थितीत आणि माजी अध्यक्षा शर्मिला गगंन आणि अनुराधा नरेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत एक सामाजिक कार्य कार्यक्रम आयोजित केला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली आणि त्यानंतर सदस्य मित्रांनी कविता, घोषणा, व्याख्याने देऊन आणि पर्यावरणाशी संबंधित त्यांचे विचार व्यक्त करून आपण पर्यावरणाचे रक्षण कसे करावे याबदल मार्गदर्शन केले. धंतोली पार्कच्या नयनरम्य हिरव्यागार वातावरणात विविध प्रकारचे खेळ आणि हाऊसींचा आनंद घेण्यात आला. बरखा विनिता आणि अनुराधा नरेंद्र या खेळांमध्ये प्रथम आल्या. कार्यक्रमाच्या समन्वयक बरखा विनिता होत्या आणि नेहा मुकेश यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमात मोठ्या संख्येने सदस्य मित्र उपस्थित होते. मीरा राकेश, शर्मिला गगन, अनुराधा नरेंद्र, कीर्ती जितेंद्र,बरखा, नेहा मुकेश ,इंदिरा शैलेश,भारती , कामिनी करमचंद ,शकुंतला ,विजय ,कांचन ,शिल्पा मनीष,सोनिया जितेंद्र ,अर्चना मेहर आणि इतर मित्र विशेष उपस्थित होते.स्वादिष्ट फराळ आणि आईस्क्रीम देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# विना परवाना वाहतूक करणारा टाटा कंपनीचा वाहन जप्त ,आरोपी अटक



■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान , दि. ७ : कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत खंडाळा घटाटे कडुन कन्हान कडे अवैधरित्या चोरीच्या वाळुची वाहतुक करणाऱ्या टाटा कंपनीचा वाहनाला पोलीसांनी जप्त करुन कारवाईत एका आरोपीला ताब्यात घेऊन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. प्राप्त माहिती नुसार मंगळवार (दि.७) जुन रोजी दुपारी कन्हान पोलीस अवैध धंध्यावर कारवाई करणे कामी पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात आकाश सिरसाट , आतिश मानवटकर सह अन्य पोलीस कर्मचारी परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली कि खंडाळा घटाटे कडुन कन्हान कडे टाटा कंपनीचा छोता हाती वाहना मध्ये अवैधरित्या चोरीच्या वाळुची वाहतुक होत आहे .

अशा मिळालेल्या माहिती वरुन पोलीसांनी गहुहिवरा रेल्वे पुलावर नाकाबंदी केली असता टाटा कंपनीचा छोटा हाती वाहन क्रमांक एम एच ४० बी.जी. ९११३हा वाळु वाहतुक करतांनी मिळुन आल्याने पोलीसांनी त्यास थांबवुन वाहनाची पाहणी केली असता वाळु दिसुन आली. वाहन चालक अजय दिलीप पानतावने (वय २८) रा.खंडाळा याला वाळु बाबत कागदपत्रे विचारले असता त्यांने कुठल्याही प्रकारचे कागदपत्रे परवाना नसल्याचे सांगितले . पोलीसांनी वाहन चालकास ताब्यात घेऊन त्याचा जवळुन १/२ ब्रास वाळु किंमत २५०० रुपये आणि टाटा कंपनीचा वाहन किंमत ३,००,००० रुपए असा एकुण ३,०२,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे .



# कळमेश्वरात मुस्लिम बांधवांची ईद उत्साहात

■ महासागर प्रतिनिधी,
कळमेश्वर, दि. ७ : कळमेश्वरसह तालुक्यात आज मुस्लिम बांधवांनी बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी केली. आज सकाळी ७.३०वा.येथील जामा मस्जिद येथे मौलाना इस्राईल नूरी यांनी ईदुल अजहा यांची नमाज अदा केली. यावेळी या नमाज पठण मध्ये ताजमोहम्मद बाबू , शेखजी शेख , नबीबाबा , बबलू शेख , अतावुला बाबा शेख , तुराब शेख , सय्यद भाई , समीर भाई सेट , गुड्डु भाई, जसीम भाई, रशीद शेख, युनुस भाई, जावेद कय्यूम शेख, इरफान भाई, इकबाल मालाधारी , शेख? जमीर, दिलदार शेख, अरमान शेख,अहमद कलाम , हासिम शेख, सबिरभाई शेख, जहीर सेट, रियाज भाई, नावेद शेख, समीर शेख, तालीब शेख, फिरोज पठान आदींसह मुस्लिम समाजातील सुमारे १२५ समाज बाधवांचा सहभाग होता.

# वेकोलीने येथे 'जागतिक पर्यावरण दिन' उत्सवात साजरा



नागपुर: वेकोली टीमने कंपनी मुख्यालयात वृक्षारोपण करून जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. या पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणूनसीएमडी जे. पी. द्विवेदी उपस्थित होते. संचालक तांत्रिक (ऑपरेशन्स) ए. के. सिंह, संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक तांत्रिक (नियोजन/प्रकल्प) आनंद प्रसाद आणि संचालक (वित्त) डॉ. हेमंत शरद पांडे हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात, सीएमडी जे. पी. द्विवेदी यांनी पर्यावरण संरक्षणासाठी वेकोलीने केलेल्या विविध कामांबद्दल सविस्तरपणे सांगितले. ते म्हणाले की वर्षातील प्रत्येक दिवशी प्रत्येकाने पर्यावरण संरक्षणाबद्दल जागरूक राहावे आणि त्या दिशेने सकारात्मक योगदान द्यावे. त्यांनी सर्वांना पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याचे आवाहन केले. द्विवेदी यांनी डब्लू सी एल मध्ये कोळसा मंत्रालयाच्या 'एक पेड माँ के नाम' मोहिमेचा शुभारंभ केला. ही विशेष वृक्षारोपण मोहीम डब्लू सी एलच्या मुख्यालयासह सर्व भागात ५ जून ते ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत राबविली जाईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला, डब्लू सी एल चे सीएमडी जे.पी. द्विवेदी यांनी पर्यावरण ध्वज फडकावला आणि कर्मचाऱ्यांना पर्यावरण संरक्षण आणि प्रोत्साहनाची शपथ दिली. त्यानंतर, कोल इंडिया लिमिटेडचे ??अध्यक्ष पीएम प्रसाद यांचा पर्यावरण दिनाचा संदेश महाव्यवस्थापक (पर्यावरण) पीएम लोखंडे यांनी वाचून दाखवला. पर्यावरण दिनानिमित्त विविध स्पर्धांमधील विजेत्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. त्यानंतर, सर्व पाहुण्यांनी वृक्षारोपण केले . याप्रसंगी, महाव्यवस्थापक, विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मिलिंद चहांडे, व्यवस्थापक (जनसंपर्क) यांनी केले.

# फार्मसी कर्मचाऱ्याने दिली टिप अभ्यंकर मार्गावरील लुटीचा पर्दाफाश, ३ आरोपी अटकेत

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : अभ्यंकर मार्गावर लुटीची एक घटना घडली होती. दुचाकीस्वार दोन आरोपींनी एका कलेक्शन एजंटला चाकूचा धाक दाखवून ७० हजारांची रोकड आणि महत्त्वाची कागदपत्रे लुटली होती. धंतोली पोलिसांनी तक्रार मिळताच घटनेचा तपास सुरू केला आणि काही तासांतच तुषार उर्फ धरमा रंजित मेश्राम (२०) रा. जुनी फुटाळा वस्ती याला अटक केली होती. चौकशीत तुषारने साथीदार समीर विजय कावळे (२२) रा. आदिवासीनगर, गोरेवाडा रोड याच्यासोबत मिळून गुन्ह्याची कबुली दिली. तसेच फार्मसीच्या कर्मचाऱ्याकडून या लुटीची टिप मिळाल्याचे सांगितले. पोलिसांनी समीर कावळे आणि टिप देणारा आरोपी अमन दादाराव तोडसाम (२४) रा. फुटाळा या दोघांनाही अटक केली.

फिर्यादी पवन सुरेश नरांजे (३८) रा. कुंजीलालपेठ हे एसआयएस प्रोसेसर कंपनीत काम करतात. त्यांच्याकडे शहरातील वेगवेगळ्या व्यापाऱ्यांकडून रक्कम गोळा करण्याचे आणि ती रक्कम बँकेत जमा करण्याचे काम आहे. ३ जून रोजी पवनने धंतोलीच्या गेटवेल रुग्णालयाच्या फार्मसीतून ७० हजार रुपये घेतले. ती रोकड घेऊन ते बँकेत जमा करण्यासाठी जात होते. रस्त्यात दोन तरुणांनी त्यांना अडविले. चाकूचा धाक दाखवून मारण्याची धमकी देत आवश्यक कागदपत्र आणि रोकड लुटून फरार झाले. पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

## फार्मसीतून निघताच दिली सूचना

**अमन हा गेटवेल रुग्णालयाच्या फार्मसीत काम करतो. पवन दररोज फार्मसीत येऊन रक्कम गोळा करीत असल्याची माहिती त्याला होती. त्याने समीरला पवनकडे जवळपास ४ ते ५ लाखांची रोकड राहात असल्याची माहिती दिली. समीरने तुषारसोबत मिळून लुटीची योजना बनवली. फार्मसीतून निघताच अमनने आरोपींना सूचना दिली आणि पवनला लुटण्यात आले. समीरविरुद्ध जबरी चोरीसह अनेक गंभीर गुन्हे नोंद आहेत. त्याला जुगाराचेही व्यसन आहे. व्यसन भागवण्यासाठी तो चोरी आणि वाटमारी करतो. ही कारवाई वपोनि अनामिका मिर्झापुरे, सपोनि संकेत चौधरी, पोउपनि धनाजी मारकवाड, पोहवा सुभाष वासाडे, योगेश चांभारे, अमोल लोणकर, मनोज सोनवणे, माणिक दहीफळे, उत्तर सरकटे, भुवनेश्वर मोहोड, ऋषभ निशितकर आणि विक्रमसिंग ठाकूर यांनी केली.**

आसपासच्या परिसरातील जवळ १०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासण्यात आली. यामध्ये आरोपींच्या वाहनाची माहिती मिळाली. पोलिसांनी सर्वात आधी तुषारला ताब्यात घेतले. त्याने साथीदार समीरच्या मदतीने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून लुटलेल्या रकमेतील ३० हजार रुपये आणि गुन्ह्यात वापरलेले दुचाकी वाहन जप्त केले. सखोल चौकशीत आरोपींनी अमनचे नाव सांगितले.

# पर्यावरण दिनानिमित्त, कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातफ पर्यावरण दिवस साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे विद्युत विहार वसाहत येथे, विशेष वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, राधाकृष्णन बी. तसेच कार्यकारी संचालक (सं व सु -२) राजेश पाटील आणि उपस्थित मुख्य अभियंते यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण मोहिमे मध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, या प्रसंगी विविध जातींच्या झाडांचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करताना मान्यवरांनी सांगितले की, 'झाडे केवळ छाया देत नाहीत तर ते प्रदूषण नियंत्रण कार्यासाठी महत्वाचे असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जैवविविधतेचे संरक्षण व संतुलित ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पर्यावरण दिन हा दिवस पृथ्वीच्या संरक्षणासाठी जनजागृती करण्याचा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे, महानिर्मितीमध्ये कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमात वृक्षारोपण करून निसर्गाच्या रक्षणाचा संदेश देण्यात आला व त्या अनुषंगाने पाऊले उचलावी असे आवाहन केले. कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे, विद्युत विहार वसाहतीमध्ये दिनांक १३-जानेवारी-२०२५ पासून, भव्य वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात करण्यात आली होती, या मोहिमे दरम्यान, एकाच क्लस्टर मध्ये आंबा, आवळा, बदाम, जांभुळ आणि फणस अश्या अनेक फळझाडांची लागवड करण्यात आली असून सुमारे ८,००० (आठ हजार) वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, त्या ठिकाणी सुद्धा मान्यवरांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. आज जे रोपटे आपण लावले आहे, ते उद्या मोठे वृक्ष होऊन भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवामान आणि हरित आवरण देतील असे नमूद करून, एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि संगोपन करीत असल्याबद्दल सर्व संबंधितांचे कौतुक केले. कोराडी वीज केंद्राचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी, यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत, वृक्ष लागवड करून पर्यावरणासाठी जबाबदारीची जाणीव व्यक्त केली.

यासह मान्यवरांनी, कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील, राख हाताळणी यंत्रणा व्यवस्था, फ्लाय अ?श, बॉटम अ?श आणि राख बंड प्रणालीच्या कामकाजाची पाहणी केली. त्यांनी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर (एडझ), बॉटम अ?श डिस्चार्ज व्यवस्था, फ्लाय अ?श सिस्टीम, तसेच राख वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गेहो पंप हाऊसची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणी दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रणालीच्या कार्यक्षमतेचा आढावा घेतला आणि राख व्यवस्थापनात कार्यक्षम, पर्यावरणपूरक व शाश्वत पद्धतीचा अवलंब करण्यावर भर दिला. वीज केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त केले आणि सुरक्षा, पर्यावरण व नैसर्गिक संसाधनांच्या जपणुकीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

# द्रुगधामना उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेजमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात



वाडी, ६ जुन: येथील श्री साई ताज पॉलिटेक्निक, उदय फिजिओथेरपी मेडिकल कॉलेज व पार्श्वनाथ पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम सुप्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. रश्मी मुरारकर यांनी वृक्षारोपण केले. सोबतच संस्थेचे संचालक उदय टेकाडे, संचालिका डॉ. अनिता टेकाडे, प्राचार्या डॉ. रश्मी माहुलकर ,डॉ. सुप्रिया तांबे प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून वृक्ष सवंर्धन करण्याची शपथ घेतली. प्रास्ताविकतेमधुन संचालक उदय टेकाडे यांनी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे या विषयावर मार्गदर्शन केले.

संचालन रिया कोहळे व प्रणय खैरे यांनी तर आभार डॉ. रश्मी माहुलकर यांनी मानले. आयोजनासाठी प्रणय खैरे, ओंकार मडावी, आचल गुरनुळे, अनुश्री राठोड, आयुषी कापगते, ध्रुव छांगाणी, गरिश्मा लोणारे, हिमांशू ढोले, आलिशा शेख, साक्षी मदनकर व सलोनी खोब्रागडे तसेच प्राध्यापक व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# जागतिक पर्यावरण दिना निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

कन्हान : जागतिक पर्यावरण दिन निमित्त नगर पंचायत कांद्री (कन्हान) शहरात सुभाष पुतळा परिसर , आंबेडकर पुतळा परिसर येथे वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमासाठी मुख्याधिकारी श्री. सचिन गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास नगर पंचायतचे कार्यालय अधीक्षक प्रसाद शितोळे, कर व प्रशासकीय अधिकारी संजयकुमार शिंदे, लेखापाल स्वप्नील बनसोडे, स्वच्छता निरीक्षक विनोद मेहरोलिया, शहर समन्वयक चंदा वैद्य, बेबीनंदा लिंगायत,सोनू मधुमटके,संदीप खरे, संतोष मधुमटके, बाबुराव मनघटे, ईश्वरदास चौरपगार, सुरज वलामे, महेंद्र मेश्राम ज्ञानेश्वर वैद्य, रितीक कनोजे, संदीप खरे, नेहा भुसारी,कैलास आकरे, रवी आकरे, शिवा ठाकरे व इतर सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**कार्यक्रमाचेउद्दिष्ट:** पर्यावरण संवर्धन व प्रदूषण नियंत्रण हरित क्षेत्र वाढवणे व तापमान कमी करणे पुढच्या पिढीसाठी स्वच्छ व निरोगी पर्यावरण तयार करणे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना वृक्षसंवर्धनाचे वचन देण्यात आले तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून हरित शपथ घेण्यात आली. शेवटी, नगर पंचायत कडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले की त्यांनी आपल्या परिसरात कमीत कमी एक झाड लावावे आणि त्याची देखभाल करावी. हे एक पाऊल भविष्यासाठी मोठा बदल घडवू शकते.

# कुशीनारा बुद्ध विहारात भिक्खू संघाची बैठक,महाबोधी सहित विविध विषयावर चर्चा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ : अखिल भारतीय भिक्खू संघाचे विदर्भ प्रदेशचे अध्यक्ष भंते प्रियदर्शी महाथेरो यांच्या अध्यक्षतेखाली न्यू कैलास नगरातील कुशीनारा बुद्ध विहार परिसरात भिक्खू संघाच्या बैठकी चे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन, भिक्खू संघाची भूमिका, नागपुरातील विविध विहारांच्या समस्या, भिक्खूंच्या समस्या, भिक्खू व उपासक यांचा समन्वय आदी विषयावर चर्चा करण्यात आल्या. या बैठकीला प्रामुख्याने महाथेरो रेवतबोधी, महाथेरो ज्ञानबोधी, महाथेरो धम्मज्योती, महाथेरो धम्मसेवक, महाथेरो प्रज्ञाज्योती, महाथेरो धम्मोदय, महाथेरो धम्मरक्षित, महाथेरो संघकीर्ती, महाथेरो जीवक, भंते डी संघानंद, भंते धम्मरक्षित, भंते सुमंगल, भंते संघानंद, भंते नागदीप, भंते संघरत्न, भंते संघकीर्ती, भंते जीवक, भंते तीस, भंते प्रज्ञानंद, भंते परंपदा, भंते मनोरथ, भंते अशोक बोधी, भंते धम्मरथ आदी भिक्खू प्रामुख्याने उपस्थित होते.

**भंते डॉ धम्मोदय यांचा सत्कार**

यात्रसंगी अखिल भारतीय भिक्खू संघ, कुशिनारा बुद्ध विहार समिती, कुशिनारा बुद्ध विहार महिला मंडळ, त्रिरत्न धम्मराईज मिशन, कुशिनारा बुद्ध विहार चारिटेबल ट्रस्ट, तथागत धम्मप्रचार संघ आदींच्या वतीने डॉ भदंत धम्मोदय महास्थवीर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. डॉ धम्मोदय यांनी भिक्खू जीवनात राहून अनेक ठिकाणी बुद्ध विहारे व अनाथालयाची निर्मिती केली. समाजात बंधुभाव वाढवण्यासाठी कार्य केले, त्यामुळे नागरिकांच्या वतीने केक कापून व चीवर देऊन डॉ धम्मोदय महाथेरो यांचा सत्कार करण्यात आला. यात्रसंगी भंते धम्मोदय यांनी भिक्खू संघाला वस्तूंचे व नागरिकांना भोजनदान दिले.

या कार्यक्रमाचे आयोजनासाठी उत्तम शेवडे, चंद्रशेखर केळझरे, विजय पाटील, रुपेश डांगे, अजय भगत, रमेश पाटील, वंदेव पाटील, संजय ढोबळे, शत्रुघ्न धन, संतोष कांबळे, रवींद्र पाटील, सुशील रावडे, दिव्यांशू कांबळे, नीलिमा हजारे, करुणा पाटील, ममता केळझरे, शमा कांबळे, प्रतिभा मेश्राम, उषा घोटेकर, प्रभा पाटील, वर्षा पाटील, रीता बगले, विशाखा धनविजय आदींनी विशेष परिश्रम घेतले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९१२२९७००२३/७४४७७३५८५३

# भक्तिमार्ग

भक्ती विशेष

## सत्यवानांना समज यावी

**आपल्या संस्कृतीत साजऱ्या होणाऱ्या बहुसंख्य सणांमध्ये स्त्रीने व्रतवैकल्यं करणं आणि पुरुषांच्या प्रगती आणि उन्नतीसाठी प्रार्थना करणं अपेक्षित आहे. वटपौर्णिमा हा सणही त्याला अपवाद नाही. आजही अनेक सावित्री पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाला प्रदक्षिणा घालतात. पण कोणा सावित्रीने हे उपचार नाकारले तर तिच्या पतीप्रेमावर शंका घेण्याची मानसिकता त्यागायला हवी. आता सत्यवानांनी अधिक**



पतीला परमेश्वर मानणारी आपली संस्कृती आहे. आपण तिचा सन्मान करतो आणि या विचाराने साजरा होणाऱ्या प्रत्येक सणाचा आनंद लुटतो. सहचर्याच्या पुरातन कल्पनांमध्ये लहानग्यांना विवाहबंधनात अडकवण्याची पद्धत होती. बालविवाह, लहान मुलीशी प्रौढाचा विवाह, प्रौढ विवाह, विधवा विवाह अशा पायऱ्या पार करत आजची कुटुंबव्यवस्था स्थिरावली आहे. पण बदलाची प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. कुटुंबव्यवस्थेची चौकट ओलांडून लिव्ह इन कडे वळणारा तरुण वर्ग याची ग्वाही देतो. या नव्या आणि बदलत्या व्यवस्थेत एखाद्या माणसाला देवत्वाचा दर्जा देण्यासारखा भाबडेपणा अथवा भोळेपणा दिसत नाही, म्हणूनच या जमान्यात वटपौर्णिमेसारख्या सणाचं महत्त्व काय हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय रहात नाही. या सणामध्ये पती–पत्नीमधील प्रेमाचा दाखला दिला आहे. सावित्री आपल्या जीवाची बाजी लावून पतीचे प्राण हरण करणाऱ्या यमाचा पाठलाग करते. बुद्धिकौशल्याने संवादात त्याच्यावर मात करते आणि पतीचे प्राण परत आणते. म्हटलं तर ही प्रीतीकथा आहे आणि म्हटलं तर अतिरंजित कल्पनाविलास आहे. या घटनेची स्मृती म्हणून वर्षानुवर्षे बायका वडाला फेऱ्या घालत आल्या आहेत. वडाला प्रदक्षिणा घालून दोरा गुंडाळायचा, घरोघरी आंब्याचं वाण द्यायचं, सवाष्णींची ओटी भरायची आणि जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून देवाला प्रार्थना करायची हा या सणानिमित्त पार पडणारा उपचार. आजवर विवाहित स्त्रिया डोळे झाकून या सणाकडे बघत राहिल्या आणि घरातील वडिलधाऱ्या स्त्रियांनी सांगितलेले सगळे उपचार पार पाडत राहिल्या.

आजची स्त्री मात्र झापडबंद अवस्थेतून बाहेर पडली आहे. पती हा परमेश्वर नसून आपला चांगला मित्र असावा या भावनेने ती विवाहबंधन स्वीकारत आहे. आता ती आपली त्यागमूर्ती ही प्रतिमा त्यागू इच्छित आहे. पती हेच अस्मितेचं केंद्र न राहता स्वत्व गवसलेल्या आजच्या स्त्रीला अनेक अस्मिता केंद्रं भुलवत आहे. एका अर्थी भावना आणि व्यवहार याची सुरेख सांगड घालण्यात आजची स्त्री यशस्वी ठरली आहे. म्हणूनच कदाचित सत्यवान–सावित्रीच्या कथेने ती प्रभावित होणार नाही. वडाला दोरे गुंडाळणार नाही. पण याचा अर्थ तिच्या मनात पतीप्रेम नाही अथवा परंपरांचं पालन करण्यास ती अक्षम आहे असं नाही. बदलत्या परिस्थितीतील तिचे बदललेले विचार, तिने गाठलेली यशशिखरे, तिच्या विस्तारत्या कार्यकक्षा या सर्वांचाच मागोवा घ्यायला हवा. इतकं सगळं करुनही प्रत्येक भारतीय स्त्री आपल्या कुटुंबाशीच जोडलेली असते. पक्षिणी आकाशी विहरत असली तरी तिचं चित्त घरट्यापाशी असतं. याच धर्तीवर प्रत्येक भारतीय स्त्रीचा मर्मबिंदू पती आणि तिचं घर याशिवाय दुसरा नसतो. म्हणूनच श्रद्धा, उपचार, पूजाअर्चा या चौकटीतून बाहेर पडून विचारांची सहमती, प्रतिकूल परिस्थितीमध्ये एकमेकांची साथ, एकमेकांशी जोपासलेलं मैत्र या नव्या पैलूंनी पतीपत्नीमधील नात्याचा विचार करायला हवा. कदाचित वटपौर्णिमच्या सणाचा देखील हाच सांगावा असेल.


कार्यक्षेत्र सीमित असताना किंबहुना उंबऱ्याच्या आतच विश्व समावलेलं असताना प्रत्येक प्रकारच्या सुरक्षेसाठी पूर्वीची सावित्री पतीवर अवलंबून असायची. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. आज जवळपास प्रत्येक प्रांतात त्यांनी भरारी घेतली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अंतराळविज्ञान, अर्थविश्व, परराष्ट्र धोरण, संरक्षण, वन्यप्राणी संशोधन आदी क्षेत्रांमध्ये महिलांनी जोरदार मुसंडी मारल्याचं दिसत आहे. पुरुषांच्या बरोबरीने त्या कामगिरी बजावत आहेत. कुस्तीपासून बॉक्सिंगपर्यंत कोणताही क्रीडा प्रकार तिला वर्ज्य नाही. तिची यशोगाथा कुंठित नाही तर प्रवाही आहे.

अलिकडेच स्त्रियांना सामावून घेण्यासाठी एक नवं अवकाश सिद्ध झालं आहे. आत्तापर्यंत लष्करामध्ये स्त्रियांचा सहभाग असला तरी तो सीमित होता. लष्करामध्ये स्त्रिया वैद्यकीय, कायदा, इंजिनिअरिंग आदी क्षेत्रांमध्येच सहभागी होऊ शकायच्या. मात्र आता त्यांच्यासाठी प्रत्यक्ष रणभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. भारताच्या लष्कर प्रमुखांनी या स्वरुपाची घोषणा केल्यानंतर अनेक युवतींच्या मनात वीरश्री जागी झाली असेल. महिलांनी लष्करामध्ये पाऊल ठेऊन बरीच वर्षे उलटली. नेव्ही कमांडर पुनीत अरोरा, १९६८ च्या वायूदलातील पहिल्या महिला अधिकारी पद्मावती बंडोपाध्याय, काबूलमध्ये भारतीय दूतावासानजीक झालेल्या हल्ल्यावेळी दोन किलोमीटर धावत जाऊन १९ अधिकाऱ्यांची सुटका करणाऱ्या लेफ्टनंट मधुमिता, लष्कर प्रमुखांना पत्र लिहून महिलांच्या लष्कर प्रवेशाविषयी आग्रह धरणाऱ्या आणि आपल्यासह २४ कॅडेटला लष्कराची कवाडं उघडून देणाऱ्या प्रिया झिंगाल अशी अनेक नावं उदाहरणादाखल देता येतील. प्रिया सेमवाल हे असंच एक नाव आहे. युद्धभूमीवर पती शहीद झालेला, पदरात चार वर्षांचं मूल... मात्र या रणरागिणीने पती निधनाचं दु:ख बाजूला ठेवलं आणि देशाची सेवा करण्यासाठी ती लष्करात दाखल झाली. स्वाती सिंग या नथूला पासवर तैनात तुकडीतील एकमेव महिला होत्या. त्यांनी अत्यंत प्रभावीपणे कम्युनिकेशची जबाबदारी सांभाळली. गूंजन सक्सेना या लष्करातील महिलेने कारगिल युद्धादरम्यान हेलिकॉप्टरद्वारे जवानांपर्यंत रसद पोहचवण्याचं काम अत्यंत धाडसाने पार पाडलं. आजमितीस वायूदलामध्ये ८.३० टक्के महिला आहेत. नौदलामध्ये ४१३ महिला अधिकारी पदावर आहेत. मध्यंतरी फायटर प्लेनच्या पायलट म्हणूनही महिलांसाठी संधी उपलब्ध झाल्या. आता प्रत्यक्ष युद्धभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी मिळणार असल्यामुळे महिलांसाठी एक नवं पर्व सुरु होणार आहे.

एकंदरच आता स्त्रीचं विश्व घराच्या चार भिंतींपर्यंत मर्यादित राहिलेलं नाही. असं असताना तिने घरातल्या एखाद्या जबाबदारीकडे दुर्लक्ष केलं अथवा स्वत: न पार पाडता मदतनीसांकडून ते काम करुन घेतलं तर दोष देता कामा नये. पुरुषांनी हा बदल स्वीकारायलाच हवा. तिने इतकी वर्षे मनोभावे पतीसेवा आणि कुटुंबसेवा केली. अखेरच्या क्षणापर्यंत केवळ कुटुंबाचाच विचार केला. आता तिला स्वत:चं अवकाश गवसलेलं असताना पुरुषांनी पुढाकार घेण्याची आणि तिला आवश्यक ती मोकळीक देण्याची गरज आहे. अगदी कौटुंबिक पातळीपासून वैश्विक पातळीपर्यंत पुरुषी मनोवृत्तीत हा बदल घडायला हवा. हाच खरा सावित्रीचा सन्मान असेल. कारण आजही स्त्री वरिष्ठांकडे पाहण्याची पुरुषांची मनोवृत्ती पूर्वग्रहदूषित आहे. घरात आपलं वर्चस्व असावं या भावनेने पछाडलेला पुरुष कार्यालयात एखाद्या कर्तबगार स्त्रीला आपल्यापुढे जाताना पाहू शकत नाही. इतकंच नव्हे तर सर्वच क्षमतांच्या बाबतीत उणा असणारा पुरुष एखाद्या स्त्री वरिष्ठाने दिलेल्या आज्ञांचं पालन करताना आतून डिवचला जातो. माहिती–तंत्रज्ञान क्षेत्रातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या काही घटनांद्वारे ही पुरुषी मनोवृत्ती प्रकर्षाने पुढे आली आहे. घरामध्ये पुरुषांना स्त्रीचं उत्पन्न हवं आहे मात्र अधिकार देण्याची वेळ आली की ते मागे हटतात. पुरुषांनी ही दांभिकता आता सोडायला हवी. पती पत्नी ही कुटुंबाची दोन चाकं असतात त्याप्रमाणे पुरुष आणि महिला ही समाजाची दोन चाकं असतात. आता ही दोन चाकं समान पातळीवर, समान वेगाने, समान क्षमतेने धावण्यास सज्ज आहेत. त्याचा लाभ घ्यायला हवा. वैयक्तिक हेवेदावे, फुकाचा अहंगंड, वर्चस्वाच्या कल्पित भावना या सर्वांपलिकडे जाऊन एक माणूस म्हणून स्त्रीचा स्वीकार करणं आणि तिला तिच्या कार्यक्षेत्रामध्ये मनाजोगतं काम करु देणं हे प्रत्येक पुरुषाचं कर्तव्य आहे. आत्तापर्यंत अनेक सावित्रींनी स्वत:ला सिद्ध केलं आहे. तेव्हा आता सत्यवानांची वेळ आहे...

## अंगी सहनशीलता हवी

बोध



आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अंगी सहिष्णूता बाणायला हवी. सहिष्णूतेचं महत्त्व आपण कथेतून जाणून घेऊ या... महात्मा सरयूदास यांचा जन्म गुजरातमधल्या पारडी गावात झाला होता. भोगीलाल हे त्यांचं पाळण्यातलं नाव होतं. लहानपणी त्यांना शेजारी राहणाऱ्या बजा भगत यांची साथ मिळाली. सरयूदास मामाच्या घरी राहून त्यांचा व्यवसाय सांभाळत असत. काही काळानंतर सरयूदास यांचा विवाह झाला पण त्यांची पत्नी फार काळ जिवंत राहू शकली नाही. एके दिवशी सरयूदास रेल्वेने प्रवास करत होते. गाडीत प्रचंड गर्दी होती. मुंगी शिरायलाही जागा नव्हती. त्याच वेळी त्यांच्या शेजारी उंच आणि मजबूत बांध्याचा माणूस येऊन बसला. तो सरयूदासांना वारंवार पाय मारत होता. सरयूदास त्याला म्हणाले की, तुझा पाय दुखतोय का? या वेदनांची तीव्रता समजून घेण्यासाठी तू मला वारंवार पाय मारतो आहेस ना? अजिबात संकोच करू नकोस. मला तुझी सेवा करण्याची संधी दे. असं म्हणत त्यांनी त्या माणसाचा पाय मांडीवर ठेवला आणि कुरवाळू लागले.

सरयूदासांच्या या वर्तनाने त्या माणसाला लाजल्यासारखं झालं. तो सरयूदासांची क्षमा मागू लागला. त्यांना म्हणला, तुम्ही महान आहात. माझी चूक झाली. मला क्षमा करा. तुम्ही महात्मा आहात. मला आत्ता याची जाणीव झाली आहे. माणसाने सहनशीलता अंगी जोपासली पाहिजे. हाच गुण माणसाला प्रगतीपथावर घेऊन जातो. सरयूदासांकडून आपल्याला हाच बोधा घेता येईल.

## कशी करावी पूजा?



जाणून घ्या

प्रत्येक धार्मिक व्यक्तीच्या घरात देवघर असतं. घरात पूजाप्रार्थनाही केली जाते. पण कळत–नकळत होणाऱ्या काही चुकांमुळे आपल्याला इच्छित लाभ मिळत नाहीत. पूजा अर्चनेचं योग्य फळ मिळण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

* देवघरातल्या मूर्तींचा आकार फार मोठा असू नये. देवघरातलं शिवलिंग हाताच्या अंगठ्यापेक्षा मोठं असू नये. शिवलिंगाचं पूजन करताना अनेक नियमांचं पालन करावं लागतं. त्यामुळे छोटं शिवलिंग योग्य ठरतं. तसंच इतर देवांच्या मूर्तीही छोट्या असायला हव्यात.

* पूजा करणाऱ्याचं तोंड पश्चिमेला असेल तर अधिक लाभ मिळतात. यासाठी देवघराचं तोंड पूर्वेकडे असायला हवं. पूजा करणाऱ्या व्यक्तीचं तोंड पूर्वेकडे असलं तरी चांगले लाभ मिळू शकतील.

* देवघर असलेल्या ठिकाणी भरपूर प्रकाश असला पाहिजे. दिवसातला काही काळ तरी सूर्यकिरणं या ठिकाणी पोहोचली पाहिजेत. हवाही खेळती असायला हवी. सूर्याच्या ऊर्जेमुळे वातावरणातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते.

* घरात देवघर असेल तर सकाळ संध्याकाळ पूजा करायला हवी. देवपूजा करताना घंटा वाजवा. घरभर घंटेचा आवाज निनादू द्या. घंटेच्या आवाजामुळे घरातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

* देवाला ताजी फूलं अर्पण करा. तसंच पूजनासाठी भरलेलं पाणीही ताजं हवं. तुळशीची पानं आणि गंगाजल कधीही शिळं होत नाही. त्यामुळे त्याचा वापर कधीही करता येतो. वास घेतलेलं किंवा खराब फूल देवाला अर्पण करू नये.

* देवघराच्या ठिकाणी चामड्याच्या वस्तू, पादत्राणं नेऊ नये तसंच देवघरात पूर्वजांचे तसंच मृत व्यक्तीचे फोटो असू नयेत. घरात दक्षिणेकडच्या भिंतीवर मृत व्यक्तींचे फोटो लावता येतील.


* देवघराच्या आसपास शौचालय असू नये.

* दररोज रात्री देवघर पडद्याने झाकून टाका. यामुळे देवाच्या विश्रांतीत बाधा येत नाही.

## श्रीखंड महादेव यात्रा

तीर्थक्षेत्र

हिंदू धर्मानुसार अनेक धार्मिक यात्रा पुण्यादायी मानण्यात आल्या आहेत. कैलास–मानसरोवर, अमरनाथ, चार धाम, नर्मदा परिक्रमा अशा यात्रा करून पुण्य पदरात पाडून घेण्याचा भाविकांचा उद्देश असतो. हिमाचल प्रदेशमधल्या श्रीखंड महादेवाच्या दर्शनासाठी जाणारी श्रीखंड महादेव यात्राही पुण्यदायी मानली जाते. जून–जुलै महिन्यात या यात्रेचं आयोजन केलं जातं. या यात्रेविषयी...



* हिमाचल प्रदेशमधल्या द ग्रेट हिमायलन राष्ट्रीय उद्यान–जवळ श्रीखंड महादेवाचं मंदिर आहे. इथल्या पर्वत शिखरावर साक्षात महादेवाचा वास असल्याचं इथली मंडळी मानतात.

* या मंदिरातलं शिवलिंग ७२ फूट उंच आहे. हे स्थान निसर्गरम्य असून हिरवाईने नटलेल्या वळणावळणाच्या रस्त्याने ही यात्रा करायची असते. या काळात इथलं वातावरण खूप आल्हाददायी असतं.

* ही यात्रा पूर्ण करण्यासाठी तब्बल १८,५७० फूट अंतर पार करावं लागतं. अमरनाथप्रमाणे ही यात्राही कठिण मानली जाते. पण भोलेबाबाच्या नावाचा जयघोष करत भाविक ही यात्रा पूर्ण करतात.

* या काळात ऑक्सिजनची कमरता जाणवते. त्यामुळे श्वसनाचा त्रास किंवा हृदयविकार असलेल्यांनी यात्रेआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

* या यात्रेला पौराणिक महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार या स्थानी भस्मासूराचा वध झाला. भस्मासूर नावाच्या राक्षसाने शंकराला प्रसन्न करून घेऊन ज्याच्या डोक्यावर आपण हात ठेऊ, तो भस्म होईल असा वर मागून घेतला होता. यामुळे भस्मासूर खूप मातला होता. या भस्मासूराला पार्वतीशी विवाह करण्याची इच्छा झाली. शंकराच्या डोक्यावर हात ठेऊन त्यालाच भस्म करण्याचं कारस्थान भस्मासूराच्या डोक्यात शिजू लागलं. त्याच वेळी विष्णूने मोहिनी रूप घेऊन भस्मासूरासोबत नृत्य केलं आणि त्याला स्वत:च्याच डोक्यावर हात ठेवायला भाग पाडलं. यामुळे भस्मासूर जळून नष्ट झाला. हे स्थान श्रीखंड महादेव मंदिराच्या जवळ असल्याचं बोललं जातं.

## शांत झोप, आरोग्याची गुरूकिल्ली

सेल्फ हेल्प



खाण्यासाठी जन्म आपुला, असं अनेकांना वाटतं. खाण्याचं ताट पुढे आलं की आपला संयम सुटतो. तामसी जेवणावर मस्त ताव मारला जातो. आहार–विहाराच्या सवयींवर माणसाचं आरोग्य अवलंबून असतं पण आहारापेक्षाही झोप जास्त महत्त्वाची असते. अपुऱ्या झोपेमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे भोजनासोबतच निद्रेचं पावित्र्यही राखलं गेलं पाहिजे. झोपेचं पावित्र्य म्हणजे काय तर रात्रभर शांत झोप घेणं. झोपेला ध्यानाचाच एक भाग मानायला हवं. त्यामुळे झोपण्याआधी ध्यानधारणा, मेडिटेशन करायला हवं. यामुळे शांत झोप येईल. यावेळी परमात्मारूपी शांततेचा अनुभव येईल.

आपल्या दिनक्रमात थकवा आल्यानंतर झोप घेतली जाते. थकवा, अस्वस्थतेनंतर आपण निद्रादेवीच्या अधीन होतो. त्यामुळे दिवसाची सुरूवात फार चांगली होत नाही. दिवसभराच्या अस्वस्थतेमागे अपुरी झोप हे महत्त्वाचं कारण मानलं जातं. त्यामुळे झोपण्याआधी एक प्रयोग करता येईल. झोपण्याच्या खोलीत पलंगावर किंवा इतर कोणत्याही स्थानावर मांडी घालून बसा आणि 'ओम'चं उच्चारण करा. हा उच्चार अशा पद्धतीने व्हायला हवा की संपूर्ण शरीरात ओमचा आवाज गुंजावा. ओमचा आवाज आपल्या शरीरात गुंजतोय, अशी कल्पना करायला हवी. दीर्घ श्वास घेऊन ओम म्हणा. ओमचा आवाज संपूर्ण शरीरात पसरला असल्याची कल्पना करा. जिथे थांबाल तो क्षण शून्याचा. पुढच्या वेळी या शून्यापासूनच सुरूवात करा. त्यानंतर पुन्हा ओम म्हणा. दोन ओममधल्या शून्याचा काळ जेवढा दीर्घ तेवढी गाढ झोप येईल. गाढ झोपेमुळे आहार–विहाराच्या चुकीच्या सवयींच्या दुष्परिणामांपासून बचाव होईल. खाण्या–पिण्याबाबत तडजोड केली तरी हरकत नाही पण झोपेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करू नका.



## आनंदी राहण्यासाठी...

धर्मशास्त्रातून

प्रत्येकाला जीवनात आनंद हवा असतो. आनंदाची, समाधानाची व्याख्या व्यक्तीसापेक्ष बदलत असते. आनंद, समाधान प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. सुख आणि आनंद मिळवण्यासाठी पुराणामध्ये काही उपाय सांगण्यात आले आहेत. या उपायांनी आयुष्यात सुख नांदू शकतं.

* धार्मिक पुस्तकं, पुराणं आणि मासिकांचं वाचन म्हणजे ब्रह्म यज्ञ. यातून आपण ज्ञान घ्यायला हवं. धार्मिक साहित्याच्या वाचनामुळे आंतरिक शांततेची अनुभूती मिळते. यामुळे आनंदही मिळतो.

* पिंडदान, श्राद्धकर्म आणि इतर धार्मिक विधींद्वारे पितरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. याला पित्र यज्ञ असं म्हटलं जातं. पूर्वजांच्या नित्य स्मरणाने त्यांचे आशीर्वाद मिळतात. शिवाय आंतरिक शांतताही मिळते.

* विविध देवीदेवतांचं स्मरण म्हणजे देव यज्ञ. यामुळे आपल्याला परमेश्वराचे आशीर्वाद प्राप्त होतात. दैनंदिन आयुष्यात परमेश्वराचं स्मरण करत रहायला हवं.

* भूतयज्ञ म्हणजे भूतदया. इतरांना मदत करणं, पशुपक्ष्यांची काळजी घेणं यामुळे तुमची चांगली कर्म वाढतात.

* घरी आलेल्या पाहुण्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पाहुणा कितीही मोठा किंवा लहान असला तरी त्यांच्या सरबराईत कोणतीही कमरता राहता कामा नये. याला अतिथी यज्ञ असं म्हटलं जातं.

* निसर्गाच्या सानिध्यात काही काळ चाला. यामुळे तुम्हाला आनंद मिळतो.

* जुन्या मित्रमैत्रिणींना भेटा. त्यांच्यासोबत वेळ घालवा. यामुळे आनंद वाढतो.

* चांगली कर्म करा. लोकांना मदत करा. यामुळे मन:शांती लाभेल.

## असे असावे घराचे कोपरे

वास्तू भक्ती

वास्तूशास्त्रानुसार घरातल्या दिशांचं, आणि प्रत्येक कोपऱ्याचं वेगळं महत्त्व असतं. घराच्या प्रत्येक कोपऱ्याची रचना वास्तूशास्त्रानुसार करण्यात आली तर घरात समृद्धी आणि समाधान नांदतं. फक्त एवढंच नाही तर कुटुंबातल्या सदस्यांना मानसिक शांतता लाभते. म्हणूनच घरातल्या प्रत्येक कोपऱ्याची माहिती घेणं गरजेचं आहे. त्याविषयी...

* घराचा उत्तर–पश्चिम कोपरा समृद्धी आणि सकारात्मकतेचं प्रतिक असतो. घराचा हा कोपरा कधीही अंधारात असू नये. हा कोपरा अंधारात असेल तर घरात नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो.

* घराच्या दक्षिण दिशेचा अधिपती म्हणजे साक्षात यमराज. घराच्या या कोपऱ्यात दार किंवा तिजोरी, कपाट असू नये. या कोपऱ्यात दार किंवा कपाट असेल तर घरातल्या सदस्यांमध्ये कटूता निर्माण होऊ शकते. तसंच अपमृत्यूचं भय असतं.

* ज्येष्ठ कुटुंबप्रमुखाची खोली घराच्या दक्षिण–पूर्व दिशेला असू नये. या दिशेला खोली असेल तर घरात नकारात्मकता नांदते. विभक्त कुटुंबातल्या कुटुंबप्रमुखाची खोलीही या दिशेला असू नये.

* घराच्या उत्तर–पूर्व कोपऱ्यात स्वयंपाकघर असू नये. यामुळे घराचं आर्थिक नियोजन कोलमडून आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात.



* आंघोळीनंतर बाथरूम घाण ठेऊ नये. साचलेलं पाणी काढून टाकावं. सुगंध फवारावा. ओले कपडे वाळत घालावे.

* पाणी वाया घालवणं हा खूप मोठा वास्तूदोष मानला जातो. गरजेइतकं पाणी वापरा. घरातले गळके नळ दुरूस्त करून घ्या.

* सूर्योदयापूर्वी उठायला हवं. सूर्याची किरणं अंगावर घ्यायला हवी. सूर्योदय म्हणजे नवी सुरूवात. त्यामुळे दिवसाची सुरूवातही आनंदाने करायला हवी.

* सूर्यास्ताच्या वेळी झोपू नये. या वेळी दोन प्रहर एकत्र येत असतात. सूर्यास्तानंतर संपूर्ण अंधार झाल्यावरच झोपावं.

* घराचं स्वयंपाकघर स्वच्छ असायला हवं. स्वयंपाक झाल्यानंतर ओटा नीट धुवून ठेवा. कचऱ्याचा डबाही स्वच्छ करा.

* घराच्या उत्तर दिशेची भिंती निळ्या रंगाने रंगवून घ्या. या ठिकाणी निळ्या रंगाच्या काही वस्तू ठेवता येतील. या ठिकाणी लाल किंवा इतर कोणते गडद रंगा लावू नका. यामुळे घरात नकारत्मकता निर्माण होवू शकते.

* घराचं प्रवेशद्वार नीटनेटकं आणि स्वच्छ असायला हवं. घराचं प्रवेशद्वार उत्तर, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला असावं. दक्षिण–पश्चिमेला असलेल्या प्रवेशद्वारामुळे घरात नकारात्मक प्रभाव निर्माण होतो.

* स्वयंपाकघराला लाल, केशरी किंवा गुलाबी रंग द्यावा.

* घराच्या पश्चिम कोपऱ्याला पांढरा किंवा पिवळा रंग द्यावा. या कोपऱ्यात पैसा ठेवता येईल. घराच्या दक्षिण–पश्चिम कोपऱ्यात अभ्यासिका किंवा वाचनालय असावं.

## नागपुरात येणार आंतरराष्ट्रीय अ‍ॅग्री बिझनेस स्कूल
# स्पेनच्या तज्ज्ञ शिष्टमंडळाने दिली सहमती

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

विदर्भातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळावी आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानामध्ये तरुणांना प्रशिक्षित करून सक्षम करणे हे अ‍ॅग्रोव्हिजनचे ध्येय असून, याच माध्यमातून नागपुरात अ‍ॅग्रोव्हिजन ग्लोबल अ‍ॅग्री बिझनेस स्कूल सुरू करण्याचा निर्धार केला असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी येथे सांगितले.




शेतीही फायदेशीर होऊ शकते, फक्त त्यासाठी योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अ‍ॅग्रोव्हिजन अ‍ॅग्री बिझनेस स्कूल हे या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल. विदभार्तील तरुणांना जागतिक कृषी नवकल्पनांची माहिती मिळावी, त्यांना स्टार्टअप्स व नियार्तीसाठी मार्गदर्शन व्हावे, हा आमचा उद्देश आहे असे गडकरी म्हणाले. या उपक्रमाच्या तयारीसाठी स्पेनमधील एक उच्चस्तरीय तज्ज्ञ शिष्टमंडळ शुक्रवारी विदर्भाच्या दौऱ्यावर आले होते. या शिष्टमंडळाशी चर्चा करताना ते बोलत होते.

विदर्भातील संत्रा व फलोत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि उत्पादन वाढवण्यासाठी केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या पुढाकाराने स्पेन येथील डेव्हीस मॅरिनो, फ्रांसिस्को जॅव्हियर आणि जॉन अँटीनिओ या तज्ज्ञांनी संत्रा उत्पादक क्षेत्रांचा दौरा करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. शेतकऱ्यांच्या गरजा, अडचणी आणि संधी यांचा त्यांनी अभ्यास केला. दौऱ्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि नागपुरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे अ‍ॅग्री बिझनेस स्कूल सुरू करण्यास सहमती दर्शविली. याप्रसंगी अ‍ॅग्रोव्हिजन फाउंडेशनमार्फत भारत व स्पेनमधील कृषी तंत्रज्ञानाच्या आदान-प्रदानासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात येणार असल्याचेही जाहीर करण्यात आले. या प्रयत्नांतून विदभार्तील शेतकरी व तरुणांना कृषी क्षेत्रात नवसंधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी कांचन गडकरी यांच्यासह, अ‍ॅ फाउंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर, मार्गदर्शक डॉ. सी. डी. मायी, महाऑरेंजचे अध्यक्ष श्रीधर ठाकरे, डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे प्रशांत कडू आदींसह संत्रा उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# राहुल गांधी आणि शरद पवार यांनी पुढील १५ वर्षे सत्तेचा विचार सोडावा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :



### भाजपा प्रदेशाध्यक्षांचा विरोधकांना सल्ला

राहुल गांधी वा शरद पवार यांनी पुढील पंधरा वर्षे तरी सत्तेचा विचार करू नये. कारण लोकांना विकास हवा आहे. आणि त्यासाठीच लोक भाजपासह महायुतीला निवडून देतात, असा पलटवार भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना केला.

शरद पवार यांनी महाविकास आघाडीत काय सुरू आहे ते पाहिले पाहिजे. भाजपा आणि महायुती प्रचंड मजबुत आहे. आम्ही सोबत लढणार आहोत. आवश्यक असेल तिथे स्थानिक परिस्थिती पाहुन मैत्रीपूर्ण लढू. पण राज्यात महायुतीच निवडून येणार आहे. हे लक्षात घेता शरद पवार यांनी पुढची पंधरा वर्षे सत्ता कारण सोडले पाहिजे असा टोला बावनकुळे यांनी हाणला.

राहुल गांधी यांनी २०२४ च्या निवडणुकीत ३९ लाख मतदारांची वाढ संशयास्पद असल्याचे म्हटले आहे. मात्र, २००९ मध्ये लोकसभा निवडणुकीत ७ कोटी २९ लाख रू४ हजार मतदार होते, आणि त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ही संख्या ७ कोटी ५९ लाख ६८ हजारांवर पोहोचली होती.

तेव्हा राहुल गांधींनी निवडणूक आयोगावर विश्वास ठेवला होता. आता मात्र पराभवाच्या भीतीने ते आयोगावर संशय व्यक्त करीत आहेत. लोकसभेत ३१ जागा त्यांना तर १७ जागा आम्हाला मिळाल्या. त्यावेळी राहुल गांधी ओव्हर कॉन्फिडंट झाले.

महायुतीच्या सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने आम्ही ३ कोटी १७ लाखावर गेलो आणि ते २ कोटी १७ लाखावर आले. म्हणजे त्यांचे ३३ लाख मते कमी झाली. राहुल गांधी अभ्यास करीत नाही. डबल इंजिन सरकार असल्याने मतदार विकासावर मतदान करतात. पुढची १५ वर्ष राहुल गांधी आणि सर्वांनी विसरून जावी. पुढचा काढा विकासाचा काळ आहे. आणि या काळात नॉन डेव्हलपमेंट व्हिजन असलेल्यांना जनता मतदान करणार नाही, असे बावनकुळे यांनी सांगितले.

## शिवराज्याभिषेक सोहळा तारखेनुसार नव्हे
# तिथीनुसार साजरा होणार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य आणि संस्कृतीचे प्रतीक असलेले छत्रपती शिवाजी महाराज हे राज्यासाठी आराध्य दैवत आहेत. त्यांची धैर्य, नेतृत्वगुण आणि न्यायप्रियता महाराष्ट्रातील लोकांसाठी प्रेरणादायक आहे. शिवाजी महाराजांनी जनतेच्या मतांवर भर देऊन स्वराज्य स्थापन केले. शिवाजी महाराज महाराष्ट्राच्या इतिहासात एक आदर्श राजा म्हणून ओळखले जातात. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर पार पडला. हा दिवस मराठी इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गौरवशाली घटना मानली जाते. या दिवशी शिवाजी महाराजांचा विधीपूर्वक अभिषेक झाला आणि त्यांनी औपचारिकपणे छत्रपती ही उपाधी धारण केली. शिवप्रेमी दरवर्षी ६ जूनला मोठ्या जल्लोषात शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करतात. मात्र यंदा हा सोहळा तिथीप्रमाणे ९ जून रोजी साजरा करण्यात यावा अशा आशयाचे परिपत्रक राज्याच्या विधी व न्याय विभागाने शुक्रवारी काढले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या परवानगीने हा निर्णय घेतला गेला असल्याचे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

सरकारी व शैक्षणिक संस्थांमध्ये ६ जूनच्या दिवशी विशेष कार्यक्रम, व्याख्याने व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या दिनांकाबाबत तारीख आणि तिथी यामध्ये काही प्रमाणात गोंधळ व मतभेद आढळतो. ऐतिहासिक दृष्टिकोनातून शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी रायगड किल्ल्यावर झाला होता. ही तारीख ग्रेगोरियन कॅलेंडरनुसार निश्चित करण्यात आलेली असून, सरकारी दस्तावेज आणि बहुतेक शालेय-पुस्तकांमध्ये याच तारखेचा उल्लेख आढळतो. मात्र, हिंदू पंचांगानुसार हा अभिषेक ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी या तिथीला झाला होता. चंद्रमान पंचांगामुळे ही तिथी दरवर्षी बदलते आणि कधी ५ जून, कधी ७ जून किंवा इतर तारखेला येते. त्यामुळे काही ठिकाणी राज्याभिषेक दिन पंचांगानुसार साजरा केला जातो. यंदा तिथीनुसार राज्याभिषेक दिन ९ जून रोजी येत आहे. या पार्श्वभूमीवर २ जून २०२५ रोजी बार काउंसिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या सदस्याने तिथीनुसार राज्याभिषेक साजरा करण्याबाबत पत्र पाठविले होते. विधी व न्याय विभागाने ५ जून रोजी याबाबत पत्र पाठविले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता प्रदान केल्यावर ६ जून रोजी कार्यासन अधिकारी वैशाली बारुडे यांच्या नावाने परिपत्रक काढले गेले. परिपत्रकानुसार, राज्याच्या न्याय व विधी विभागाच्या अंतर्गत येणारे सर्व कार्यालये तसेच राज्यातील सर्व जिल्हा व सत्र न्यायालयात, सरकारी वकीलांच्या कार्यालयात ९ जून रोजी तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात येणार आहे.

### महाराष्ट्र वनक्षेत्र : सत्य व भ्रामक साधक-बाधक चर्चा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

देशातील वनक्षेत्राच्या संदर्भात जी आकडेवारी जाहीर करण्यात येते ती नेहमीच वादग्रस्त राहिलेली आहे. उपग्रहाच्या मध्यमातून सर्वेक्षण झाल्यानंतर काही वर्षांपूर्वी सत्य समोर आले आहे. नुकतेच महाराष्ट्र वनविभागाच्या अधिकाऱ्याने हरित क्षेत्रफळाच्या वाढीच्या संदर्भात काही आकडे जाहीर केले. त्यातील सत्य जाणून घेणे या क्षेत्रातील कार्यरत असणाऱ्या व वनांच्या बाबतीत रुची घेणाऱ्या नागरिकांसाठी समजून घेणे आवश्यक आहे. वनराई फाऊंडेशनच्या वतीने महाराष्ट्र वनक्षेत्र : सत्य व भ्रामक या विषयावरील साधक-बाधक चर्चा रविवार दि. ८ जून, २०२५ सायं ५.०० वाजता महाराष्ट्र राष्ट्रभाषा संकुलातील श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, शंकरनगर चौक, नागपूर येथे करण्यावे योजिले आहे. या प्रसंगी यादव तरटे पाटील, माजी सदस्य, राज्य वन्यजीव मंडळ, मा.डॉ. योगेश्वर दुधपचारे, वन क्षेत्रातील गाढे अभ्यासक व मा राखी चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार हे मान्यवर सहभागी होतील.

## महाराष्ट्रात विधान सभेची झालेली निवडणूक ही मॅच फिक्सिंग
# काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांचे विधान

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

महाराष्ट्रात झालेली विधानसभा निवडणूक ही मॅच फिक्सिंग होती, या निवडणुकीत नेमकी काय झाले याचे सत्य लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मांडले आहे. दम असेल तर यावर खुलासा करावा असे काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज महाराष्ट्रात निवडणुकीत झालेले मतदान, २०२४ लोकसभा निवडणुकी नंतर विधानसभा निवडणुकीत मतदारांची वाढलेली संख्या आणि महाराष्ट्रात मतदानाची वेळ संपल्यावर अचानक वाढलेली मतदानाची टक्केवारी याबाबत विविध लेखातून भूमिका मांडली आहे.



मुळात केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त निवडण्याची प्रक्रियाच सदोष आहे. त्यानंतर विविध यंत्रणांना हाताशी धरून सत्ताधाऱ्यांनी निवडणूक जिंकली असा आरोप विधिमंडळ नेते वडेट्टीवर यांनी केला. मतदानाची वेळ संपल्यावर २०२४ विधानसभा निवडणुकीत साडे आठ टक्के सरासरीने मतदानाची टक्केवारी वाढते हे संशयास्पद आहे. त्यामुळे महाराष्ट्रात बेईमान पद्धतीने सरकार आलेले आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी वस्तुनिष्ठ माहिती दिली आहे, यावर संबंधितांनी खुलासा केला पाहिजे अस ही वडेट्टीवार म्हणाले.

राज्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार अशा चर्चा सुरू आहे. राज्यातील महाराष्ट्र विरोधी सरकार घालवण्यासाठी ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर त्याचे आम्ही स्वागत करतो असे वडेट्टीवार म्हणाले. ठाकरे बंधू एकत्र येण्याची भीती सत्ताधाऱ्यांना का वाटते? त्यांच्या युतीच्या बातम्यांनी सत्ताधारी का अस्वस्थ होत आहेत असा सवाल ही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. राज्यात सारथी, बार्टी, महाज्योती यांना समान निधी वाटप केल्याचा दावा सरकार करत आहे. अस असले तरी सारथीला इमारत आणि हॉस्टेल बांधण्यासाठी अधिकचा निधी दिला आहे.इतर संस्थांना कमी निधी दिला आहे. महाराष्ट्राची तिजोरी ही ओबीसी समाजासाठी नाही का? निवडणुकीत भाजप ओबीसी समाजाची मत घेते आणि सरकार आल्यावर मात्र त्यांना दुर्लक्ष करतात हा अन्याय आहे. सरकारने सर्वांना समान निधी आणि न्याय द्यावा अशी मागणी विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

# अमरावतीत मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांच्या एकत्रिकरणाच्या घोषणा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ७ :

गेल्या काही दिवसांपासून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा राजकीय वतुर्ळात सुरू आहेत. ठाकरे बंधूंनी तसे संकेतही दिले आहेत.



महाराष्ट्राच्या जनतेच्या मनात आहे ते होईल. मी तुम्हाला फक्त एका वाक्यात सांगितले. याबाबत जे काही बारकावे आहेत ते आम्ही तपासून पाहत आहोत. मी तुम्हाला फक्त संदेश नाही, तर थेट बातमी देईन, असे सूचक वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी दिल्यानंतर कार्यकर्त्यांमधूनही उत्स्फूर्त प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत.

अमरावतीत शुक्रवारी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत महाराष्ट्राच्या हितासाठी मनसे-शिवसेना युती झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आणि शिवसेना-मनसे युतीचा विजय असो, अशा घोषणाही दिल्या. शिवसेना आणि मनसे युती झाल्यास अमरावतीत फटाके फोडून सर्वप्रथम आम्ही जल्लोष करू, असे कार्यकर्त्यांनी सांगितले. शिवसेना आणि मनसे एकत्र यावे असे संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला वाटत आहे. उद्धव ठाकरे यांना सोबत घेऊन भाजपने स्वतःला मोठे केले. नंतर राज ठाकरे यांचा वापर केला. राज ठाकरे यांच्या घराच्या पायऱ्या भाजपच्या नेत्यांनी झिजवल्या, पण हा ठाकरे ब्रँड आहे, हे भाजपने विसरू नये. युतीसंदर्भात उद्धव ठाकरे जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल, असे शिवसेनेचे संपर्क प्रमुख सुधीर सूर्यवंशी यांनी सांगितले.

महाराष्ट्रात केवळ ठाकरे ब्रँड चालतो, हे महाराष्ट्रातील जनतेने दाखवून दिले आहे. भाजपने गेल्या पंचवीस वर्षांत बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा वापर केला. त्यांच्या सभांच्या माध्यमातून जनमत गोळा केले. ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, ही जनतेची इच्छा आहे. ज्या क्षणी मनसे-शिवसेना युतीची घोषणा होईल, त्या क्षणी अमरावतीत शिवसैनिक आणि मनसेचे कार्यकर्ते फटाके फोडून जल्लोष साजरा करतील, असे शिवसेना ठाकरे गटाचे महानगरप्रमुख पराग गुडधे यांनी सांगितले.

### मोसमी पावसाचा जोर आता १५ जूननंतर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

राज्यात जून महिन्याच्या मध्यान्हानंतरच मोसमी पाऊस परत पुढे सरकण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने जुनच्या तिसऱ्या आठवड्यात पूर्व आणि मध्य भारतात तो वेगाने पुढे सरकेल. संपूर्ण महाराष्ट्रात मोसमी पावसाची स्थिती ही एक ते १४ जूनपर्यंत फारशी चांगली नाही.

मात्र, १५ ते ३० जूनमध्ये पहिल्या जूनच्या पहिल्या दोन आठवड्यापेक्षा मोसमी पाऊस चांगला असेल, असा अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी दिला आहे. दरम्यान, विदर्भातील कमाल तापमानात येत्या दिवसात आणखी वाढ होणार असून १३ ते १४ जूनपर्यंत उकाडा कायम राहील, असाही अंदाज आहे. महाराष्ट्रात मोसमी पावसाची प्रगती अजूनही रखडलेलीच आहे. महाराष्ट्रात साधारण २५, २६ मे पासून तर पूर्व भारतात २९ मे पासूनच मोसमी पाऊस रखडलेला आहे.

# पाकिस्तानहून परतलेली सुनीता जामगडे मानसिक रुग्ण?

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संत कबीर नगर भागात राहणारी सुनीता जामगडे काही दिवसांपूर्वी नियंत्रण रेषा (एलओसी) ओलांडून पाकिस्तानात गेली होती. सुनीता कारगिलजवळील हुंदरमन गावातून पाकिस्तानात गेली आणि तेथील एका धर्मगुरूला भेटली. याप्रकरणी नागपूर पोलिसांनी तिला अटक करून जेएमएफसी न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने तिला २ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले होते. कोठडी संपल्यानंतर तिला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले आणि न्यायालयाने तिला न्यायालयीन कोठडीत पाठवले. सध्या ती नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात आहे. या प्रकरणात तिला जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत वकील देण्यात आला आहे. न्यायलयीन कोठडीत असणाऱ्या सुनीता जामगडेच्या जामीनासाठी अर्ज दाखल केला जाणार असल्याची सुरुवातीला चर्चा होती, मात्र जामीन अर्ज दाखल न करता सुनीताच्या मानसिक स्थितीबाबत अर्ज दाखल केला गेला.

### मानसिक परीक्षणासाठी अर्ज

सुनीता ४ मे रोजी स्वतःच्या १२ वर्षीय मुलासोबत घरून निघाली होती. कारगिल बॉर्डरवरील शेवटचे गाव असलेल्या हुंदरमानमध्ये ती पोहोचली. तिथे गेल्यानंतर मुलाला परत येते असे सांगून एकटीच निघून गेली. तत्पूर्वी मुलाला घरी पाठवत असल्याचे बहिणीला फोन करून सांगितले. स्थानिक लोकांनी मुलाला लद्दाख पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

मात्र, आता त्यांनी सुनीता ही मागील ३-४ वर्षांपासून मानसिक विकाराने ग्रस्त असल्याचे नमूद करत तिच्या मानसिक परीक्षणासाठी अर्ज दाखल केली आहे. या अर्जात सुनीता नागपूरच्या प्रादेशिक मानसिक रुग्णालयात उपचार घेत असल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे तिची वैद्यकीय महाविद्यालयातील मानसोपचार तज्ज्ञांकडून तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे. हा अर्ज तिच्या वकिलांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल केली असून, ९ जून रोजी यावर सुनावणी होण्याची शक्यता आहे.

# चारित्र्याच्या संशयावरून पतीने संपविले पत्नीला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :



चारित्र्यावरील संशयाने सुशिक्षित पतीच्या डोक्यात घर केले आणि शांत डोक्याने कट रचित आपल्या पत्नीला संपविण्याची घटना नुकतीच हुडकेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत घडली आहे. हुडकेश्वर पोलिसांनी शिताफिने तपास लावत आरोपींना गजाआड केले आहे.

अर्चना अनिल राहुले (५२) हुडकेश्वर परिसरात लाडेकर लेआउट येथे राहत असून ती गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजला फिजिओथेरपी विभागात प्राध्यापिका होती. तर तिचा पती अनिल राहुले(५३) छत्तीसगडमधील रायपूर मध्ये प्रायव्हेट वैद्यकीय महाविद्यालयाला प्राध्यापक आहे. त्यांना एकुलता एक मुलगा असून तो एमबीबीएस करीत आहे. सर्व संपन्न सुखी असे कुटुंब होते व सुरळीत संसार सुरू असताना पतीच्या डोक्यात घटनेच्या सहा महिने आधीपासून चारित्र्यावरील संशयाने घर केले होते. तिच्या राहणीमानावरून, मोबाईलवर बोलण्यावरून त्यांच्यात खटके उडत होते. पण या लहान सहान वादाची परिणिती पत्नीची हत्या करण्यात झाली. मृतकचा पती अनिल राहुले सुट्टीच्या दिवशी नागपूरला पत्नीकडे येत जात राहायचा. त्यांनी आपला मोठा भाऊ राजू राहुले यांच्या मदतीने शांत डोक्याने पत्नीला मारण्याचा कट रचना.

९ एप्रिल ला अनिल आणि राजू राहुले पत्नीच्या राहत्या घरी नागपूरला आले. पत्नी घरी आल्यानंतर पुन्हा त्यांच्यात वादविवाद झाला. अशातच मोठ्या भावाने अर्चना राहुलेचे हात पाय पकडले आणि तिच्या डोक्यावर लोखंडी रॉड ने जोरात वार केला. रक्तस्त्राव होऊन अर्चना राहुलेचा जागीच मृत्यू झाला खोलीत रक्ताच्या थारोळ्यात ती पडली होती.

ती मृत झाल्याची पक्की खात्री झाल्यानंतर बाहेरून दार लावून ते फरार झाले. १२ एप्रिल ला हनुमान जयंती ची सुट्टी असल्याने आपण आलो व पत्नी मृत असल्याची आम्हाला दिसली. असा पतीने बनाव केला. त्याच्या आरडाओरडीनंतर शेजारी जमा झाले आणि हुडकेश्वर पोलीस स्टेशनला कळविण्यात आले. हुडकेश्वर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर भेदोडकर यांनी तपास सुरू केला.

घरातील दागिने व रक्कम जशीच्या तशी असल्याने या खुनामागील कारण वेगळे असल्याचा त्यांना संशय आला. अनिल राहुले व राजू राहुले यांची सखोल चौकशी केल्यानंतर हत्येचे बिंग फुटले. अनिल राहुले व राजू राहुले यांनी चारित्र्यावरील संशयावरून खून केल्याची कबुली दिली. आता हे दोघेही न्यायलयीन कोठडीत मध्यवर्ती कारागृहात आहे.

# कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे, विद्युत विहार वसाहत परिसरात
## महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, राधाकृष्णन बी. यांचे हस्ते वृक्षारोपण

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ७ :

दिनांक ०५ जून २०२५ रोजी, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे विद्युत विहार वसाहत येथे, विशेष वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, राधाकृष्णन बी. तसेच कार्यकारी संचालक (सं व सु झ २) राजेश पाटील आणि उपस्थित मुख्य अभियंते यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण मोहिमे मध्ये अधिकारी, कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, या प्रसंगी विविध जातींच्या झाडांचे रोपण करण्यात आले.



वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करताना मान्यवरांनी सांगितले की, झाडे केवळ छाया देत नाहीत तर ते प्रदूषण नियंत्रण कार्यासाठी महत्वाचे असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जैवविविधतेचे संरक्षण व संतुलित ठेवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. पर्यावरण दिन हा दिवस पृथ्वीच्या संरक्षणासाठी जनजागृती करण्याचा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे, महानिर्मितीमध्ये कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यासाठी प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमात वृक्षारोपण करून निसर्गाच्या रक्षणाचा संदेश देण्यात आला व त्या अनुषंगाने पाऊले उचलावी असे आवाहन केले.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे, विद्युत विहार वसाहतीमध्ये दिनांक १३-जानेवारी-२०२५ पासून, भव्य वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात करण्यात आली होती, या मोहिमे दरम्यान, एकाच क्लस्टर मध्ये आंबा, आवळा, बदाम, जांभुळ आणि फणस अश्या अनेक फळझाडांची लागवड करण्यात आली असून सुमारे ८,००० (आठ हजार) वृक्षांची लागवड करण्यात आली आहे, त्या ठिकाणी सुद्धा मान्यवरांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. आज जे रोपटे आपण लावले आहे, ते उद्या मोठे वृक्ष होऊन भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवामान आणि हरित आवरण देतील असे नमूद करून, एवढ्या मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि संगोपन करीत असल्याबद्दल सर्व संबंधितांचे कौतुक केले.

कोराडी वीज केंद्राचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी, यांनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत, वृक्ष लागवड करून पर्यावरणासाठी जबाबदारीची जाणीव व्यक्त केली.

यासह मान्यवरांनी, कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील, राख हाताळणी यंत्रणा व्यवस्था, फ्लाय ॲश, बॉटम ॲश आणि राख बंड प्रणालीच्या कामकाजाची पाहणी केली. त्यांनी इलेक्ट्रोस्टॅटिक प्रिसिपिटेटर (एरढ), बॉटम ॲश डिस्चार्ज व्यवस्था, फ्लाय ॲश सिस्टीम, तसेच राख वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गेहो पंप हाऊसची प्रत्यक्ष पाहणी केली.

पाहणी दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रणालीच्या कार्यक्षमतेचा आढावा घेतला आणि राख व्यवस्थापनात कार्यक्षम, पर्यावरणपूरक व शाश्वत पद्धतीचा अवलंब करण्यावर भर दिला. वीज केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त केले आणि सुरक्षा, पर्यावरण व नैसर्गिक संसाधनांच्या जपणुकीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

वृक्षारोपण कार्यक्रमास, महनिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, राधाकृष्णन बी., कार्यकारी संचालक (सं.व सु.-२), राजेश पाटील, मुख्य अभियंता कोराडी औष्णिक विद्युत केंद्र विलास मोटघरे, मुख्य अभियंता खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, गिरिष कुमरवार , मुख्य अभियंता, कोराडी प्रशिक्षण केंद्र, सुनील सोनपेठकर आणि उपमुख्य अभियंते, अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख, अधिकारी, अभियंते आणि संघटना प्रतीनिधी उपस्थित होते.

# शेवटी चॅलेंजरच किंग ठरले!

नोंद
शंतनु चिंचाळकर

तमाम भारतीयच नव्हे तर ५० कोटींहून अधिक विश्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागून राहिलेल्या अठराव्या टाटा आयपीएल -२०२५ स्पर्धेच्या ३ जून रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अटीतटीच्या टी२० स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघावर सनसनाटी विजय मिळवून करंडक जिंकला. आजवर या मैदानावर झालेल्या तिसऱ्या अंतिम आणि अतिशय रोमहर्षक सामन्यात आयपीएल चषक जिंकण्याचे पंजाब किंग्ज संघाचे स्वप्न अधुरे राहिले. या दोन्ही संघांनी आजवर झालेल्या कोणत्याही आयपीएल स्पर्धेचा चषक जिंकला नव्हता. त्यामुळे दोन्ही संघांनी विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गुजरातचा संघ अंतिम सामन्यात नसल्याने उत्कृष्ट खेळासाठी स्टेडियममधील दर्शकांचा दोन्ही संघांना पाठिंबा असणार हे निश्चित होते. नरेंद्र मोदी स्टेडियमवर जमलेल्या हजारो दर्शकांना ज्याची धाकधुक लागून राहिली होती, त्या पावसाने सामन्यादरम्यान व्यत्यय आणला नाही, हे विशेष म्हणावे लागेल. फलंदाजीला अनुकूल असलेल्या या खेळपट्टीवर नाणेफेक जिंकणाऱ्या संघाचा कर्णधार प्रथम फलंदाजी करण्यास प्राधान्य देईल हे निश्चित होते. यापूर्वी खेळल्या गेलेल्या आठ लढतींमध्ये २०० धावांचा टप्पा ओलांडला गेला, त्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी सहा वेळा विजय प्राप्त केला. परंतु बेंगळुरू संघाचा कर्णधार विराट कोहलीने नाणेफेक जिंकूनही प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा आश्चर्यजनक निर्णय घेतला.

९ एप्रिलला सुरू झालेल्या या स्पर्धेचे सामने भारताच्या सहा प्रमुख शहरांमध्ये खेळले गेले. आयपीएल स्पर्धेत बंगळुरू संघ आजवर २००९, २०११, २०१६ आणि २०२५ अशा चार वेळा अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला होता, तर पंजाबचा संघ २०१४ आणि आता २०२५ मध्ये अंतिम सामना खेळत होता. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अंतिम सामना खेळणाऱ्या दोन संघांमध्ये आजवर खेळल्या गेलेल्या ३६ सामन्यांपैकी दोघांनी प्रत्येकी १८ सामने जिंकले होते. यावरून अंतिम सामन्यासाठी दोन्ही संघांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार हे निश्चित होते. दोन्ही संघांनी प्रत्येकी १४ साखळी सामने खेळून नऊ सामन्यांमध्ये १९ गुणांसह विजय मिळवला, तर चार सामने गमावले. या दोन संघांच्या रन रेटमध्ये + ०७१ इतकाच फरक होता. ही या अंतिम सामन्याची चुरस दाखवणारी वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. अखेर बंगळुरु संघाने १८ वर्षाचा विजयाचा दुष्काळ संपवत करंडक पटकावला. या संपूर्ण स्पर्धेदरम्यान बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदार महत्वाचे निर्णय घेताना विराट कोहलीशी सतत सल्लामसलत करत होता. त्यामुळे या स्पर्धेच्या विजेतेपदाचे श्रेय कोहलीलाही जाते.

**अठराव्या टाटा आयपीएल स्पर्धेच्या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघावर सनसनाटी विजय मिळवून करंडक जिंकला. दोन्ही संघांनी आजवर आयपीएल चषक जिंकला नसल्यामुळे विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गुजरातचा संघ अंतिम सामन्यात नसल्याने उत्कृष्ट खेळासाठी स्टेडियममधील प्रेक्षकांचा दोन्ही संघांना पाठिंबा मिळाला, मात्र विराट कोहलीचे वलय आणि खेळी निर्णायक ठरली.**






विजयाची प्रेरणा त्यांना अंतिम विजय प्राप्त करण्यास उपयोगी पडली असे म्हणावे लागेल.

या स्पर्धेत बंगळुरू संघाच्या फलंदाजीची मदार सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विराट कोहली आणि फील सॉल्ट यांच्यावर तर पंजाब संघाची मदार श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंग यांच्यावर होती. खास करून मुंबईविरुद्धच्या सामन्यात अश्विनीकुमारने टाकलेल्या १९ व्या षटकात श्रेयस अय्यरने चार षटकार ठोकले होते. त्याने नाबाद रहात ८७ धावांची खेळी केली होती. त्यामुळे त्याच्याकडून तशाच फलंदाजीची अपेक्षा होती. गोलंदाजीत सातत्याने यश मिळवणाऱ्या अर्शदीप सिंग आणि मार्को यान्सेन यांच्यावर

तुलनेने तुल्यबळ वाटणारे पंजाब आणि बंगळुरू हे दोन्ही संघ यंदाच्या मोसमात तीन वेळा आमने सामने आले. यात बंगळुरूने दोन वेळा बाजी मारली होती. क्वालिफायर - १ लढतीमध्ये पंजाबने केवळ १०१ धावांचे आव्हान बेंगळुरूसमोर ठेवत सपशेल शरणागती पत्करली. हा सामना हरल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला होता की फलंदाजीतील अपयशामुळे झालेल्या पराभवावर जास्त चर्चा न करता मी फलंदाजांना आपला नैसर्गिक खेळ खेळण्याचा सल्ला दिला आहे. नवोदित खेळाडूंवर दडपण आणून त्यांना त्यांच्या आक्रमक खेळापासून दूर ठेवणे मी उचित मानत नाही. बंगळुरूचा संघ पहिल्या प्ले ऑफमध्ये पंजाबला सहज धूळ चारून थेट अंतिम फेरीत पोहोचला असला तरी मुंबईसारख्या बलाढ्य संघाला पंजाबने पराभवाचा कडवा डोस पाजला, हे अंतिम सामना खेळताना बेंगळुरूच्या संघाला विसरून चालणार नव्हते. पण

पंजाबची तर जोश हेझलवूड आणि कुणाल पंड्या या खेळाडूंवर बंगळुरूची दारोमदार होती. तुलनात्मक अभ्यास करता बंगळुरू संघाला ही स्पर्धा जिंकण्याची जास्त संधी होती. २० षटकांच्या सामन्यांमध्ये, फलंदाजी आणि गोलंदाजीचा समन्वय आणि त्याला क्षेत्ररक्षणाची मिळालेली साथ हे हमखास यशाचे ठरणारे गणित बंगळुरू संघाने या अंतिम सामन्यातही खरे करून दाखवले.

'क्रिकेट इज द गेम ऑफ चान्स' या म्हणीची संपूर्ण स्पर्धेत जाणवलेली प्रचिती अंतिम सामन्यातही जाणवली. फलंदाजीला पोषक अशी खेळपट्टी असल्याने पहिल्या पाच-सहा षटकांमध्ये जास्त धावा करणाऱ्या संघाला जिंकण्याची संधी जास्त असेल, असे तज्ज्ञांचे मत होते. स्पर्धेमध्ये बंगळुरूच्या विराट कोहली आणि फिल सॉल्ट या सलामीवीरांकडून केली गेलेली आकर्षक फटकेबाजी अंतिम सामन्यातही अपेक्षित होती. परंतु तिसऱ्याच चेंडूवर सनसनाटी षटकार ओढत धडाकेबाज खेळाची सुरुवात करणारा सॉल्ट दुसऱ्या षटकातही एक षटकार ओढून झेलबाद झाला. त्याच्या जागी आलेला मयंक अगरवालही कोहलीची साथ न देता लवकर परतला. त्यानंतर आलेल्या कर्णधार पाटीदार आणि कोहलीने सावध खेळ करत धावफलक हलता ठेवला. संघाच्या ९३ धावा फलकावर लागल्या असताना कर्णधार पाटीदार यॉर्करवर पायचीत झाला. मधल्या फळीतील फलंदाजांच्या साथीने कोहलीने संयमी खेळ करत अकराव्या षटकात संघाच्या १०० धावा फलकावर लावल्या. चौदाव्या षटकात संघाची धावसंख्या १३१ असताना दुर्दैवाने तो बाद झाला. त्यानंतर कमी षटके राहिल्याने धावफलक हलता ठेवण्याच्या नादात ठराविक अंतराने बेंगळुरू संघाचे बळी जात राहिले आणि त्यांचा डाव १९० धावांवर आटोपला.

प्रभसीमरनच्या साथीने पंजाबच्या डावाची सुरुवात करणाऱ्या प्रियांश आर्याने पहिलाच चेंडू सीमापार धाडत धडाकेबाज सुरुवात केली. दोघांनी भुवनेश्वरकुमारच्या पहिल्याच षटकात १३ धावा वसूल केल्या. तिसऱ्या षटकात प्रभसीमरनचा झेल सोडून शेपर्डने जीवदान दिले. संघाच्या ४३ धावा फलकावर लागल्या असताना प्रियांश आर्य वैयक्तिक २४ धावांवर बाद झाला. त्याच्या जागी आलेल्या जॉर्ज इंग्लिसने आकर्षक टोलेबाजीचे प्रदर्शन घडवले, पण दुसरीकडे नवव्या षटकात संघाची धावसंख्या ७२ असताना प्रभसिमरन बाद झाला. ज्याच्याकडून पंजाब संघाला धडाकेबाज खेळाची अपेक्षा होती, तो श्रेयस अय्यर दहाव्या षटकात स्वस्तात परतला. त्यावेळी बंगळुरू संघाच्या खेळाडूंनी मैदानात सामना जिंकल्यासारखा आनंद व्यक्त केला. तेराव्या षटकात जॉर्ज इंग्लिस बाद झाल्यावर संघापुढे जिंकण्यासाठी षटकाला १३ धावांची गती ठेवण्याचे आव्हान होते. पण शशांक सिंग आणि नेहल वढेरा यांच्या आक्रमक फलंदाजीने सामन्यात फारशी रंगत टिकवून ठेवली नाही आणि जिंकण्यासाठी २९ धावांची आवश्यकता असलेल्या शेवटच्या षटकापर्यंत उत्सुकता वाढवत गेलेला सामना अखेर रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाने जिंकत १८ वर्षांनी विजयी चषकाला गवसणी घातली.

सामन्यातील विजयानंतर, आजवर बंगळुरू संघाकडून सलग १८ वर्षे खेळूनही विजयी चषक हाती न लागलेल्या विराट कोहलीला आनंदाश्रु अनावर झाले. विराटच्या संघातील प्रत्येक खेळाडू त्याला २०२५ चा चषक मिळवून द्यायचाच, असा पण करून मैदानात उतरला होता. त्यांच्या प्रयत्नांचे सार्थक झाले असेच म्हणावे लागेल. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या दर्शकांचा केवळ विराट कोहलीमुळे रॉयल चॅलेंजर बंगळुरू संघाला पाठिंबा होता, हे सामन्याच्या पहिल्या चेंडूपासून जाणवत होते. हीच एका महान खेळाडूची दिसून येणारी जिद्द आणि सातत्यपूर्ण खेळ बंगळुरू संघाच्या विजेतेपदाला कारणीभूत ठरला, असे म्हटले तर वावगे ठरू नये.

# अणुयुद्धाकडे पुढचे पाऊल?

विशेष
उर्मिला राजोपाध्ये

गेल्या आठवड्यात पुतिन यांच्या जवळचे असणारे रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांनी तिसऱ्या महायुद्धाचा इशारा दिला होता. युक्रेनवरून अमेरिका आणि रशियामधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे विधान केले. मात्र तुर्कीमध्ये होणाऱ्या रशिया-युक्रेन बैठकीच्या अगदी आधी हल्ला करून युक्रेनने सगळ्याचआश्चर्यचकित केलेच, खेरीज या घटनेने नव्या चर्चेलाही तोंड फुटले.

युक्रेनने 'ऑपरेशन स्पायडर'अंतर्गत रशियाच्या एअरबेसवर हल्ला चढवत जणू कहर केला. युक्रेनने या भयंकर ड्रोन हल्ल्यात किमान ४० रशियन बॉम्बर्स नष्ट केले आहेत. तुर्कीतील इस्तंबूलमध्ये दोन्ही देशांदरम्यान बैठक होणार असताना युक्रेनने हा हल्ला केला. युक्रेनने टीयू ९५ आणि टीयू २२ बॉम्बर्ससह रशियाची ४० विमाने नष्ट केल्याचा दावा केला आहे. ही दोन्ही श्रेणीतील विमाने अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम होती. युक्रेनच्या सुरक्षा सेवेने म्हणजेच एसबीयूने या हल्ल्याची तयारी ११ महिन्यांपासून केली होती. मात्र कोणालाही त्याची कुणकुण लागली नाही हे विशेष. मुख्य म्हणजे बैठकीपूर्वी असा विनाशकारी हल्ला करुन त्यांनी वचक निर्माण केला आहे, असेही म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय निरीक्षकांच्या मते, युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की चर्चेपूर्वीच रशियावर दबाव वाढवू इच्छित होते. कारण ही घटना घडतेवेळी क्रेमलिनचे सहाय्यक व्लादिमीर मेडिन्स्की यांच्या नेतृत्वाखालील रशियन शिष्टमंडळ तुर्कीला पोहोचले होते. या हल्ल्यानंतर परिस्थिती बदलणे स्वाभाविक होते. अशा हल्ल्यानंतर पुतिन गप्प बसणार नाहीत आणि त्यांचा बदला भयानक असू शकतो, हे सांगण्यासाठी कोणा ज्योतिषाची गरज नाही. त्यामुळेच युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्या इशाऱ्यानुसार केल्या गेलेल्या या हल्ल्याने शांततेचा मार्ग बाधित झाला आहे की जग विनाशकारी अण्वस्त्र संघर्षाकडे वाटचाल करत आहे, असे प्रश्न उपस्थित होतात. या हल्ल्यानंतर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन अण्वस्त्रे वापरू शकतात का, हा प्रश्नही अनेकांच्या मनात आहे. ४ मे रोजी एका टीव्ही मुलाखतीमध्ये पुतिन यांनी याबद्दल भाष्य केले होते. आत्तापर्यंत अण्वस्त्रे वापरण्याची गरज भासली नाही आणि आशा आहे की, गरज भासणार नाही, असे स्पष्ट करत असतानाच त्यांनी गरज पडलीच तर आपल्याकडे पुरेसे सामर्थ्य आणि साधन असल्याचे स्पष्ट केले होते. खेरीज गेल्या वर्षीच पुतिन यांनी रशियाचे अण्वस्त्र धोरण अपडेट केले होते. अण्वस्त्रे असणाऱ्या आणि पारंपरिक शस्त्रांनी हल्ला करणाऱ्या देशाने हल्ला केला तरी रशिया अण्वस्त्रे वापरू शकतो, असे त्यावेळी त्यांनी म्हटले होते. या पार्श्वभूमीवर आता रशियाच्या भूमिकेकडे जगाचे लक्ष आहे.

एकंदरच सध्या जगभर जाणवणाऱ्या युद्धजन्य वातावरणामध्ये या ताज्या घटनेने ताण वाढवण्याचे काम केले आहे. याआधीच युरोपीय देशांनी मोठ्या युद्धाची तयारी सुरू केली असून आपल्या नागरिकांना आणीबाणीसाठी तयार राहण्याचा सल्ला दिला आहे. स्वीडन, फिनलंड आणि जर्मनीच्या सरकारांनी नागरिकांना अन्न, पाणी आणि औषधांचा साठा करण्याचा सल्ला दिला आहे. वाढत्या लष्करी तणावामुळे आणि भविष्यातील सुरक्षेबद्दलच्या चतेमुळे हा सल्ला देण्यात आला आहे. ब्रिटन अमेरिकेकडून एफ-३५ लढाऊ विमाने खरेदी करण्यासाठी चर्चा करत असताना दुसरीकडे नाटोचे सरचिटणीस मार्क रुट यांनी इशारा दिला आहे की, रशिया २०३० पर्यंत युरोपवर हल्ला करू शकतो. वॉर्सा भेटीदरम्यान त्यांनी हे वक्तव्य केले. इतकेच नव्हे तर, रशियाने पोलंड कवा इतर कोणत्याही मित्रराष्ट्रावर हल्ला केला तर या कृतीचा युरोपला पूर्ण ताकदीने सामना करावा लागेल, असे मतही त्यांनी मांडले. सुमी या युक्रेनियन शहरावर रशियन क्षेपणास्त्र पडल्यानंतर त्यांनी हे विधान केले होते.

दुसरीकडे, युक्रेन हरला तर रशिया बाल्टिक देश, फिनलंड कवा पोलंडसारख्या शेजारील देशांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करू शकतो आणि त्यामुळे नाटोला रशियाशी युद्ध करण्यास भाग पाडले जाईल, असा सिद्धांत काही संरक्षण तज्ज्ञ सतत मांडत आहेत. गेल्या महिन्यात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात दिसून आले की पुढील दहा वर्षांमध्ये आणखी एक विनाशकारी जागतिक युद्ध होऊ शकेल, असे अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील अनेक लोकांचे म्हणणे वा मत आहे.



**तब्बल दीड वर्षे पूर्वतयारी करुन, चोख रणनीती आखत युक्रेनने रशियावर ड्रोनहल्ले करत जोरदार तडाखा दिला आणि ४० विमानांचे नुकसान केले. भारताबरोबरच जगातील अनेक देश रशियन बनावटीच्या संरक्षण सामग्रीवर अवलंबून असताना, त्यांच्या यंत्रणेवर विश्वास ठेवत असताना मिळालेला हा दणका फार मोठा म्हणावा लागेल. रशियाचे नेतृत्व गप्प बसणारे नाही. तेव्हा याचा परिणाम जगाला अणुयुद्धाकडे नेणारा होईल का, हे बघावे लागेल.**

रशियासोबत वाढणारा तणाव हे अशा युद्धाचे सर्वात मोठे कारण मानले जाते. त्याचबरोबर ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली आणि स्पेनमधील ४१ ते ५५ टक्के लोकांनी पुढील पाच ते दहा वर्षांमध्ये आणखी एक महायुद्ध होण्याची शक्यता खूप जास्त असल्याचे बोलून दाखवले आहे.

थोडक्यात, रशिया आणि युक्रेन, इस्त्रायल आणि हमास, भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढता राहिल्यास पुढील पाच ते दहा वर्षांमध्ये आणखी एका महायुद्धाची शक्यता खूप जास्त कवा बरीच जास्त आहे, यात शंका नाही. अमेरिकेतील ४५ टक्के लोकांनीही ही चता व्यक्त केली आहे. युरोपमध्ये युद्धाची शक्यता लक्षणीयरीत्या वाढली असताना मध्य पूर्वेतला हसाचारही पुन्हा सुरू झाला आहे. गाझामध्ये इस्त्रायली हल्ल्यांमुळे युद्धबंदी करार धोक्यात आला आहे. दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहवर हल्ला होत आहे आणि सीरियामधील परिस्थिती अजूनही वाईट आहे. अमेरिकेने येमेनमध्ये हुथी सैन्यावर हवाई हल्ले केले आहेत. इराण अण्वस्त्रे बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचे वृत्त आहे. काही गुप्तचर संस्थांनुसार रशिया आणि इराणमध्ये लष्करी तंत्रज्ञानाची देवाणघेवाण होऊ शकते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर



भारत आणि पाकिस्तान जवळजवळ युद्धात अडकले होते. हे दोन्हीही अणुबॉम्ब असणारे देश आहेत. शिवाय 'ऑपरेशन सदूर'ची धग संपणार नसल्याचे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. भारत आता दहशतवादाबाबत 'शून्य संवेदशील'तेचे धोरण राबवत आहे. ही सगळी परिस्थिती जगाला युद्धाच्या शक्यतेच्या अधिकाधिक जवळ नेणारी आहे.

आशियामध्ये तैवानवरून अमेरिका आणि चीन आमनेसामने आहेत. त्यामुळेच सगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी वाढत्या दबावामुळे जग एका मोठ्या युद्धाच्या जवळ येऊ शकते, असे म्हणत दिलेला इशारा दुर्लक्ष करण्याजोगा नाही. दुसरे महायुद्ध जपानमधील दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकून संपले. तोपर्यंत फक्त अमेरिकेकडे अणुबॉम्ब होते. परंतु आता दहा देशांकडे असे अणुबॉम्ब आहेत जे पृथ्वीचा खूप मोठा भाग कायमचा नष्ट करू शकतात. हे सगळे बघता जगभरातील सरकारे त्यांच्या संरक्षण धोरणांमध्ये बदल करत आहेत. युरोपीय देश अमेरिकेने बनवलेले पॅट्रियट क्षेपणास्त्र आणि इस्त्रायलचे 'रो ३ इंटरसेप्टर' सारख्या हवाई संरक्षण प्रणाली तैनात करत आहेत. युरोपमध्ये स्वतंत्र अणुप्रतिबंधक यंत्रणा तयार करण्याबाबतही चर्चा सुरू आहे. पोलंडसारखे देश सामरिक अण्वस्त्रांमध्ये रस दाखवत आहेत. ही सर्व पावले खबरदारी म्हणून उचलली जात असल्याचे ज्या त्या देशातील राजकीय नेते सांगत आहेत. परंतु हे देश संरक्षणविषयक तयारी आणि नागरी सुरक्षेत वाढ करत असल्याचा वेग पाहिला तर त्यावरून चतेची पातळी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे स्पष्ट होते. युरोपीय देश आपल्या नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहण्याचा सल्ला देत आहेत. यावरूनही त्यांना कधीही युद्ध सुरू होऊ शकते अशी भीती असल्याचे दिसून येते.

अशा परिस्थितीत युक्रेनच्या ताज्या हल्ल्यानंतर पुतिन यांचे पुढचे पाऊल काय असेल याचा विचार होणे स्वाभाविक आहे. युक्रेनच्या ताज्या भयानक हल्ल्याला अमेरिकेचा पाठबा होता का, या प्रश्नाचे उत्तर अद्याप सापडलेले नाही. झेलेन्स्की यांनी अमेरिकेला अनेक वेळा युद्धात ओढण्याचा प्रयत्न केला आहे. युक्रेनने पोलंडवर बॉम्ब टाकल्याचा आरोपही करण्यात आला होता तसेच या प्रकरणी या देशाने रशियाला दोष दिल्याची बाबही समोर आली होती. म्हणजेच झेलेन्स्की कोणत्याही परिस्थितीत रशियाविरुद्धच्या लढाईला व्यापक लढाई बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. पुतिन यांच्या रागाचे काय परिणाम होतील हे सध्या सांगता येत नाही. परंतु रशिया अशा प्रकारे ४० लढाऊ विमानांचा नाश कधीही सहन करणार नाही. त्यामुळेच पुतिन अणुपर्यायाचा विचार करतील का, हा सर्वात धोकादायक प्रश्न आहे जो कधीला बाजूला ठेवता येणार नाही.

# ट्रम्प यांच्या मनमानीला चाप

**एकाधिकारशाही अंगात मुरलेले लोक कुणालाही जुमानत नाहीत. अशा व्यक्ती न्यायालयाच्या विरोधातही बोलत असतात. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्यापैकीच एक. अमेरिका ही जागतिक महासत्ता असली, तरी तिला आणखी मोठे करण्याची त्यांची धडपड आहे. ती वावगी नाही; परंतु त्यासाठी ते घटनात्मक मूल्यांचा अवमान करून सर्वाधिकार स्वतःकडे घेऊ पाहतात. त्यांच्या या वृत्तीला न्यायालयाने चाप लावला, हे बरे झाले.**

विश्वभ्रमण

प्रा. जयसिंग यादव

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना जगातील एकमेव मोठा नेता होण्याची घाई झाली आहे. इतरांना ते कस्पटासमान लेखतात. अमेरिकेचे भले करण्याचा मक्ता केवळ आपल्याकडेच आहे, असे मानून ते निर्णय घेतात. अमेरिकेच्या अध्यक्षांना आणीबाणीच्या काळात विशेषाधिकार मिळतात. सध्या अमेरिकेत आणीबाणी नाही; परंतु तरीही अमेरिकेचे जगातील अनेक देशांशी असलेल्या व्यापारातील असंतुलन कमी करण्यासाठी त्यांनी 'जशास तसा कर' ही टूम काढली. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ट्रम्प यांना नाहीत. हे अधिकार अमेरिकेच्या सिनेटला आहेत. ट्रम्प यांनी जशास तशा कराराची घोषणा केल्यानंतर त्यांच्याच पक्षातून विरोध झाला. त्यांचे सल्लागारही त्यांच्यासोबत राहिले नाहीत. एलॉन मस्क यांच्यासारख्यांनी साथ सोडली, तरी ट्रम्प यांना त्याचे काहीच वाटले नाही. जगातील देशांवर कर लादून आपण अमेरिकनांचे भले करू इच्छितो, हा त्यांचा भ्रम आहे. त्यांच्या कररचनेमुळे अमेरिकन निर्यातदार नाराज झाले. युरोपीय महासंघ अमेरिकेचा मित्र होता; परंतु युरोपीय संघानेही अमेरिकेला इशारा दिला. कॅनडा, मेक्सिको सारख्या देशांबाबत तर त्यांना माघार घ्यावी लागली. सर्वाधिक कर लादलेल्या चीनशीच अमेरिकेने सर्वात अगोदर सविस्तर व्यापार करार केला. या पार्श्वभूमीवर अलिकडेच अमेरिकेतल्या एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांना मोठा धक्का दिला. न्यायालयाने त्यांचे 'लिबरेशन डे' व्यापार आदेश अवैध घोषित केले आणि एकतर्फी कर लादण्याच्या अधिकारापुढेही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

ट्रम्प यांनी अनेक देशांवर मनमानी कर लादले होते. आशियातील शेअर बाजारांवर याचा मोठा परिणाम झाला होता. करांच्या मुद्द्यावरून अमेरिका आणि चीन आमनेसामने आले होते आणि अनेक दिवस तणाव होता. काही दिवसांनंतर दोन्ही देशांमधील तणाव कमी झाला होता. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले आहे की ट्रम्प यांनी जागतिक कर लादण्यासाठी येथील आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक शक्तींचा वापर केला आणि असे करून त्यांनी आपल्या अधिकारांचे उल्लंघन केले आहे. न्यायाधीशांच्या पॅनेलने म्हटले आहे की व्हाईट हाऊसने या प्रकरणात पूर्णपणे कायद्याविरुद्ध काम केले आहे. न्यायालयाने म्हटले आहे, की लागू केलेले कर आदेश राष्ट्रपतींना उपलब्ध असलेल्या कोणत्याही अधिकारापेक्षा जास्त आहेत. न्यायालयाच्या निर्णयानंतर ट्रम्प यांचे सर्वात महत्वाचे व्यापार धोरण थांबवण्यात आले आहे. न्यायालयाचा हा निर्णय ट्रम्प यांच्या आर्थिक धोरणांना मोठा धक्का आहे कारण त्यांनी ते देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन म्हणून सादर केले होते. भारतातील सर्वोच्च न्यायालयाने जसा राष्ट्रपती आणि राज्यपालांनी विधेयकांबाबत ठराविक कालावधीत निर्णय घ्यावा, असा आदेश दिला आणि त्यानंतर राज्यपालांना आणि राष्ट्रपतींना तो आपल्या अधिकारात हस्तक्षेप वाटला, तसाच हस्तक्षेप ट्रम्प समर्थकांना वाटला. न्यायालयाच्या निर्णयावर 'व्हाईट हाऊस'ने टीका केली. हे एक प्रकारचे न्यायालयीन अतिक्रमण आहे. निवडणुकीशिवाय आलेल्या न्यायाधीशांनी राष्ट्रीय आणीबाणीला कसे सामोरे जायचे हे ठरवू नये, अशी टीका करण्यापर्यंत व्हाईट हाऊसची मजल गेली.

ट्रम्प यांनी अमेरिकेला प्रथम स्थान मिळवून देण्याचे वचन दिले आहे आणि त्यांचे प्रशासन अमेरिकेची महानता पुनर्संचयित करण्यासाठी आवश्यक ते प्रत्येक पाऊल उचलण्यास वचनबद्ध आहे, असे 'व्हाईट हाऊस'ने म्हटले आहे. या प्रकरणी न्यायालयात दोन वेगवेगळे खटले दाखल करण्यात आले. एक खटला 'व्हीओएस सिलेक्शन्स' ही दारू उत्पादक कंपनी आणि इतर चार अमेरिकन कंपन्यांच्या वतीने दाखल करण्यात आला. या कंपन्यांनी म्हटले होते की शुल्क लादल्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले आहे, तर दुसरा खटला ओरेगॉनच्या नेतृत्वाखालील बारा राज्यांनी दाखल केला होता. सरकारी संस्थांनी खरेदी केलेल्या वस्तूंच्या किमती या शुल्कामुळे वाढतील, असा याचिकाकर्त्यांचा दावा होता. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकारच्या वतीने न्यायालयात उपस्थित असलेल्या वकिलांनी ट्रम्प यांच्या शुल्क धोरणावर कायदेशीर बंदी घालण्यामुळे अमेरिकेच्या जागतिक स्थानाला धक्का बसेल, असा युक्तिवाद केला; परंतु न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचे युक्तिवाद फेटाळून लावले आणि म्हटले की, राजकीय कारणांमुळे, राष्ट्रपतींना कायद्यानुसार जे करण्याची परवानगी नाही, ते करण्याची परवानगी देता येणार नाही. ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क लादले, तेव्हा त्याला तीव्र विरोध झाला होता. त्यानंतर, व्हाईट हाऊसने एक पाऊल मागे घेत शुल्क दर कमी केले. यासोबतच अमेरिकेने चीनसोबत सुरू असलेला संघर्ष कमी करण्याचा प्रयत्नही केला. अमेरिकेच्या जनतेने अध्यक्षपदी निवडून दिले, म्हणजे काहीही करायला परवानगी मिळाली, अशा थाटात डोनाल्ड ट्रम्प वावरत होते.

गेल्या जानेवारीमध्ये नागरिकत्वाच्या मुद्यावरून अमेरिकेच्या न्यायालयाने फटकारूनही ट्रम्प यांना शहाणपण आले नव्हते. त्यांचे अनेक निर्णय घटनात्मक पेच निर्माण करणारे होते. भारत-पाकिस्तान संबंधात नाक खुपसणे असो वा टॅरिफ वॉर; ट्रम्प यांनी वादग्रस्त निर्णयांचा सिलसिला सुरू ठेवला. त्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या न्यायालयानेच ट्रम्प यांच्या निर्णयाला स्थगिती दिली आणि त्यांना चांगले फटकारले हे बरे झाले. या निमित्ताने ट्रम्प यांना न्यायालयाकडून मोठा झटका बसला. अमेरिकेतील मॅनहॅटन येथील एका संघीय न्यायालयाने ट्रम्प यांनी लादलेल्या 'लिबरेशन डे टॅरिफ'वर बंदी घातली आहे. न्यायालयाने निकाल देताना म्हटले आहे की अध्यक्षांनी त्यांच्या अधिकारांचा गैरवापर केला असून अमेरिकन संविधानाविरुद्ध पावले उचलली आहेत. तथापि, ट्रम्प प्रशासनाने आपल्या निर्णयाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आणि टॅरिफ कायम ठेवण्याचा आग्रह धरला. ट्रम्प प्रशासनाने न्यायालयात युक्तिवाद केला की, या प्रकरणातील कायदेशीर अडचणीमुळे चीनसोबतच्या असमान व्यापार संघर्षाची दिशा बदलू शकते आणि भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या युद्धबंदीचा अंत होऊ शकतो. ट्रम्प प्रशासनाने दावा केला की, अध्यक्षांनी मे महिन्याच्या सुरुवातीला भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी करण्यासाठी आपल्या टॅरिफ अधिकाराचा वापर केला होता. अमेरिकेने भारत आणि पाकिस्तानमधील तणाव थांबवण्यासाठी टॅरिफ वॉरचा उपयोग केल्याचा दावा केला होता. त्यावरूनही न्यायालयाने त्यांना फटकारले.

ट्रम्प प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले, की अनेक देशांसोबत टॅरिफबाबत व्यापार चर्चा सुरू असून व्यापार करारांना अंतिम रूप देण्याची शेवटची तारीख ७ जुलै आहे. अध्यक्षांचा हा युक्तीवाद न्यायालयाने फेटाळून लावला. 'कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेड'च्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने म्हटले की, अमेरिकन संविधानानुसार परदेशी देशांसोबत व्यापार नियंत्रित करण्याचा अधिकार फक्त अमेरिकन काँग्रेस म्हणजेच संसदेला आहे, अध्यक्षांना नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की हा विषय राष्ट्रपतींच्या आणीबाणीच्या अधिकारांतर्गत येत नाही. कायदा ट्रम्प यांना आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याअंतर्गत टॅरिफ लादण्याचा अमर्याद अधिकार देत नाही. अमेरिकेच्या अध्यक्षांना कररचनेचा अमर्याद अधिकार आहे, असा दावा करण्यात आला; परंतु न्यायालयाने अमेरिकन संविधानानुसार, टॅरिफ लादण्याचा अधिकार संसदेकडे म्हणजेच काँग्रेसकडे आहे, असे मत नोंदवताना अध्यक्षांना केवळ असाधारण आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये मर्यादित अधिकार मिळतात; परंतु ट्रम्प यांच्या बाबतीत अशी कोणतीही वैध आणीबाणी नव्हती, असे निदर्शनास आणले आहे. १९७१ मध्ये तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनीही आणीबाणीच्या अंतर्गत शुल्क लादले होते आणि न्यायालयाने ते मंजूर केले होते. अध्यक्षांनी आणीबाणी जाहीर केल्याची वैधता ठरवणे हा न्यायालयाचा नव्हे, तर काँग्रेसचा विशेषाधिकार आहे. ट्रम्प प्रशासनाने केलेले हे युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावले.

अमेरिकेच्या 'कमांडर-इन-चीफ'ने २ एप्रिल रोजी बहुतेक व्यापारी भागीदारांवर दहा टक्के बेसलाइनसह शुल्क जाहीर केले. अमेरिकेची सर्वात जास्त व्यापार तूट असलेल्या, विशेषतः चीन, युरोपीय महासंघ आणि भारत अशा देशांवर अमेरिकेतर्फे उच्च दर लागू करण्यात आले. यापैकी अनेक देशांवरील नवे शुल्क एका आठवड्यानंतर थांबवण्यात आले. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला अमेरिकेतील व्यापारी संघटनांनी आव्हान दिले होते.

**(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)**





# संकटात रिझर्व्ह बँकेचा मदतीचा हात

**भारत आणि पाकिस्तान दरम्यानचा तणाव, अमेरिकेच्या 'टॅरिफ वॉर'ची भीती आणि कोरोनाच्या रुग्णांची वाढती संख्या यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर ताण आला असताना रिझर्व्ह बँक सरकारच्या मदतीला धावून आली. तिने दोन लाख ६९ हजार लाख रुपयांचा लाभांश दिल्याने सरकारला हायसे वाटले. या निधीचा वापर सरकार कोणत्या योजनांसाठी करते ते आता पहायचे.**

दृष्टीक्षेप

जनार्दन पाटील

रिझर्व्ह बँकेने गेल्या तीन वर्षांपासून सरकारची फार मोलाची मदत केली आहे. रिझर्व्ह बँकेला होणाऱ्या नफ्यातील काही भाग स्वतःकडे ठेवून बँक केंद्र सरकारला लाभांश देत असल्याने या रकमेचा वापर सरकार वेगवेगळ्या कारणांसाठी करू शकते. त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या सरकारी तिजोरीवरचा ताण कमी होत आहे. पाकिस्तानने भारतात दहशतवादी घुसवून एक प्रकारे भारताच्या अर्थव्यवस्थेला धक्का लावण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न होता. काश्मीरमधील पर्यटनावर परिणाम झाला आहेच. भारत आणि पाकिस्तानदरम्यानच्या तणावानंतर भारताला संरक्षण खर्चासाठी तरतूद वाढवावी लागली. एकीकडे पाकिस्तान कुरापती करत असताना अमेरिकेच्या अध्यक्षांनीही भारतावर टॅरिफ अस्त्र उगारले. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. सरकारच्या योजनाबाह्य खर्चात वाढ होत असताना रिझर्व्ह बँक मदतीला आल्याने पाकिस्तान आणि अमेरिकेचेही मनसुबे उधळून लावल्यासारखी स्थिती आहे. रिझर्व्ह बँकेने दोन लाख ६९ हजार कोटी रुपयांचा लाभांश दिल्याने सरकारला जीडीपीच्या ०.१५ टक्के एवढा अतिरिक्त राजकोषीय पाठिंबा मिळण्याची अपेक्षा आहे. सलग तिसऱ्या वर्षी रिझर्व्ह बँकेचा प्रत्यक्ष लाभांश अंदाजित रकमेपेक्षा जास्त आहे. आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पातील अंदाजित २.१ ट्रिलियन रुपयांपेक्षा हा लाभांश सुमारे २८ टक्के जास्त आहे. अहवालानुसार, ही अतिरिक्त रक्कम कर संकलनातील संभाव्य घट आणि नाममात्र जीडीपीवाढीची भरपाई करू शकते. 'एमके ग्लोबल फायनान्शियल सर्व्हिसेस'च्या अहवालानुसार या मोठ्या लाभांशामुळे यंत्रणेमधील तरलता सुधारेल.

या पार्श्वभूमीवर येत्या काळात ४ ते ४.५ ट्रिलियन रुपयांची 'सुपर सरप्लस लिक्विडिटी' दिसून येऊ शकते. यामध्ये चलनात हंगामी घसरण आणि रिझर्व्ह बँकेचे 'ओपन मार्केट ऑपरेशन' (ओएमओ) महत्त्वाची भूमिका बजावतील. गेल्या वेळच्या तुलनेत या वेळी ३९८ अब्ज डॉलरची सकल परकीय चलन (एफएक्स) विक्री जास्त होती. त्यामुळे परकीय चलनातून मिळणाऱ्या उत्पन्नात मोठी वाढ झाली. यासोबतच सरकारी सुरक्षे(जी-सेक)मधून मिळणारे व्याजाचे उत्पन्नही वाढले आहे. याच कारणामुळे या वेळी रिझर्व्ह बँक इतका मोठा लाभांश देऊ शकली. अहवालानुसार, या वर्षाच्या अखेरीस दहा वर्षांच्या सरकारी बाँडचे उत्पन्न सहा टक्क्यांपर्यंत घसरू शकते. पाकिस्तानच्या 'प्रॉक्सी वॉर'मुळे भारताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता होती. दुसरीकडे, अमेरिकन टॅरिफमुळे भारताचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारताच्या आर्थिक विकासालाही धक्का बसू शकतो. अशा परिस्थितीमध्ये रिझर्व्ह बँकेकडून सरकारला मिळणारा लाभांश अमेरिकेने लादलेल्या शुल्कवाढीचा आणि पाकिस्तानसोबतच्या संघर्षामुळे संरक्षणावरील वाढत्या खर्चाचा सामना करण्यास मदत करेल. ही रक्कम पाकिस्तानला जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेकडून मिळणाऱ्या देणगीपेक्षा खूपच जास्त आहे. पाकिस्तानला पुढील दहा वर्षांमध्ये जागतिक नाणेनिधीकडून सात अब्ज डॉलर्स आणि जागतिक बँकेकडून २० अब्ज डॉलर्सचे बेलआउट पॅकेज मिळणार आहे.

भारत सरकारला रिझर्व्ह बँकेकडून ३१ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी मिळाला आहे. पाकिस्तानला आपल्या संपूर्ण अर्थव्यवस्थेला पुनरुज्जीवित करण्यासाठी जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकांसारख्या संस्थांच्या दयेवर अवलंबून रहावे लागते आहे. त्याच वेळी रिझर्व्ह बँक एका वर्षात सरकारला लाभांश म्हणून त्यापेक्षा खूप जास्त पैसे देत आहे. २०२४-२५ मध्ये रिझर्व्ह बँक ३७१.६ अब्ज डॉलर्सची विक्री करणार आहे. गेल्या वर्षी विकलेल्या १५३ अब्ज डॉलर्सच्या तुलनेत हे प्रमाण दुप्पट आहे. त्यामुळे रुपया स्थिर होईल आणि परकीय चलनाचा नफा मिळेल. विक्रमी लाभांशामुळे सरकारला अधिक आर्थिक आधार मिळतो. यामुळे राजकोषीय तूट २०-३० बेसिस पॉइंट्सने कमी होण्याची अपेक्षा आहे. राजकोषीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यांवरून सुमारे ४.२ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या २.६९ लाख कोटी रुपयांच्या रकमेचा वापर सरकार विविध विकासकामांसाठी आणि अर्थव्यवस्थेचे संतुलन साधण्यासाठी करेल. सरकारचा एकूण खर्च त्याच्या एकूण उत्पन्नापेक्षा जास्त असतो, तेव्हा राजकोषीय तूट म्हणतात. प्रत्येक सरकार ही तूट कमी करू इच्छिते. २०२५-२६ साठी सरकारने वित्तीय तूट जीडीपीच्या ४.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. रिझर्व्ह बँकेने लाभांश दिल्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढेल आणि उत्पन्न आणि खर्चातील फरकही कमी होईल. स्टेट बँकेच्या अहवालानुसार रिझर्व्ह बँकेकडून लाभांश मिळाल्याने वित्तीय तूट जीडीपीच्या ४.२ टक्क्यापर्यंत कमी होऊ शकते.

रिझर्व्ह बँकेकडून लाभांश मिळाल्यानंतरही सरकारने कर्ज घेणे कमी केलेले नाही, तर त्यांच्या खिशात खर्च करण्यासाठी भरपूर पैसे असतील. हे पैसे कल्याणकारी योजना आणि सरकारी अनुदानांवर खर्च करता येतील. इमारती, रस्ते, पूल, अशा पायाभूत सुविधांवर पैसे खर्च करण्याला भांडवली खर्च म्हणतात. त्यातून रोजगार वाढतो. चलन फिरते आणि बाजारात उलाढाल वाढते. केंद्र सरकारची सध्याची अवस्था 'आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन डोळे' अशी आहे. रिझर्व्ह बँकेने नफ्यातील किती टक्के रक्कम केंद्र सरकारला द्यावी, याबाबत मतमतांतरे आहेत. डॉ. रघुराम राजन, डॉ. ऊर्जित पटेल यांच्यासारख्या काही गव्हर्नरांचा रिझर्व्ह बँकेचा लाभांश केंद्र सरकारला द्यायला विरोध होता. आपत्कालीन परिस्थितीत या निधीचा वापर बँकांच्या सुदृढीकरणासाठी केला जावा, अशी त्यांची भूमिका होती. रिझर्व्ह बँकेचे पैसे सरकारला देण्यासही विरोध असण्याचे कारण नाही; परंतु या निधीचा वापर सरकार कसा करते, हे पहायला हवे. रिझर्व्ह बँक दर वर्षी नफ्याचा एक भाग सरकारला लाभांश म्हणून देते. रिझर्व्ह बँक कायदा १९३४ अंतर्गत या नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. गेल्या वर्षी भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली होती. त्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या नफ्यातही वाढ झाली. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केल्यामुळे बँकेचे उत्पन्न वाढले होते. आता रेपोदरात कपात सुरू झाली आहे.



या वर्षी रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेला लाभांश हा आतापर्यंतचा सर्वात मोठा असून बिमल जालान समितीच्या शिफारशीच्या आधारे दिला जात आहे. या पैशाचा वापर करून सरकार वित्तीय तूट कमी करू शकेल. तसेच नवीन योजनांवर नेमकेपणाने खर्च करण्यास मदत होईल. या पैशांच्या वापरामुळे सरकारला लोककल्याणकारी योजनांसाठी पैसे जमा करणे पूर्वीपेक्षा सोपे होणार आहे. कोणत्याही सरकारचे विविध स्रोतांमधून मिळणारे उत्पन्न खर्चापेक्षा कमी असते, तेव्हा वित्तीय तूट निर्माण होते. सरकारला प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कर इत्यादींमधून उत्पन्न मिळते; मात्र पगार, अनुदान, व्याज आदींसाठी सरकारकडून हा खर्च केला जातो. ही परिस्थिती चांगली नाही. कारण याचा अर्थ सरकार आपला खर्च भागवण्यासाठी कर्ज घेत आहे, असा होतो. सरकारने कमी कर किंवा शुल्क वसूल केले किंवा अर्थव्यवस्था मंद गतीने वाढत असेल, तर कमी महसूल मिळतो. अशा वेळी लाभांशाचा भरणा अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम करू शकतो. त्यामुळे सरकारला खर्च करण्यासाठी अतिरिक्त पैसा मिळतो. रिझर्व्ह बँक व्यापारातून कमाई करते. रुपयाचे मूल्य संतुलित ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँक बाजारात डॉलरची विक्री करते. पुढील महिन्यातही रिझर्व्ह बँक दर कमी करेल, अशी अपेक्षा आहे. यामुळे ईएमआय कमी होण्याची शक्यता आहे. याशिवाय यामुळे संरक्षण आघाडीवर सरकारला मोठा दिलासा मिळू शकतो. कारण भारत-पाकिस्तान तणावामुळे देशाला आपले संरक्षण बजेट वाढवावे लागेल, अशी अपेक्षा होती. यामुळे त्याचे नुकसान वाढण्याची शक्यता होती. तथापि, रिझर्व्ह बँकेकडून मिळालेल्या पैशामुळे सरकारला या क्षेत्राकडून दिलासा मिळेल.

आता भविष्यात भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला तर वित्तीय तुटीवर परिणाम होऊ शकतो. संरक्षण, भारतीय सेना तसेच सीमेवरील तणावादरम्यान संरक्षण खर्चाचा भारताच्या आर्थिक बळावर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी रिझर्व्ह बँकेचा निधी संरक्षण सिद्धतेवर आणि सरकारी तिजोरीतील निधी पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजनांसाठी उपयोगी पडतो.

# 'समाजभान' येण्याची हीच वेळ!

**पुढच्या २५ वर्षांत एकसंध, एकात्म, बंधुत्वावर आधारित समाज उभा करण्यासाठी नवनवीन प्रयोग आणि प्रयत्न अधिक जोमाने व्हायला हवेत. अन्य काही देशांनी प्रगतिशील समाजव्यवस्था उभारुन हे साध्य करुन दाखवले आहे. भारतानेही ठरवले तर ही गोष्ट अशक्य नाही, कारण आपला देश वैभवशाली असून, त्यामध्ये निश्चितच अशी आंतरिक शक्ती आहे.**

---------------

आजवरच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणं आणि पुढच्या पंचवीस वर्षांत आपला समाज कसा असावा, हे ठरवणं हीच खरं तर आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाची आणि त्यामुळेच पहिल्या प्राधान्याची गोष्ट आहे. आपल्यासमोर येणारे इतर सगळे मुद्दे अखेरीस एका गोष्टीवरच अवलंबून असतात आणि ती म्हणजे, आजचा समाज कसा आहे? आणि तो उद्या कसा असेल?

**माणसानेच उभी केली समाज - संस्कृती**

माणसाचं अस्तित्व दोन लाख वर्षांपासून असलं, तरी त्याच्या इतिहासाची खरी सुरूवात झाली, ती सुमारे बारा हजार वर्षांपूर्वी. जंगलातील भटकंती संपवून शेतीस सुरूवात झाली आणि समाज अस्तित्वात आला.

एकत्र राहण्यामुळे एकमेकांवरचं अवलंबित्व वाढलं. इतर सर्व प्राण्यांसारखे केवळ जगणं आणि प्रजोत्पादन याच्या पलीकडे जाऊन मानवाने एकत्रित येऊन एक नवी संस्कृती उभी केली- समाज या माध्यमातून.

सुरुवातीला अन्न, वस्त्र आणि निवारा या गरजांभोवती फिरणारा हा समाज हळूहळू चालीरीती, धर्म, जाती, भौगोलिक सत्ता या संकल्पनांनी विभागला गेला आणि एकत्रित जीवनाच्या संकल्पनेला पहिल्यांदा तडा गेला, जो अजूनही भरून निघालेला नाही.

गेल्या पाचशे वर्षांपर्यंत विश्वातील एका अनामिक शक्तीच्या किंवा ह्यदेवह या नावाने सांगितलेलं तत्त्वज्ञान आणि शेती या दोघांचं प्राबल्य टिकून होतं. मात्र, त्यानंतर आलेली वैज्ञानिक प्रगती आणि १७७६ पासून सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतींमुळे संपूर्ण धारणाच बदलून गेली आहे.

**विखुरलेपण बनले सामाजिक ओळख**

भारतात सुमारे साडेतीन हजार वर्षांपासून जातीपाती आणि मागील सुमारे बाराशे वर्षांपासून धार्मिक द्वेष आणि तेढ सुरू आहे. या सामाजिक तुकड्यांनी आणि त्यामुळे रुजलेल्या द्वेषाने समाजाला कायमस्वरूपी जायबंदी आणि विखुरलेलं ठेवण्याचं काम केलं आहे.

स्वातंत्र्यापूर्वी दुष्काळ, महामारी, युद्ध यांमुळे लाखो मृत्यू होत असताना तशा प्रतिकूल परिस्थितीतही जातीधर्मांच्या आधारे सामाजिक द्वेष तेवत ठेवण्यात आला. आणि हीच या समाजाची दुर्दैवी ओळख ठरली.



**सर्वांगीण प्रगतीचं श्रेयही समाजाचंच...**

महेश झगडे

स्वातंत्र्यानंतर मात्र चौफेर विकास झाला. दुष्काळजन्य मृत्यू इतिहासजमा झाले, समाज सुबत्तेकडे गेला. हजारो वर्षांच्या संस्कृतीची पार्श्वभूमी असलेला हा समाज प्रगल्भ, दूरदृष्टी असलेला, शांतताप्रिय आणि समंजस ठरेल, अशी अपेक्षा होती.

गेल्या पंचाहत्तर वर्षांत अनेक सकारात्मक सामाजिक बदल झाले. दारिद्ररेषेखालील मोठा वर्ग वर आला, आरोग्य आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या, शिक्षण काही लोकांसाठीच हजारो वर्षे आरक्षित केले गेले होते, त्याची फळे आता सर्व समाज आणि विशेषतः महिलांना होवून साक्षरता वाढली, सरासरी आयुष्य ३४ वरून ७० वर्षांपेक्षा जास्त झालं.

अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक दुर्बलांना आरक्षण अशा अनेक पावलांमुळे समाजाला एकाच पातळीवर आणण्याचा प्रयत्न झाला. या स्तुत्य बाबींचं समाजाने श्रेय घेतलंच पाहिजे.

विशेष म्हणजे, लोकांनी आवश्यक ते सुसंगत असं राजकीय नेतृत्व तयार केलं आणि त्यायोगे विकास आणि लोकशाहीची मशाल तेवत राहिली. देशाची एकता आणि अखंडता टिकवली गेली, देश हुकूमशाहीकडे गेला नाही. हे सगळं फार देदीप्यमान आणि गौरवास्पद आहे.

**वैचारिक प्रदूषणातून विद्धवंसाकडे...**

पुढील पंचवीस वर्षांत मात्र या समाजासमोर नवी आव्हानं उभी राहणार आहेत. जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात एकसंध समाज तयार करणं, हे एक मोठं लक्ष्य ठरणार आहे.

उत्क्रांतीच्या प्रवाहात समाज नैसर्गिकरित्या कृत्रिम भिंती भेदून एकत्र येतो. पण, भारतात साडेतीन हजार वर्षांपासून सुरू असलेल्या वैचारिक प्रदूषणातून तयार झालेल्या जातिव्यवस्थेमुळे हे एकत्र येणं अजूनही अशक्य वाटतं. हे प्रदूषण कमी होण्याऐवजी अधिक घातक होणार नाही, याची जबाबदारी आता समाजावर आहे.

जातीधर्मांच्या आधारावर राजकारण करून सत्तास्थापन करणं, अल्पसंख्याक किंवा विशिष्ट समूहांनी आपलं तथाकथित वर्चस्व चालू ठेवण्यासाठी समाजात कायमस्वरूपी अस्थिरता निर्माण करणं हे थांबलं नाही, तर देशात पूर्वी कधीही न पाहिलेला विद्धवंस घडू शकतो.

आपलीच संस्कृती योग्य असा संकुचित, गर्भित विचार ठसवला गेला, तर देशाचं भवितव्यच धोक्यात येईल. आणि त्याचा सर्वांत मोठा, न भूतो न भविष्यती असा फटका अशा संकुचित विचारसरणींनाच बसू शकतो.

**आता मूलगामी सुधारणाच हव्यात**

आता हे सारं रोखायचं असेल, तर समाजाने आपली दिशा बदलली पाहिजे. समाज म्हणजे धर्मांधतेचं कुरण नाही की जातीय बुबुळाचं काजवेघर नाही. समाज म्हणजे भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक विविधता अंगीकारून एकत्र जगण्याचा प्रयोग. आणि हा प्रयोग पुढे न्यायचा असेल, तर त्या कंपूवृत्तीला, त्या लहानशा वर्चस्वप्रिय टोळक्याला.. बंद करा हा तमाशा! असं ठामपणे सांगायला हवं.

आपल्या जातींनी, धर्मांनी, पंथांनी आता स्वतःमध्ये मूलगामी सुधारणा केली नाही, तर समाजप्रलय आपल्या उंबरठ्यावर उभा आहे. आणि तो आल्यावर रडून उपयोग होणार नाही, कारण सर्वप्रथम हेच कंपू त्यात गिळंकृत होतील, जे आज आमचं श्रेष्ठत्व अशा भ्रामक स्वप्नात हरवले आहेत.

**सामाजिक एकत्वाची अपरिहार्यता**

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिलं, तर चिंपांझी आणि माणूस यांच्यातील डीएनएमध्ये केवळ एक टक्का फरक आहे. त्यामुळे मानवामध्ये जात, धर्म, वर्ण यांच्यामुळे भिंती उभ्या करणं केवळ अज्ञान आणि विषमता वाढवणारं ठरतं.

अशा स्थितीत समाजामध्ये एकत्व निर्माण करणं केवळ आवश्यकच नाही, तर अपरिहार्य ठरले आहे. या दृष्टीने धर्मांधता, अंधश्रद्धा, बुवाबाजी, जातीय आणि धार्मिक तेढ, मंदिर - मशीद राजकारण या सर्व गोष्टींना समाजाने तिलांजली द्यायला हवी. नाही तर सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येईल आणि देश एका नव्या संकटाकडे झुकेल.

गेल्या पंचाहत्तर वर्षांत आरक्षणासारखी धोरणं राबवून समाजातील तफावत दूर करण्याचा प्रयत्न झाला. परंतु, हजारो वर्षांची विषमता केवळ पंचाहत्तर वर्षांत मिटेल, हा विचार अव्यवहार्य आहे. त्यामुळे पुढच्या २५ वर्षांत एकसंध, एकात्म, बंधुत्वावर आधारित समाज उभा करण्यासाठी नवनवीन प्रयोग आणि प्रयत्न अधिक जोमाने व्हायला हवेत.

अन्य काही देशांनी प्रगतिशील समाजव्यवस्था उभारून हे साध्य करून दाखवले आहे. भारतानेही ठरवले तर ही गोष्ट अशक्य नाही, कारण आपला देश वैभवशाली असून, त्यामध्ये निश्चितच अशी आंतरिक शक्ती आहे. एकंदरीत, पुढील पंचवीस वर्षांत समाजाने समता, बंधुत्व, समभाव आणि आर्थिक समानता यावर भर दिला, तरच देशाचं भवितव्य उज्ज्वल असेल. अन्यथा, नाही!

# आठवणीत ती...आयुष्यात तू

ॲड. रक्षा नगराळे
राळेगाव
९५४५१४६९०९

मनाला हवाहवासा वाटणारा तो पहाटेचा गार वारा, ती सूयार्ची किरणं, तो पक्षांचा किलबिलाट आणि फुलांचा सुगंध...खरंच एखाद्या कवीला कविता सुचावी असच प्रफुल्लित वातावरण...

घड्याळात सहाचा ठोका पडला आणि मला जाग आली. नको असतानाही अंथरूनावरून उठावच लागलं... स्वप्निल माझा नवरा, त्यालाही उठवलं. (दोघांनाही कामावर जायचं असल्यामुळे कामाची गडबड व्हायला नको) तेवढ्यात स्वप्निलच्या मोबाईलवर फोन आला.

तो अंघोळीला गेला असल्यामुळे मी त्याला आवाज दिला, तुझा मोबाईल वाजतोय. तो म्हणाला, बघ! कुणाचा आहे? मी कॉल उचलला, पण कुणीच बोललं नाही. मला वाटल नेटवर्क नसेल कदाचित.

परत तोच नंबर...मी परत हॅलो म्हणताच कॉल कट...मी स्वप्निलला आवाज दिला, नंबर सेव्ह नाही आणि फोन उचलला की कुणीच बोलत नाही. तो म्हणाला काय नंबर आहे? मी त्याला 8766****68 नंबर सांगितला. तो काहीच बोलला नाही.

बाथरूम मधून बाहेर येताच मी म्हटल, कुणाचा नंबर आहे? कुणीच बोललं नाही. काही काम असेल, बोलून घे! तो थोडा हसला आणि म्हणाला, तुला खरचं नंबर माहीत नाही. मी म्हटले नाही, कुणाचा आहे? कुणी आपल्या जवळच आहे का? तो म्हणाला, जवळचा नाही पण आठवणीतला मात्र नक्कीच आहे...

मी म्हटल, तुझी ती का फुग्गा... तो हसला आणि म्हणाला, हो! तीच फुग्गा... मग दोघेही मनसोक्त हसलो. मध्येच मोबाईल वाजला. मी म्हटल, बोलून घे! काही महत्वाचं असेल. तो म्हणाला, नाही...नको...राहू दे...

पण माझ्या म्हणण्यावरून त्याने फोन उचलला. मी उठून कामाला लागणार तोच त्याने हात पकडून मला थांबवलं आणि फोन स्पीकरवर ठेवला. मी म्हटल, अरे तू बोल ना! मला कामं आहेत. तो इशाऱ्याने मला बस्स इतकेच म्हणाला...

त्याने हॅलो म्हणताच तिकडून तिचा आवाज आला. कसा आहेस? ओळखलास का? तो म्हणाला मजेत आहे. ती म्हणाली कॉल कुणी उचलला, माझा नंबर सेव्ह नाही का?

तो म्हणाला, नंबरची आता गरज वाटत नाही ग! आणि कॉल माझ्या बायकोने उचलला होता...तू सांग कसा काय एवढ्या वर्षांने कॉल केला? काही काम होत का? ती म्हणाली, नाही रे आठवण म्हणून केला सहज...

तो म्हणाला ठीक आहे. मला कामावर जायला उशीर होतोय, ठेवतो फोन...

ती म्हणाली मला बोलावं वाटतं तुझ्याशी, तुला नाही का वाटत?...तो म्हणाला, नाही मला वेळच नसतो बोलायला. ती म्हणाली तू बदललास. तो म्हणाला, हो! वेळेनुसार प्रत्येकाला बदलावंच लागतं.

ती चिडून म्हणाली, तू माझं आयुष्य बर्बाद केलंस. तो हसून म्हणाला, हे तू तुझ्या मनाला विचार...ती म्हणाली खरंच खुश आहे का तू लग्न करून?...तो म्हणाला, हो!

माझ्या सारख्या फाटकं नशीब असणाऱ्याला जीव ओवाळून प्रेम करणारी प्रेमळ आणि समजूतदार बायको मिळाली, गोंडस मुलगी आमच्या आयुष्यात आली. न मागताच एवढं सगळ पदरी पडल्यावर मी खुश का नाही असणार..?

तू देखिल तुझ्या आयुष्यात खूप पुढे जा, तुला हव ते मिळव आणि झालं गेलं विसरून जा...तिच्या बोलण्यावरून, आवाजावरून वाटलं ती खूपच चिडलेली असावी...

ती रडक्या स्वरात म्हणाली किती सहज बोललास तू..? तुझ्या बायकोला जर आपलं माहीत झालं तर तुझं देखिल आयुष्य बर्बाद होईल. तुझा विचार करूनच मी बोलली नाही तुझ्या बायकोला आणि तू म्हणतोस सगळ विसरून जा...

त्याने माझ्याकडे बघितलं आणि परत एकदा स्मितहास्य करत तिला बोलला, तू चिडलेली असली की तुला मी फूग्गा म्हणायचो, तू खरचं फुगा आहेस...अगं! तू हे जे काही बोललीस ना, ते सगळ माझ्या बायकोला आधीच माहीत आहे आणि आता देखिल ती इथे माझ्या जवळच बसलेली आहे. तुला जर तिला बोलायचं असेल तर देतो तिला फोन...

तिने घाबरलेल्या आवाजात नाही, नको म्हणत फोन कट केला...मी म्हटलं बोलत जा रे कधी फोन आला तर... तो हसत म्हणाला, आता फोन करेल असं वाटत नाही.

मी मस्करी करत विचारले काय फरक आहे तिच्यात आणि माझ्यात?... तो माझा हात हातात घेत म्हणाला, ती होती आणि तू आहेस... ती फक्त आठवणीत आणि तू आयुष्यात..

.मी बस्स पुरे माझं कौतुक म्हणत त्याच्या हातातील माझा हात बाजूला करून चहाचा कप त्याच्या हातात दिला आणि दोघेही चाय पे चर्चा करत मनसोक्त हसलो...



# एआयच्या वाटेवर भारत जगात अग्रेसर

आपण अशा युगात जगतो आहोत, जिथे माणसाच्या विचारांइतकीच मशीनची बुद्धिमत्ता झपाट्याने विकसित होत आहे. कदाचित त्याहूनही जास्तच.. ही बुद्धिमत्ता म्हणजे एआय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता.

पूर्वी विज्ञानकथांमध्ये वाचलेली कल्पनारम्य यंत्रे आज आपल्या खऱ्या आयुष्यात काम करताना दिसत आहेत. कधी डॉक्टरांच्या सहाय्यकाच्या रूपात, कधी स्मार्टफोनमधील वैयक्तिक सहाय्यकाच्या रूपात, तर कधी शेतकऱ्याला पीक कसे घ्यावे, हे सांगणाऱ्या ॲप्सच्या स्वरूपात!

जगभरातील अनेक देश एआयचा वेगाने विकास करत आहेत आणि भारतही या स्पर्धेत मागे नाही. पण, या एकूणच स्मार्ट-टेक्नो युगात भारताचं काय योगदान आहे? आणि नजीकच्या भविष्यात भारतात काय गोष्टी घडू शकतात?

जगातला पहिला एआय आधारित कोडिंग प्लॅटफॉर्म स्वागत चौधरी यांनी म्हणजे एका भारतीय व्यक्तीने तयार केला. राइस युनिव्हर्सिटीमध्ये त्यांनी हे संशोधन केलं आणि एआयचा वापर करून कोडिंग कसं केलं जाऊ शकेल? त्यात आणखी सुधारणा कशी करता येईल? कोड कशा पद्धतीनं टेस्ट केले जाऊ शकतील? यावर त्यांनी काम केलं.

या क्षेत्रातील दुसरे भारतीय नाव म्हणजे आपल्याच महाराष्ट्रातले पराग हवालदार. त्यांनी एआयमार्फत ॲनिमेशनचा वापर कसा केला जाऊ शकतो आणि यानुसार तुम्ही सांगितलेला तुमचा इच्छित कंटेन्ट ॲनिमेशन कसा होऊ शकतो, यावर काम करुन तसा प्लॅटफॉर्म तयार केला.

२०१७-१८ चा टेक्नॉलॉजीसाठीचा ऑस्कर पुरस्कारही त्यांना प्राप्त झाला. दुर्दैव असं की, आपल्याकडे अशा भारतीयांची नोंद फारशी घेतली गेली नाही. त्यांचं योगदान इतकं मोलाचं होतं की, त्याचा वापर करून अनेकांनी पुढे या क्षेत्रातील विविध टूल्स बनवली आणि त्यातील अनेक टूल्स आज आपण वापरत आहोत.

दुसरीकडे, एआयचा वापरकर्ता म्हणून भारत जगभरात दुसऱ्या क्रमांकावर होता. या बाबतीत अमेरिकेनंतर बेंगळुरूचा क्रमांक लागतो. तिथे एआयचा वापर करणारी जगातली सगळ्यात जास्त लोकसंख्या आहे.

भारतात इंटरनेटचा वापर जसा वाढत गेला तसं डिजिटलचं प्रमाणही वाढत गेलं. गंमत म्हणजे, आपल्याकडे टूथब्रशपेक्षा मोबाइलची संख्या जास्त आहे, असं म्हटलं जातं. भारतीय लोक दिवसाला सरासरी ७ तास ४२ मिनिटे मोबाइल आणि इंटरनेट वापरतात. म्हणजे दिवसाला जवळपास पावणेआठ तास!




डॉ. अमेय पांगारकर

जेवढा वेळ आपण झोपतही नाही, तेवढा इंटरनेटमार्फत मोबाइलवर वापरतो. या सगळ्या डिजिटल क्रांतीमध्ये एका बाजूला आपल्याला दिवसाला एक ते दीड जीबी इंटरनेट मिळते आणि त्याचा वापर आपण आपल्याला हव्या त्या गोष्टींसाठी करतो.

भारतातील एआयच्या विकासासाठी गेल्या काही वर्षांपासून अनेक पायाभूत उपक्रम राबवले गेले आहेत. नीती आयोगाने २०१८ मध्ये "AI for All" ही धोरणात्मक भूमिका मांडली, ज्यामध्ये ह्यआयचा वापर आरोग्य, शेती, शिक्षण, स्मार्ट सिटी, आणि स्मार्ट मोबिलिटी यामध्ये कसा करायचा, याचा स्पष्ट आराखडा दिला आहे.

त्याचप्रमाणे, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि स्टार्टअप इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे एआय क्षेत्रातील नवउद्योजकांना मोठी चालना मिळाली आहे. देशात शिक्षण, आरोग्य, शेती, वित्त, ई-गव्हर्नन्स, स्टार्टअप्स अशा विविध क्षेत्रांमध्ये एआयचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे.

त्याचवेळी; तांत्रिक शिक्षण, कोडिंग, डेटा ॲनालिटिक्स यामध्ये तरुणांची रुचि वाढत आहे. भारतातील अनेक इंजिनिअरिंग कॉलेज, आयआयटी, आयआयआयटी आणि खासगी संस्था एआयसाठी विशेष अभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प राबवत आहेत. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा इंटरनेट वापरकर्ता देश असल्यामुळे डेटा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. ही बाब एआयसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.


ज्या प्रमाणात आपल्याकडे डिजिटल उत्क्रांती झाली, ज्या झपाट्याने आपण ती स्वीकारली, त्यावरून एआयचा वापरकर्ता म्हणून आपण दुसऱ्या स्थानावर आहोत. या गतीने पुढे जात राहिल्यास नजीकच्या भविष्यात जगाची एआय कॅपिटल किंवा एआयमधील जागतिक नेतृत्व अशी ओळख भारताला मिळू शकते.

■ ■ ■

माणूस कसा मेला,
काल गर्दीत मेला !
गर्दी कशाची, क्रिकेटच्या विजयाची!
विजय कुणाचा, खरेदी केलेल्या खेळाडू टीमचा!
टिम कुणाची, टिम बक्कळ पैसे असलेल्या मालकाची!
मालक कुणाचे, भांडवलशाही व्यवस्थेचे!

व्यवस्था कुणाची, मूठभर लोकांची!
मूठभर लोकांची पोरं रस्त्यावर मरतात का?
जे मरतात त्यांचं मूठभरांना
सोयरसुतक असतं का?
मग नेमकं जिंकलं कोण!
मग नेमकं हरलं कोण!

संदेश शालिनी संभाजी कर्डक




# खोट्या बातम्या... नवी महामारी!

आज आपण दररोज आपल्याला सत्याच्या एका नवीन स्वरूपाच्या सामना करावा लागणाऱ्या युगात जगत आहोत. मग ते घर असो, ऑफिस असो किंवा इतर कोणतेही ठिकाण असो. अनेकदा हे सत्य मोठे खोटे ठरते आणि आपण शुद्धीवर येतो तेव्हा दुसरी खोटी बातमी सत्य बनते आणि सायरन वाजवून पुनरावृत्ती होऊ लागते.

कोणती बातमी खरी, कोणती नाही? काय मानावे, काय नाही? हा प्रश्न या काळातील यक्षप्रश्न बनला आहे. हे विशेषतः अलीकडेच जाणवले, जेव्हा एकीकडे देश युद्धात अडकला होता आणि दुसरीकडे खोट्या बातम्यांचा पूर आला होता.

युद्धादरम्यान या प्रकारच्या खोट्या बातम्यांचा जनमत व भावनांवर खूप खोलवर परिणाम होतो. देशाचा विचार केला जातो तेव्हा सर्वकाही खूप गंभीर होते. खोट्या बातम्या काही काळासाठी जनतेला मूर्ख बनवू शकतात, सत्य काही काळासाठी लपवता येते, सत्य बाहेर येते ही वेगळी बाब आहे. पण, त्या अल्पावधीत लोकांच्या मनःस्थितीवर त्याचा काय परिणाम होतो? त्यानंतर सत्यही संशयाच्या भोवऱ्यात येते.

महामारी व युद्धाच्या काळात आपण सर्व जण अजूनही लसीकरणाच्या सत्यासह जगायला शिकत आहोत आणि आशा करत आहोत की, बूस्टर डोस नेहमीच या जगाला वाचवेल. हे सत्य आहे आणि येथे सत्य सार्वत्रिक बनते. परंतु, अशी काही राष्ट्रेही आहेत, जी फक्त दहशतवादाला सत्य मानतात. सुनियोजित दिशाभूल करणाऱ्या प्रचाराद्वारे व शस्त्रे विकून, ती पुष्टी करतात की, धर्म किंवा श्रद्धेच्या आधारावर जगणे व मरणे हेच सत्य आहे.

आपण अशा युगात जगत आहोत, जिथे आपल्याला सत्याला फसवणे, नाकारणे आणि चुकवण्यासाठी तयार केले जात आहे.

आपण हिटलर व त्याच्या टीमच्या राजकीय तत्वज्ञानाचे मूल्यांकन करतो तेव्हा आपल्याला आढळते की, त्या काळातही एका विशिष्ट प्रकारच्या खोट्या बातम्या प्रचलित होत्या. आणि इतिहासकार जेफ्री हर्फ यांनी सांगितल्याप्रमाणे, नाझींनी ज्यूविरोधी भावना भडकवण्यासाठी व नरसंहाराचे समर्थन करण्यासाठी मोठ्या खोट्या कल्पनेचा वापर केला.

गोबेल्सचे राजकीय तत्त्वज्ञान असे होते की, खोट्याची वारंवार पुनरावृत्ती केली तर ते सत्य बनते. पुनरावृत्तीची ही प्रक्रिया अनेक संस्थांना समजली होती आणि आपल्या शेजारील देशाने नुकतीच ती वापरली. तर मग आपण मोठ्या खोट्याचे हे तंत्र आजच्या काळात सत्याचे नवीन रूप आहे, असे असे गृहीत धरावे का?

सॉक्रेटिसचा असा विश्वास होता की, आपण धोरण किंवा वादात हरतो तेव्हा अपमान एक मोठे शस्त्र बनते. बाल राज्याच्या व्यवहारांत कोणतीही जबाबदारी नसते. जे काही लिहावे लागेल, जे काही बोलावे लागेल, ते सांगितले जाते. फक्त ट्विट करावे लागते, तथ्य कोण तपासेल? अनेक विडंबनात्मक खाती तयार केली जातात आणि हजारो फॉलोअर्सही त्यात जोडले जातात. परिणामी ट्रोलिंग आणि बनावट बातम्या येतात.

हे करताना जिभेवर नियंत्रण नसते किंवा अभिव्यक्तीत लाज नसते. प्रश्न असा आहे की, एक तरुण किंवा मूल मोठ्या खोट्याभोवती कसे वाढेल आणि या सर्वांचा त्याच्या मनावर आणि मेंदूवर काय परिणाम होईल? खोट्या बातम्या ही नवीन महामारीच आहे.

■ ■ ■

# 'किंग' चा नवा अवतार



चित्रसृष्टीत अनेक नव्या-जुन्या कलाकारांची रेलचेल असली तरी किंगचे स्थान अबाधित आहे, यात शंका नाही. लवकरच दिग्दर्शक सिद्धांत आनंद यांच्या बहुप्रतिक्षित 'किंग' मध्ये चित्रसृष्टीतील किंग शाहरुख खान दिसणार आहे. या ॲक्शन थ्रिलरमध्ये शाहरुखकन्या सुहाना देखील असल्याने प्रेक्षकांमध्ये कुतूहल वाढले आहे.

कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी यातील कलाकार आणि इतर गोष्टींबाबत काही अपडेट्स आता समोर आले आहेत. त्याचबरोबर नुकताच शाहरुख खानचा नवीन लूकही व्हायरल झाला असून तो त्याचा 'किंग'साठीचा लूक असल्याचा चाहत्याचा समज आहे. दुसरे म्हणजे सध्या या बॉलिवूड सुपरस्टारचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल होत असून यात त्याचे बायसेप्स स्पष्ट दिसत आहेत. हातावर टॅटू काढल्याचे समजत आहे.

इंटरनेटवर व्हायरल होणाऱ्या या व्हिडिओमध्ये शाहरुख 'बिली हिल' टँक टॉप आणि बीनी घातलेला दिसतो. अभिनेत्याचा हा रफ लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरत आहे. व्हिडिओमध्ये अभिनेता लिफ्टमधून उतरून गाडीकडे चालत जाताना दिसतो. इमारतीतील कर्मचारी आणि वाटेत उपस्थित असणाऱ्या सर्वांनीच त्याचे स्वागत केलेले पाहायला मिळते.

चाहत्यांना आठवत असेल की, एप्रिलपूर्वी शा-हरुख खान कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात दिसला नव्हता. नंतर 'मेट गाला' लूक मध्ये राजाच्या अवतारात रेड कार्पेटवर आला आणि त्याने एकच खळबळ उडवून दिली. तथापि हा लूक, स्क्रिप्ट आणि राजाशी संबंधित इतर घडामोडी पूर्णपणे गुप्त ठेवण्यात आल्या आहेत. दुसरीकडे, त्याचा लूक पाहून चाहते पुढील पात्राबद्दल अंदाज लावू लागले आहेत. एका वापरकर्त्याने त्याचे पात्र ९० च्या दशकातील गँगस्टरपासून प्रेरित असण्याची शक्यता व्यक्त केली आहे तर दुसऱ्याने 'किंग' शूटसाठी टॅटू लूक... असे म्हणत प्रतिक्रिया नोंदवली आहे. किंगबरोबर आगामी 'किंग'मध्ये अभिषेक बच्चन, दीपिका पदुकोण, राणी मुखर्जी, अनिल कपूर आणि अभय वर्मा या सारखे कलाकार मुख्य भूमिकेत असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# लहान वय, मोठी झेप



शान्य भारतातल्या एका छोट्या गावातील अवघ्या नऊ वर्षांच्या बिनिता छेत्रीने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उंचावले आहे. आसाममधील कार्बी आंगलोंग जिल्ह्यातील रहिवासी बिनिताने 'ब्रिटेन्स गॉट टॅलेंट २०२५' या प्रसिद्ध रिॲलिटी शोमध्ये दुसरी उपविजेती बनून इतिहास रचला आणि देशवासियांची मान अभिमानाने ताठ झाली.

बिनिता आसाममधील तलबलीजान गावाची रहिवासी आहे. तिने अगदी लहान वयात दाखवलेली नृत्य प्रतिभा केवळ परिक्षकांसाठीच नाही तर जगभरातील प्रेक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरली. आपल्या सादरीकरणात तिने पारंपरिक भारतीय नृत्य आणि आधुनिक नृत्यशैलीचे असे मिश्रण सादर केले की लोक कौतुक करताना थकत नव्हते.

ब्रिटिश जादूगार हॅरी मोल्डिंगने ब्रिटनच्या 'गॉट टॅलेंट २०२५' च्या अंतिम फेरीत पहिला क्रमांक पटकावला तर 'द ब्लॅकआउट्स' नृत्य गट दुसऱ्या क्रमांकावर राहिला. या दोन्ही सहभागींमध्ये जोरदार स्पर्धा झाली. बिनिताने अद्वितीय कला आणि आत्मविश्वासाने तिसरे स्थान मिळवले. कोणत्याही भारतीयासाठी ही अभिमानाची गोष्ट म्हणावी लागेल.

मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी या कामगिरीबद्दल बिनिताचे अभिनंदन केले आणि सांगितले की, तिने भारत आणि आसामचे नाव उंचावले आहे. बिनिताने व्हिडिओद्वारे सर्व समर्थकांचे आभार मानले. या उत्तुंग कामगिरीबद्दल बिनिताला कार्बी आंगलोंग कौन्सिलचे प्रमुख तुलीराम रोंगहांग यांच्याकडून पाच लाख रुपये दिले गेले. याबद्दलही या चिमुरडीने त्यांचे आभार मानले. त्याचबरोबर आसाम विधानसभेचे उपाध्यक्ष नुमुल मोमीन यांचे आभार मानण्यास ती विसरली नाही.

# गाजतीये कॅमेऱ्या बाहेरची जोडी



हॉलिवूड सुपरस्टार जॅकी चॅनने बहुचर्चित ॲक्शन थ्रिलर चित्रपट 'कराटे किड लेजेंड्स'द्वारे जगभरातील चित्रपटगृहांमध्ये दमदार पुनरागमन केले आहे. त्याच्या या चित्रपटाचे बॉलीवूड सुपरस्टार अजय देवगण आणि त्याचा मुलगा युग देवगण या दोघांनी हिंदी भाषेत डबिंग केले आहे. सध्या पिता-पुत्राच्या या चित्रपटाचा देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ बघायला मिळत आहे. 'कराटे किड लेजेंड्स'ने रविवारी गली कमाई करत जॅकीची जादू होती तशीच असल्याचे दाखवून दिले. व्हा भारतीय प्रेक्षक चित्रपट चांगलाच गाजवताना दिसत आहे. ३० मे रोजी मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झालेला हा चित्रपट २०१० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'द कराटे किड'चा सिक्वेल आहे. चित्रपटाबद्दल चाहत्यांमध्ये आधीपासूनच मोठी क्रेझ होती. त्यातच अजय देवगण आणि युग देवगण कॅमेऱ्याबाहेर असले तरी या चित्रपटाचा एक भाग असल्याची माहिती समोर आली तेव्हा तर चर्चा चांगलीच रंगली. 'कराटे किड लेजेंड्स'ने रविवारी सुमारे २.१३ कोटी कमाई केली. अर्थात शनिवारपेक्षा ती थोडी कमी आहे. परंतु हॉलिवूड चित्रपटांची आकडेवारी बघता ही स्थिती निश्चितच वाईट मानली जाऊ शकत नाहीत.अशाप्रकारे त्याची आत्तापर्यंतची कमाई ६.१२ कोटीच्या पुढे पोहोचली आहे.

# राधिका का रागावली?



राधिका आपटे हे वेगवेगळ्या कारणांमुळे सतत चर्चेत असणारे नाव आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये तिने बाळाला जन्म दिला. तेव्हापासून राधिका आई असण्याच्या जबाबदाऱ्या आणि तर दुसरीकडे व्यावसायिक कामाचा समतोल साधत आहे. या अभिनेत्रीने गरोदरपणाची घोषणा केली नव्हती. त्याचमुळेच बीएफआय लंडन फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'सिस्टर मिडनाईट' याच्या स्क्रीनिंगमध्ये बेबी बंपसह ती दिसली तेव्हा सगळ्यांनाच आश्चर्याचा धक्का बसला. यथावकाश राधिकाने गोंडस बाळाला जन्म दिला आणि काही दिवसांनी एक फोटो शेअर करत तिने बाळाला स्तनपान देत असतानाच लॅपटॉपवर काम सुरू असल्याचे दाखवून दिले.

बाळाला जन्म दिल्यानंतर अवघ्या एका आठवड्यात ती कामावर परतली. परंतु हे क्षेत्र नवमातांना मदत करणारे नाही, असे म्हणत तिने आता चर्चेची राळ उडवून दिली आहे. अर्थात तिच्या या वक्तव्यावर इंडस्ट्रीतील काहींनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. भारतीय चित्रपट उद्योग तिच्यासारख्या महिलांना आधार देण्यासाठी उभा केलेला नाही, असे म्हणत काहींनी तिला फटकारले तर दुसरीकडे राधिका नवीन मातांना येणाऱ्या आव्हानांबद्दल सातत्याने बोल-ताना दिसत आहे. एकंदरच सध्या मनोरंजन उद्योगात मातृत्वाबद्दलची चर्चा जोर धरत आहे. नुकतेच दीपिका पदुकोणने संदीप रेड्डी वांगाचा 'स्पिरीट' सोडल्याची बातमी आली. दीपिकादेखील मातृत्वानंतर कामावर परतत होती. परंतु, आई असल्याने तिने कामाच्या वेळेत काही बदल करण्याची मागणी केली जी अर्थातच नाकारली गेली. यानंतर तिने चित्रपट सोडला. दुसरीकडे अभिनेत्रीच्या वाढत्या मागण्यांमुळे तिला कामावरून काढून टाकल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, अभिनेता-निर्माता अजय देवगणने ट्रेलर लॉंचच्या वेळी दावा केला की, आठ तासांचा कामाचा दिवस केवळ मातांसाठीच नाही तर सामान्य लोकांसाठीही असायला हवा. या सगळ्यामुळे अन्य क्षेत्रांबरोबर आता मनोरंजनविश्वातही कामाच्या वेळेवरुन चर्चा कानी येत आहे. नव्या मातांसाठी आपल्या चित्रपट उद्योगात काम करणे खरोखर कठीण आहे, असे राधिका यावर प्रतिक्रिया देताना म्हणते. कामाच्या लांबणाऱ्या वेळेमुळे आपल्याला बाळाला पाहण्याची संधी मिळत नसल्याची खंत ती बोलून दाखवते. राधिकाने संपूर्ण गर्भधारणेदरम्यान काम केले. प्रसूतीच्या आदल्या दिवसापर्यंत ती कार्यरत राहिली आणि प्रसूतीनंतर एका आठवड्याच्या आत व्हर्च्युअल मीटिंगसाठी झूम कॉलवर परत आली. तिचा 'सिस्टर मिडनाईट' अलिकडेच प्रदर्शित झाला. आता या चर्चेचा त्याच्या प्रसिद्धीवर कसा परिणाम होतो, ते लवकरच दिसेल.

# सत्काराने मामा सुखावले



मराठी सिनेसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि हास्यसम्राट अशोक सराफ यांना नुकताच दिला गेलेला पद्मश्री पुरस्कार प्रत्येक मराठी मनाला सुखावणारा आहे. कला, सामाजिक कार्य आणि संगीत क्षेत्रातील योगदानासाठी ६८ प्रतिष्ठित व्यक्तींना पुरस्कारांच्या दुसऱ्या टप्प्यात सन्मानित करण्यात आले. यामध्ये अशोक सराफ यांचा समावेश होता. पद्म पुरस्कार देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक आहे. पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री या तीन श्रेणींमधील एक असणाऱ्या या पुरस्काराने अशोक सराफ या अवलियाचा उचित सन्मान झाल्याची भावना रसिकांकडून व्यक्त होत आहे.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अशोक सराफ यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सगळ्यांचे आभार मानले. 'पद्मश्री हा सन्मान माझ्या जीवनातील एक विशेष क्षण आहे. त्यासाठी मी शासनाचे आभार मानतो. तसेच कुटुंबीयांचे, सहकलाकारांचे आणि प्रेक्षकांचेही आभार. तुमच्या प्रेमाशिवाय हे शक्य झालं नसतं. तुमचा प्रेम आणि आशिर्वाद कायम असाच राहू द्या,' असं म्हणत त्यांनी आनंद व्यक्त केला. पुरस्कार स्वीकारण्याआधी अशोक सराफ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि सभागृहातील उपस्थितांचे हात जोडून अभिवादन केले. त्यांच्या या कृतीने सगळ्यांची मनं जिंकून घेतली. त्यांच्या हातात पुरस्कार देताना उपस्थित सर्वांच्याच चेहऱ्यावर हास्य होतं. सर्वांनी मना-पासून त्यांचे अभिनंदन केले.

पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल अशोक सराफ म्हणाले की, 'ही खूप आनंदाची गोष्ट आहे. हा सन्मान माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. हा एक मोठा सन्मान आहे. या पुरस्कारासाठी माझे नाव विचारात घेण्यात आले याचा आनंद आहे. याचा अर्थ मी आयुष्यात खरोखर काहीतरी केले आहे.'

अशोक सराफ यांना सर्वजण प्रेमाने 'मामा'अशी हाक मारतात. अशोक मामांचा जन्म १९४७ मध्ये मुंबईतच झाला. १९६९ पासून ते सिनेसृष्टीत कार्यरत आहेत. मराठीसोबतच त्यांनी अनेक हिंदी सिनेमांमध्येही काम केलं. 'जानकी' या सिनेमातून त्यांनी अभिनयात पदार्पण केलं, अशी खास ओळख निर्माण करणाऱ्या या लाडक्या अभिनेत्याला मानाचा मुजरा.

# अशी आहे नवी 'मिस वर्ल्ड'




थायलंडची २१ वर्षीय ओपल सुचाता चुआंगश्री ने मिस वर्ल्ड २०२५ चा किताब जिंकला आणि जगाचे लक्ष वेधून घेतले. हैदराबादमधील 'हायटेक्स एक्झिबिशन सेंटर'मध्ये १०८ देशांमधील स्पर्धकांमध्ये अलिकडेच ही स्पर्धा रंगली. भारताची नंदिनी गुप्ता उत्कृष्ट कामगिरीने टॉप-२० मध्ये पोहोचण्यात यशस्वी झाली. पण ती टॉप-८ मध्ये स्थान मिळवू शकली नाही. तथापि, तिने मिस वर्ल्ड २०२५ मध्ये 'टॉप मॉडेल'चा किताब जिंकून नाव राखले.

मिस वर्ल्ड २०२४ क्रिस्टीना पिस्झकोवाने ओपल सुचाताच्या मस्तकावर मुकुट घातला. मिस वर्ल्ड रनर-अप इथिओपियाची हासेट डेरेझ ठरली तर दुसरी रनर-अप पोलंडची माजा क्लाझदा आणि तिसरी रनर-अप मार्टिनिकची ऑरेली जोआकिम ठरली. मिस वर्ल्डचा किताब जिंकल्यानंतर ओपल सुचाता भावुक झालेली दिसली. 'हा माझा वैयक्तिक विजय नाही तर सगळ्या तरुण मुलींचा विजय आहे. ज्यांना पाहिले पाहिजे, ऐकले पाहिजे आणि बदल घडवून आणण्याची इच्छा आहे अशा सर्वांचा हा विजय असल्याचे भावुक मत तिने यावेळी नोंदवले. एका समृद्ध वारशाचे प्रतिनिधित्व करण्याचा आणि मिस वर्ल्डच्या या काळात खरा बदल घडवून आणण्याचा मला अभिमान असल्याचे सांगत तिने आनंद व्यक्त केला.

कोटा येथील रहिवासी नंदिनी गुप्ता हिने यावर्षी मिस वर्ल्ड २०२५ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. तिने टॉप मॉडेलचा किताब जिंकला आणि टॉप-४० मध्ये स्थान मिळवले. टॉप-८ मधून बाहेर पडली तरी ती टॉप-२० मध्ये स्थान मिळवण्यात मात्र ती यशस्वी झाली. मुख्य म्हणजे ती अंतिम फेरीच्या सांस्कृतिक समारंभात शो स्टॉपर होती.

यंदा बॉलिवूड अभिनेता सोनू सूदला सामाजिक कार्यासाठी 'मिस वर्ल्ड ह्युमॅनिटेरियन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी मिस वर्ल्ड आणि बॉलिवूड अभिनेत्री मानुषी छिल्लर, दक्षिणेतील सुपरस्टार चिरंजीवी आणि विजय देवरकोंडा यासारखे अनेक सेलिब्रिटी अंतिम फेरीचा सहभागी होते. इशान खट्टर आणि जॅकलिन फर्नांडिस यांनीही अंतिम फेरीत उत्कृष्ट कामगिरी केली. या वर्षीच्या 'मिस वर्ल्ड'च्या ज्युरी सदस्यांमध्ये सोनू सूद देखील होता. सोनू सूदने मिस वर्ल्ड ओपल सुचाताला शेवटचा प्रश्न विचारला आणि चोख उत्तर देत तिने या स्पर्धेवर आपले नाव कोरले.

# आमिरचे पहिले प्रेम...!



आमिर खान कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाच्या चित्रपटांपैकी एक 'सितारे जमीन पर'ची तयारी करत आहे. याविषयीच्या बातम्या गेले काही दिवस चर्चेत आहेत. स्पॅनिश हिट चित्रपट 'चॅम्पियन्स' (२०१८) पासून प्रेरित होऊन तयार होणारा हा चित्रपट २० जून २०२५ रोजी प्रदर्शित होत असल्यामुळे चाहते उल्हसित आहेत. आधीच्या वृत्तानुसार हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होणार, असे समजले होते. त्यानंतर तो थेट यूट्यूबवर प्रदर्शित होईल असे सांगण्यात आले तसेच त्यासाठी पे-पर-व्ह्यू मॉडेल स्वीकारण्यात आले असल्याचे कळले. अभिनेत्याच्या या निर्णयाने सगळेच आश्चर्यचकित झाले होते. तथापि, आता आमिर खानने त्या सर्व अफवांना पूर्णविराम दिला आहे.

अशा वृत्तांवर प्रतिक्रिया देताना आमिरने 'सितारे जमीन पर' २० जून २०२५ रोजी फक्त थिएटरमध्ये प्रदर्शित होईल असे स्पष्ट केले असून इतर चित्रपटांप्रमाणे लगेचच तो कोणत्याही ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार नसल्याचे सांगितले आहे. एका पॉडकास्ट मुलाखतीत आमिर खान म्हणाला की, चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी वेगवेगळे प्रस्ताव आले असले तरी मी सर्वांना बाजूला ठेवत आहे आणि फक्त एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत आहे आणि ती म्हणजे थिएटर.

तो पुढे म्हणाला, 'एक काळ असा होता की चित्रपट सहा महिन्यांनी ओटीटीवर यायचा. आता तो काही आठवड्यांमध्येच येतो. पण मला ते आवडत नाही. मला ओटीटीशी संबंधित कोणतीही समस्या नाही. मी ओटीटीसाठी कोणताही कंटेंट बनवला तर तो थेट ओटीटीवरच घेईन. पण 'सितारे जमीन पर' फक्त थिएटरमध्येच येईल. मी सिनेमा आणि थिएटरवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मकडे मी अतिशय आदराने पाहतो. पण त्यापेक्षा मोठ्या पडद्यावर माझे जास्त प्रेम आहे. खरे तर हेच माझे पहिले प्रेम आहे. अगदी थिएटर व्यवसाय बंद पडला तरच मी पुढे काय करायचे याचा विचार करेन...' आमिरचे हे वक्तव्य खूप काही सांगून जाणारे आहे.

# 'वीरा चंद्रहास' ओटीटीवर बघा

देशभरातील प्रेक्षकांना दाक्षिणात्य चित्रपट पहायला आवडतात. या प्रत्येक चित्रपटाची अनोखी कथा आणि थरार असतो, जो हिंदी चित्रपटांमध्ये कुठेही दिसत नाही. असाच एक थ्रिलर म्हणजे कन्नड भाषेतील पौराणिक चित्रपट 'वीरा चंद्रहास'. थिएटरमध्ये धुमाकूळ घालल्यानंतर आता तो ओटीटीवर दाखल झाला आहे.

उत्तम कथेने प्रेक्षकांची मने जिंकणारा 'वीरा चंद्रहास' नुकताच ऑनलाइन स्ट्रीम झाला आहे. तो एप्रिल महिन्यात मोठ्या पडद्यावर प्रदर्शित झाला होता. 'केजीएफ' आणि 'सालार' सारखे अनेक ब्लॉकबस्टर चित्रपट बनवणाऱ्या 'होम्बाले फिल्म्स'च्या बॅनरखाली त्याची निर्मिती करण्यात आली होती. एका अनोख्या आणि मनोरंजक पौराणिक कथेच्या आधारे 'वीरा चंद्रहास'ने सर्वांना प्रभावित केले. स्वाभाविकच बॉक्स ऑफिसवर त्याने आपली छाप सोडली.

त्यानंतर नुकताच तो 'अमेझॉन प्राइम व्हिडिओ'वर ऑनलाइन स्ट्रीम करण्यात आला आहे. तथापि, त्याच्या ओटीटी रिलीजबद्दल फारशी चर्चा झाली नाही आणि निर्मात्यांनी त्याची घोषणाही केली नाही. अर्थात असे असले तरी तो ओटीटीवरही चित्रपटप्रेमींची मने जिंकताना दिसत आहे. प्राइम व्हिडिओवर हा चित्रपट 'अवश्य पहावा' अशा चित्रपटांच्या यादीत स्थान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.



इंटरनेट मूव्ही डेटाबेस म्हणजेच आयएम डीबीकडून मिळालेल्या सकारात्मक रेटिंगवरून चित्रपटाची लोकप्रियता आणि त्यातील उत्तम आशय सहज मोजता येतो. 'वीरा चंद्रहास'ला आयएमडीबीकडून ८.२/१० चे उत्तम रेटिंग मिळाले आहे. यावरून मानले जाऊ शकते की, हा चित्रपट खरोखरच अवश्य पहावा असा आहे.